मंगळवार, ९ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२४२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●TUESDAY 9 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-242 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5

## भुलेश्वरची सायंकाळ



दिवसभराचा उकाडा आणि मावळतील जाणारा दिवस... सूर्यास्त होताना क्षितिजावर पसरलेली ललिमा... पुरंदरच्या दौलतमंगळ गडावरील भुलेश्वरची ही सायंकाळ. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# तुम्हाला फौजदारचा हवालदार केला

## जयंत पाटलांचा फडणवीसांवर मार्मिक वार

आधुनिक केसरी न्यूज

**निपाणी : राष्ट्रवादी काँग्रेस साडेतीन जिल्ह्यांचा पक्ष, कर्नाटकात काय डोंबलं करणार? हे पार्सल महाराष्ट्रात पाठवा त्याचे काय करायचे ते पाहतो, अशा शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निपाणीमध्ये जाहीर सभेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसवर हल्लाबोल केला होता. या टीकेनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसने निपाणीमध्येच जाहीर सभा घेत या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिल आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या शैलीमध्ये फडणवीसांवर हल्लाबोल करताना जोरदार प्रत्युत्तर दिलं. यावेळी बोलताना म्हणाले की, या देशात हुकूमशाही वाढत चालली आहे. विरोधात बोलणाऱ्यांना गप्प बसवण्याचं काम सुरू आहे. कर्नाटकात धर्मनिरपेक्ष विचारांचे सरकार यावं अशीच आमची इच्छ आहे. आमचे चार ते पाच आमदार निवडून येतील. यावर्षी कर्नाटक राज्यात भाजप सरकार येणार नाही.

जयंत पाटील पुढे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस हा साडेतीन जिल्ह्याचा पक्ष आहे. मात्र, भारतीय जनता पक्षाने तुम्हाला फौजदाराचा हवालदार केला आहे आणि तुम्ही आमची मापं काढावी का ? शरद पवार यांच्या झंझावातात 2024 लाख राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष होणार असल्याचे जयंत पाटील यावेळी म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने निर्णय घेतला की कर्नाटकात जाऊन शेतकऱ्यांचे, तरुणांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी या निवडणुकीत उतरायचं धनाचा वापर करून माणसं फोडून सरकार बनवली जातात दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही भाजपवर हल्लाबोल केला. ते म्हणाले की, मणिपूरमध्ये गेले 6 दिवस संघर्ष सुरू आहे, अनेक विद्यार्थी मृत्युमुखी पडले. ज्यांच्या हातात देश आहे त्यांना मणिपूर सारखं राज्य सांभाळता येत नाही. मणिपूर कसा वाचवता येतील यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा. धनाचा वापर करून माणसं फोडून सरकार बनवली जातात त्याला कर्नाटक देखील अपवाद नाही. अशा पैशाचा वापर करून सरकार बनवणाऱ्यांना बाजूला ठेवलं पाहिजे. 40 टक्के काय भानगड आहे कळेना, कर्नाटकची इतकी बदनामी कुणीही केली नाही. मिळालेली सत्ता सामान्य माणसासाठी वापरायची असते. 14 एप्रिल हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस आहे, तो सुद्धा येथील काही लोक अशुभ दिवस म्हणत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने निर्णय घेतला की कर्नाटकात जाऊन शेतकऱ्यांचे, तरुणांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी या निवडणुकीत उतरायचं, असेही पवार यांनी सांगितले.

# राजस्थानात लष्कराचे विमान घरावर कोसळले

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय वायुदलाचे मिग 21 हे विमान राजस्थानमध्ये एका घरावर कोसळलं. हे विमान कोसळून जो अपघात झाला त्यात दोन महिलांचा मृत्यू झाला तर एक माणूस जखमी झाला आहे. ANI या वृत्तसंस्थेने यासंदर्भातले वृत्त दिले आहे. भारतीय वायुदलाचे हे विमान हनुमानगड गावातल्या बहलोल नगरमध्ये कोसळले. हे विमान ज्या घरावर कोसळले. त्यातल्या दोन महिलांचा मृत्यू झाला. वैमानिक आणि सहवैमानिकाने वेळीच उडी मारल्याने त्या दोघांचे प्राण वाचले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार राजस्थानमध्ये एका घरावर हे विमान कोसळले. हनुमानगढ या ठिकाणी ही घटना घडल्यानंतर तिथे अनेक लोकांनी घटना पाहण्यासाठी गर्दी केली. या ठिकाणी मदत आणि बचाव कार्य सुरु करण्यात आले आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक सुधीर चौधरी यांनी दिली आहे. MIG 21 हे लष्करी विमान सुतारगडजवळ कोसळल्याची माहिती भारतीय वायुदलानेही दिली आहे. हे विमान रुटीन ट्रेनिंग करत होते. मात्र अचानक हे विमान कोसळले. विमान कोसळत असतानाच वैमानिकाने आणि सहवैमानिकाने उडी मारली.

# समलैंगिक विवाहाबाबत समाजाचा दृष्टिकोन पारंपरिकच

## ८३.९ टक्के नागरिकांना वाटते चिंता; दृष्टी स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्राच्या सर्वेक्षणातून समोर आले चित्र

आधुनिक केसरी न्यूज


पुणे : समलैंगिक विवाहांना कायदेशीर मान्यता देण्याच्या विषयावर देशातील सर्वात मोठे सर्वेक्षण पुण्यातील दृष्टी स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्राने केले आहे. देशातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न आहे. समलैंगिक विवाहांबाबत समाजमन जाणून घेणे आणि या विषयावर समाजात प्रचलित असलेले मत जाणून घेणे, हा या सर्वेक्षणाचा उद्देश आहे. या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीनुसार, वैयक्तिक पातळीवर समलैंगिक विवाहांचा स्वीकार करण्याबाबत बहुतांश व्यक्तींचा दृष्टिकोन पारंपरिक आहे. समलैंगिक विवाहांना कायदेशीर मान्यता दिल्यास समाजावर विपरीत परिणाम होण्याची भीती बहुसंख्य व्यक्तींना वाटत असल्याचेही या सर्वेक्षणातून समोर आले आहे. प्रतिसाद देणाऱ्यांपैकी ८३.९ टक्के लोकांनी समलैंगिक विवाह हा भारतात चिंताजनक विषय असल्याचे म्हटले आहे, तर केवळ १६.१ टक्के लोकांनी हा विषय गंभीर नसल्याचे म्हटले आहे.

दृष्टी स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्राने १३ भाषांमध्ये हे सर्वेक्षण केले असून यासाठी प्रतिसाद देणाऱ्यांची विभागणी १८ ते २५, २६ ते ४०, ४१ ते ६० आणि ६०पेक्षा अधिक अशा चार वयोगटांमध्ये तर पुरुष, स्त्री व अन्य या तीन लिंगांमध्ये करण्यात आली होती. दृष्टी स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र हे समाजातील स्त्रियांचे स्थान आणि संबंधित मुद्द्यांवर गेली २० वर्षांपेक्षा अधिक काळ संशोधन करत आहे. समाज म्हणून आपली भूमिका आणि समलैंगिक विवाहांना कायदेशीर मान्यता देण्याबाबत समाजाचे मत जाणून घेण्यासाठी दृष्टी स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र सुसंगत माहितीचे संकलन करत आहे. जागतिक पातळीवर महत्त्वाच्या ठरणाऱ्या समलैंगिक विवाहाच्या प्रश्नावर भारताची भूमिका ठरविणे आणि त्यानुसार समाजाचा प्रतिसाद निश्चित करणे, हा त्याचा हेतू आहे. समलैंगिक विवाहांना

* प्रतिसाद देणाऱ्या ७५ टक्के लोकांना समलैंगिक विवाह ही नैसर्गिक घटना नसल्याचे वाटते . * सर्व वयोगटातील आणि लिंगाच्या व्यक्तींना वाटते की समलैंगिक विवाहांचा भारतीय समाजावर विपरीत परिणाम होईल . * प्रतिसाद देणाऱ्या सर्व वयोगटातील आणि लिंगाच्या बहुतांश व्यक्तींनी त्यांच्या किंवा जवळच्या कुटुंबातील समलैंगिक विवाहांना पाठिंबा न देण्याची भूमिका व्यक्त केली . * देशभरातील सर्व जाती धर्मातून या सर्वेक्षणासाठी प्रतिसाद देण्यात आला आहे . * सर्वेक्षणामधून हे स्पष्टपणे दिसून येत आहे की, भारतीय समाज समलिंगी विवाहास कायदेशीर मान्यता देण्यास तयार नाही . अशा प्रकारचा कायदा झाला तर त्याचे समाजावर दूरगामी दुष्परिणाम होतील असे समाजमत आहे . * समलैंगिकतेचा पुरस्कार केल्यास मुलींची सुरक्षा, लैंगिकता या विषयावर माध्यमातून होणाऱ्या माहितीच्या भडिमारामुळे कुमार वयातील मुलामुलींवर होणारे दुष्परिणाम यावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे . * ज्या बाहेरील देशांत याबाबत दुष्परिणाम दिसू लागले आहेत त्याकडे आपण लक्ष देत त्याकडे डोळसपणे पाहिले पाहिजे . * कोणताही निर्णय घेण्यापूर्वी उद्भवू शकणाऱ्या समस्यांवर अध्ययन होणे गरजेचे आहे .

कायदेशीर मान्यता देण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या १६ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू झाली. त्यानंतर हे सामाजिक सर्वेक्षण करण्याला चालना मिळाली. या सुनावणीचा परिणाम केवळ कोणा व्यक्तींवर नव्हे तर समाजावर होईल. त्यामुळे याबाबत समाजाला काय वाटते हे केंद्राच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## सिंगापूरचा भाग्यविधाता - ली क्वान यू

आधुनिक केसरी

पंतप्रधान ली आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने सिंगापूर आणि सिंगापूरवासियांसाठी अनेक कल्याणकारी योजना कल्पकतेने राबवल्या. अमेरिका आणि इतर युरोपीय देशात लोक आरोग्य विमा काढत, त्याचे हप्ते भरत. अशा व्यक्तींना मग डॉक्टर सुद्धा नको ती औषधे देऊन हॉस्पिटलचा खर्च वाढवत. ली आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ठरवले की लोक प्रॉव्हिडंड फंडासाठी जसे पैसे भरतात तसेच आपल्या पुढील काळात साधारणपणे दोन टक्के एवढी रक्कम त्यांनी आपल्या आरोग्य खर्चासाठी म्हणून मेडिफंड मध्ये भरावी. ही त्यांची योजना खूपच यशस्वी ठरली. सरकारी दवाखाने अत्याधुनिक सामुग्री आणि औषधांनी सुसज्ज करण्यात आले. त्यांचा दर्जा सुधारण्यात आला. आवश्यक ते उपचार सगळ्या रुग्णांना मिळू लागले.



अत्यावश्यक सोयीसुविधा, औषधे आणि डॉक्टर्स सर्वांसाठी समान होते. त्याव्यतिरिक्त आणखी काही सुविधा हव्या असतील तर त्यासाठी रुग्णांनी वेगळे पैसे मोजावेत. यामुळे सर्वसामान्यांना आवश्यक ते उपचार मिळू लागले. रुग्णालयातील प्रचंड रांगा कमी झाल्या. निवृत्तिवेतनासाठीही कर्मचाऱ्यांनीच आपले पैसे जमा करावेत. तेच पैसे सरकार निवृत्तीवेतन म्हणून कर्मचाऱ्यांना देते. कर्मचाऱ्यांच्या प्रॉव्हिडंड फंडातील पैसे इतर फायदेशीर योजनांमध्ये गुंतवण्याचा पर्याय सुद्धा कर्मचाऱ्यांना सिंगापूर सरकारने दिला. पर्यटकांना आकर्षित करता यावे म्हणून अतिशय सुंदर असा पर्यटनस्थळांचा विकास करणात आला. जागेचा अभाव असताना आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन दुसरा अत्यंत आधुनिक असा चांगी विमानतळ उभारण्यात आला. त्यासाठी समुद्रात भराव घालायला लागला. हे विमानतळ आज पर्यटकांचे आकर्षण बनले आहे. सिंगापूरमधील विविध महामंडळानी आर्थिक आणि औद्योगिक क्रांती घडवून आणली.






## आनंदी पहाट

## परस्परांमधील नात्याचे चित्र विचित्र नसावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

स्त्री पुरुष हे दोन्हीही जीवशास्त्रीय दृष्ट्या दोन स्वतंत्र व्यक्तीमत्व आहेत. त्या दोघांमध्ये निसर्गतःच विलक्षण आकर्षण असल्याचं वैज्ञानिक प्रयोगातून स्पष्ट झालं आहे. स्त्री पुरुषांच्या नैसर्गिक आकर्षणातून केल्या जाणाऱ्या विवाहाला समाजस्थैर्याचा आधारभूत अशा विवाह संस्थेचे उदात्त रूप देण्याचे महत्वपूर्ण कार्य विवाह संस्कार करत असतो. विवाह हा स्थिर म्हणजे दीर्घकाळ टिकणारा आणि सुख, समाधान आणि मनःशांती देणारा कसा राहील, त्या योगे घराण्याला स्थैर्य लाभून मागील व पुढील पिढ्यांना व पर्यायाने समाजाला स्थैर्य कसे लाभेल यासाठी अनेक नियम आणि कायदे प्रस्थापित केले गेले. विवाह हा स्थिर आणि सुप्रजाकारक कसा होईल ही काळजी वैदिक काळापासून आधुनिक काळापर्यंत प्रत्येकाला सदैव लागलेली दिसत असते. याच काळजीतून विवाह संस्थांची उभारणी होत राहते. पती-पत्नी यांचं वैवाहिक संबंधांमुळे निर्माण होणारं सामाजिक स्थान त्याच दृष्टीने महत्वाचं ठरतं. पती-पत्नींचा परस्परांवर अपेक्षित असणारा विश्वास त्यांच्या नातेसंबंधासाठी महत्वाची भूमिका बजावीत असतो. त्याचं तन-मन एकरूप होण्यासाठी त्यांनाच एकमेकांना समजून घ्यावं लागतं. समाजात त्यांच्यासंदर्भातील निर्माण झालेलं त्यांच्या परस्परसंबंधातलं नात्याचं चित्र अधिक महत्वाचं असतं. ते टिकवून ठेवणं त्याच दोघांवर अवलंबून असतं. प्रत्यक्षात तसं असावंही लागतं. शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, व्यावसायिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या स्वतंत्र वातावरणात वाढलेल्या दोन घराण्यांतील भिन्नलिंगी व्यक्ती एकत्र येऊन त्यांनी जन्मभर एकत्र राहण्याचा विलक्षण प्रयोग समाजाच्या साक्षीने आणि विवाहाच्या रूपाने केला जात असतो. वधूवरांचे यथोचित मनोमिलन हाच विवाहस्थैर्याचा एकमेव मार्ग आहे, हे लक्षात घेऊन ते; विवाह संस्काराने; साध्य करण्याचा प्रयत्न केला जात असून, त्या दृष्टीने विवाहसंस्कारांची आणि ह्या मागील छोट्यामोठ्या विधींची हेतुतः मांडणी केलेली असते.



आधुनिक केसरी

**जाण हेच वर्म | आयुष्याचे ||**
नाम निरंतर | विठोबाचे घ्यावे ||
आणिक स्मरावे | रामकृष्ण ||१||
जागवावा नित्य | आपुला तो धर्म ||
न घडो अधर्म | स्वप्नामाजी ||२||
सनई चौघडा | मांगल्याचे वाद्य ||
भक्तीचा नैवेद्य | प्रिय देवा ||३||
कर्मावीण कैसा | भेटेल श्रीहरी ||
आत्माराम तारी | सर्वकाळ ||४||
नाम कर्म धर्म | एकचि स्वधर्म ||
जाण हेच वर्म | आयुष्याचे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

वाक्कौशलं मनुष्यस्य
दर्पणमिव विद्यते न वा।
ज्ञायते येन तत्तस्य
हानिर्न्यूना हि जायते।।५।।
माणसाचे बोलण्याचे कौशल्य
आरशासारखे असते,
नाही का ? जो ते जाणतो,
त्याची हानी कमी होते.




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**मन प्रसन्न के कर्म में, माया बन्धन जान ।
सन्त विवेकी नहिं करें, करें जो मन नहिं मान ।।३३।।(स्वर्वेद प्रथम मण्डल अष्टम अध्याय) ०१/०८/३३**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

विषयांचा रस घेऊन मन चिरकालापासून संसार सुख भोगत आहे. वारंवार ज्ञान आणि सत्संगाची चर्चा होऊनही ते आपल्या विषयासक्तीला सोडत नाही. म्हणून अध्यात्म-विद्येच्या अधिकारी जनांना सांगितले जाते की, मन प्रसन्न करणाऱ्या पतनशील कर्मांना करू नका. मनाची सर्व शुभ-अशुभ कर्मे बंधनासाठी आहेत तसेच मनाची सर्व कार्ये मायेचे बंधन दृढ करतात. म्हणून अनुभवी विवेकी संत मनाने सांगितलेली कर्मे न करता अशी कर्मे करतात की जी मनाला स्वीकार्य नाहीत. मन आणि आत्म्याचा भेद जाणणारे विवेकी पुरुष मनाला सोडून आत्म्याच्या अनुकूल कार्ये करून आपले जीवन महान आणि यशस्वी बनवतात.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## मुर्तीमंत भगवंत भेटला

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


ते अतिथी म्हणून अंबरीषाकडे आले त्याने यथोचीत स्वागत केले. दुर्वासऋषी स्नानाला गेले स्नानासाठी वेळ तर लागला मग सूर्योदयाच्या वेळी उपवास तर सोडायचा आहे हे तर अंबरीषाचे व्रत होते. अंबरीषाने तिर्थ प्राशन केले,आता अतिथीचा अपमान केला म्हणून दुर्वासांनी शाप दिला की तुला मोक्ष मिळणार नाही व पुष्पावती नदी उलटी वाहील तेव्हापासून पुष्पावती नदी उलटी वहाते आहे. अतिथी सत्कारात दोष शोधून दुर्वासांनी अंबरीषाला "तुला जन्ममरण्याच्या फे-यातून मुक्ति मिळणार नाही "असा शाप दिला. आता भक्त संकटात आहे म्हणल्यावर भगवंताला थोडीच चैन पडणार!

## संत 'तू भगवंताचा आहेस' ही जाणीव देतात

आधुनिक केसरी

आपण कोणतेही कृत्य करीत असताना, ज्याकरिता ते कृत्य आरंभिले ते जसे आपल्या डोळ्यांसमोर असते, त्याप्रमाणे नाम घेताना, आपण नाम कशाकरिता घेतले त्याची अखंड जाणीव असावी. ही जाणीव अखंड ठेवणे, मी भगवंताचा आहे हे जाणणे, याचे नाव अनुसंधान ठेवणे. वास्तविक आपण भगवंताचे आहोतच, पण मी विषयाचा आहे असे भ्रमाने वाटू लागले. संत 'तू विषयाचा नाहीस, भगवंताचा आहेस' असे सांगतात. हीच संतांची खरी कामगिरी, आणि याकरिता ते नाम घ्यायला सांगतात. नाम घेणे म्हणजे 'मी विषयाचा नाही, भगवंताचा आहे' असे मनाला सांगणे आणि मनात तशी जाणीव उत्पन्न करणे; आणि ही जाणीव टिकविण्याकरिता पुनःपुनः मनाला तेच सांगणे, म्हणजे तेच नाम सतत घेणे.

तुम्हाला रामदर्शन पाहिजे म्हणता, पण राम तुम्हाला ओळखता कसा येणार ? रामदर्शन व्हायला रामाचे अंतर काटता आले पाहिजे; रामाला पक्के ओळखता आले पाहिजे. याकरिता अंतःकरणाची पवित्रता पाहिजे; शुद्ध भाव पाहिजे. सर्व काही साधने केली, पण भाव नसेल तर ती व्यर्थ होतात. कालांतराने त्यामुळे भाव उत्पन्न होईल हे खरे. पण भाव ठेवून साधने केली म्हणजे प्राप्ती लवकर होते. नवविधा भक्तीमध्ये सोपी आणि मुख्य भक्ती म्हणजे अर्पण करणे ही होय. आपण सर्वस्वी देवाचे होऊन राहावे म्हणजे आपण जे काही करतो ते सर्व अर्पणच होते.



ज्याने त्याने आपले हित ओळखून वागणे हे जरूर आहे. कल्याणाचा मार्ग कुणीही दाखवील, पण त्याप्रमाणे वागणे हे ज्याचे त्याच्याकडे आहे. बंधनाला खरे कारण परिस्थिती नसून आपल्याच मनाची ठेवण हे आहे. कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही काळात आणि वाटेल त्या अवस्थेत घेण्यासारखे एक भगवंताचे नाम तेवढे आहे. आहे त्या परिस्थितीत पूर्ण समाधान राहणे ही देवाची पूर्ण कृपा होय.अग्नीचा उपयोग तो करून घेणाऱ्यावर आहे; तसा देवाचा उपयोग जसा करावा तसा होतो. परमेश्वराच्या ध्यानाने सिद्धी येतात आणि सिद्धी तर त्याज्य; मग परमेश्वराचे ध्यान करूच नये की काय ? तर ध्यान हे सिद्धी मिळविण्याकरिता करू नये. परमेश्वर-प्राप्तीकरिता निष्कामबुद्धीने ध्यान करावे, म्हणजे परमेश्वर सिद्धीचे अडथळे दूर करतो. साधू सिद्धींचा उपयोग कधीही करीत नाहीत; ते परमात्मस्वरूपात मिळून गेलेले असतात. सर्व गोष्टी ते परमात्म्यावर सोपवितात आणि त्याच्या इच्छेनेच केव्हा केव्हा चमत्कार झाल्याचे साधूंच्या चरित्रात दिसते.

**आजचे बोधवचन आहे -
साधूजवळ कधीही व्यावहारिक गोष्टी मागू नयेत, त्या प्रारब्धावर सोपवाव्यात.**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**यद्ददामि विशिष्टेभ्यो यच्चाश्नासि दिने दिने । तत्ते वित्तमहं मन्ये शेषं कस्यापि रक्षसि ॥ स्पष्टीकरण – संसारात धनाला फार महत्त्व आहे. धनाच्या बळावर अनेक उपभोग्य वस्तू आपल्याला मिळविता येतात. सगळा संसार धनावरच चालत असतो. पण असे असले तरी द्रव्याचे खरे महत्त्व आणि खरा उपयोग प्रत्येकाने समजून घेतला पाहिजे सत्कार्थी दान आणि कुटुंबातल्या माणसांसह त्याचा सदुपभोग ( व्यसनासाठी खर्च नव्हे ) यासाठी जे खर्ची पडते, तेवढेच खरे धन होय कवडी कवडी जमवून केवळ धनाचे हंडे भरले, तर ते कोण्या भलत्याच माणसाला शेवटी आयते मिळतील.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, ९ मे २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# आगामी नीट निकालात IIB देणार महाराष्ट्राला सुखद धक्का

## ऐतिहासिक निकालाची होणार पुनरावृत्ती..

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर/नांदेड :** विद्यार्थ्यांचा ओसंडून वाहत असलेला आनंद, विद्यार्थ्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर दिसत असलेले समाधान" हे चित्र दिसून आले आजची NEET-2023 परीक्षा झाल्यानंतर. याला कारणही तेवढेच मोठे आहे. या उत्साहवर्धक कारण ठरले ते म्हणजे "महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड" म्हणून नावलौकिक झालेल्या आयआयबी इन्स्टिट्यूटमुळे. आयआयबीने मागील दोन वर्षांपासून आपल्या संस्थेत डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांवर जी मेहनत घेतली ती आज फळाला आहे. आयआयबीने NEET परीक्षेच्या धर्तीवर ज्या स्टॅण्डर्डच्या परीक्षा घेतल्या त्याच पद्धतीचा पेपर आल्याने आणि त्यातील प्रश्नही आयआयबीने जे काढले होते तेच आज झालेल्या मुख्य परीक्षेत आल्यामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी टीम आयआयबीचे सोशल मीडिया, फोन करून आभार व्यक्त केले. एमबीबीएस, बीडीएस यांसह अन्य विविध वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या वतीने NEET (UG) परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा आज, दि. 7 मे रोजी पार पडली. दरम्यान, आतापर्यंत असंख्य विद्यार्थ्यांना डॉक्टर घडविण्यात सिंहाचा वाटा असणाऱ्या आयआयबी हाच NEET चा पॅटर्न आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. कारण आयआयबीने NEET परीक्षेच्या धर्तीवर ज्या स्टॅण्डर्डच्या सराव परीक्षा घेतल्या त्याच पद्धतीचा पेपर आला. जे शिकविले त्यातीलच प्रश्न आयआयबीने जे काढले होते तेच आज झालेल्या मुख्य परीक्षेत आले, हे खुद्द विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी टीम आयआयबीशी संपर्क साधून सांगितले. आज सायंकाळी 5:20 ला पेपर सुटल्यानंतर हजारो विद्यार्थी बाहेर आले, आपापल्या सोयीनुसार आपल्या सोबत आलेल्या आपल्या पालकांसोबत आपल्या स्वगृही परत असताना त्यांनी आजच्या पेपरबद्दल समाधान व्यक्त केले. आयआयबीने जी तयारी करून घेतली तेच प्रश्न तंतोतंत आजच्या मुख्य NEET परीक्षेत पेपर आल्यामुळे "मला परीक्षेत चांगले यश मिळणार" हे जणू विद्यार्थ्यांचा ओसंडून वाहत असलेला आनंदावरून दिसून येत असलेलं त्यांच्या पालकांना समजताच त्यांनी टीम आयआयबीकडे प्रतिक्रियांचा पाऊस पडला. प्रत्येक विद्यार्थी PCB चा पेपर केवळ आयआयबीचे मोडूल, टेस्ट पेपर, इतर मटेरियल व योग्य मार्गदर्शनामुळेच सोपा गेल्याच्या प्रतिक्रिया देत होता. तरी पालक आम्हास अशीच प्रेरणा आणि आपले आशीर्वाद देत रहा आणि आयआयबीच्या प्रत्येक ऐतिहासिक रेकॉर्ड ब्रेक निकालाचे साक्षीदार व्हा या शिक्षणाच्या वारीत व गुणवत्तेच्या आनंदवारीत सहभागी व्हा असे आवाहन टीम आयआयबीच्या वतीने पालकांना आणि विद्यार्थ्यांना केले आहे. दरम्यान, या यशामागे विद्यार्थ्यांसाठी जीवापाड मेहनत घेणारे राष्ट्रीय पातळीवर तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग, सर्व संचालक, व्यवस्थापक, असिस्टंट, ऑपरेटर, प्रिंटर, एक्साम डिपार्टमेंट, एक्झामिनर, डिझाइनर...इतर सर्व प्रत्यक्ष अप्रत्यक्ष विद्यार्थ्यांसाठी अहोरात्र काम करणाऱ्या आयआयबी परिवारातील सर्व सदस्यांनी केलेले कठोर परिश्रम आहे.

महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड IIB SINCE 1999



आज NEET परीक्षा संपल्यानंतर आयआयबी बद्दल विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ऐकून आम्ही प्रेरित तर नक्कीच झालो परंतु तितकेच भारावून पण गेलो आहोत. कारण परीक्षा सुटल्यानंतर येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर पेपर सोपा गेल्याचे स्मित हास्य व पालकांच्या चेहऱ्यावर असलेले समाधान सर्व काही सांगून गेले. आता "आयआयबी"ला आतुरता आहे निकालाची. कारण येणारा निकाल हा निश्चितच ऐतिहासिक असणार यात तिळमात्र शंका नाही. त्यामुळे "आयआयबी हाच NEET चा पॅटर्न आहे" हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

– प्रा. चिराग सेनमा, डायरेक्टर, आयआयबी इन्स्टिट्यूट



# पंचायत समिती अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज


**धुळे :** पंचायत समिती धुळे येथील कनिष्ठ सहाय्यक ३५०० रुपये ची लाच घेताना रंगेहात पकडले.आरोपी शामकांत सोनवणे हे तक्रारदाराकडून आठ ते दहा दिवसापासून वारंवार समक्ष भेटून व मोबाईल वरून पैशांची मागणी करत असल्याचे तक्रारदार यांनी सांगितले सदर आरोपी विरुद्ध पश्चिम देवपूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आली आहे . श्यामकांत नानाभाउ सोनवणे , कनिष्ठ सहायक , बांधकाम विभाग , पंचायत समिती , धुळे यांनी तक्रारदार यांचेकडुन ३,५०० / रु लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विकारतांना त्यांना रंगेहाथ पकडले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे . तक्रारदार हे पंचायत समिती धुळे येथे शाखा अभियंता या पदांवर कार्यरत असुन ते एप्रिल २०२२ पावेतो रत्नपुरा बीट येथे नेमणुकीस होते . सदर कालावधीतील सदर बिटचे विभागीय लेखापरीक्षण ( ऑडीट ) झाले होते.

सदर झालेल्या लेखा परिक्षणांच्या नावाने बक्षिस म्हणुन कनिष्ठ सहायक श्री श्यामकांत सोनवणे हे तक्रारदार यांच्या कडे सुमारे ०८ ते १० दिवसांपासुन वेळोवेळी प्रत्यक्ष भेटीत व मोबाईल वर कॉल करून ३५०० / - रुपये लाचेची मागणी करीत असल्यांची तकारदार यांनी सोमवार रोजी ला.प्र . वि . धुळे कार्यालयात तक्रार दिली होती तक्रारदार यांनी दिलेल्या तकारीची आज दि .०८.०५.२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान कनिष्ठ सहायक श्यामकांत सोनवणे यांनी तक्रारदार यांचेकडे ३५०० / - रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करून सदर लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या कडुन पंचासमक्ष स्विकारतांना त्यांना आज रोजी रंगेहात पकडण्यात आले असुन यांचे विरूद्ध देवपुर पश्चिम पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १ ९ ८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे . सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक धुळे विभागाचे पोलीस उप अधीक्षक अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री प्रकाश झोडगे, पोलीस निरीक्षक श्री मंजितसिंग चव्हाण, तसेच राजन कदम , शरद काटके, भूषण खलाणेकर, भुषण शेटे, संतोष पावरा, गायत्री पाटील, प्रशांत बागुल रामदास बारेला, मकरंद पाटील, प्रविण पाटील, रोहीणी पवार, सुधीर मोरे, जगदीश बडगुजर यांनी केली आहे सदर कारवाईस नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक मा . शर्मिष्ठा वालावलकर , अपर पोलीस अधीक्षक मा श्री नारायण न्याहाळदे व वाचक पोलीस अधीक्षक नरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शन लाभले आहे . सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

# ऋषी सुनक ठरतेय बेस्ट सेलर; दिगंबर दराडे लिखित पुस्तकाची आठ दिवसात तिसरी आवृत्ती

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्यावर पत्रकार दिगंबर दराडे यांनी लिहिलेलं पुस्तक बेस्ट सेलर ठरत आहे. अवघ्या पाच दिवसांमध्ये 2000 प्रतींची तिसरी आवृत्ती सुरू करण्यात आली आहे. लंडन येथे जाऊन दराडे यांनी आपल्या पुस्तकामध्ये सुनक यांच्या व्यक्तीमत्वाच् विविध पैलू उलगडले आहेत. युवक युवतींकडून मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे डिजिटल माध्यमांमुळे समोर आले आहे. इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती व सुधा मूर्ती यांचे ते जावई आहेत. ज्या देशाने आपल्यावर दीडशे वर्ष राज्य केले त्या देशाचा पंतप्रधान एक भारतीय वंशाचा आणि हिंदू आहे. या अभूतपूर्व घटनेने भारतीय म्हणून आपली छाती नक्कीच फुलून येत आहे. एक स्थितप्रज्ञ, हिंदू संस्कृतीचा अभिमान बाळगणारे, मंदिरात जाऊन पूजा करणारे गोपूजा करणारे, गीतेवर हात ठेवून खासदारकीची शपथ घेणारे ब्रिटनचे पंतप्रधान पाहून भारतीयाला त्यांचा अभिमान वाटतो आहे. आपले कर्तव्य हाच आपला धर्म आहे हा विचार पक्का करून ते जोमाने कामाला लागले आहेत दिवस-रात्र मेहनत करत आहेत. माय मिररचे मनोज अंबिके म्हणाले, ऋषी यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकाला चांगला प्रतिसाद मिळत असून चार दिवसांमध्ये आम्ही तिसरी आवृत्ती काढण्याचा निर्णय घेतला आहे. याच बरोबर हे पुस्तक विविध भाषांमध्ये आणण्याचाही आमचा संकल्प आहे.




मी ब्रिटिश नागरिक आहे . येथे माझे घर आहे . हा माझा देश आहे परंतु माझा धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा भारतीय आहे . माझी पत्नी भारतीय आहे . मी एक हिंदू आहे आणि याचा मला सार्थ अभिमान आहे . –**ऋषी सुनक**




# आरोप-प्रत्यारोपांची राळ

आधुनिक केसरी

कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा सोमवारी (दि.८ मे) सायंकाळी थंडावल्या आहेत. १० मे रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर गेले काही आठवडे कर्नाटकमध्ये आरोप-प्रत्यारोपांची राळ उठलेली दिसली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सबंध कर्नाटक राज्य पिंजून काढले. अनेक मतदारसंघांत रोड शो आणि जाहीर सभांच्या माध्यमातून मोदी यांनी भाजपाचा प्रचार केला. या वेळी मोदी आणि भाजपाकडून गांधी परिवाराला लक्ष्य करण्यात आले. गांधी परिवाराला देश तोडायचा आहे. त्यासाठी काँग्रेस पुढाकार घेत असून देशाच्या हिताविरोधातले वर्तन त्यांच्याकडून होताना दिसत आहे, असा आरोप पंतप्रधान मोदी यांनी केला. म्हैसूर जिल्ह्यातील नंजनगुड येथे प्रचारफेरीच्या माध्यमातून कर्नाटकमधील प्रचाराचा शेवट करत असताना मोदी यांनी रविवारी हा आरोप केला. ते म्हणाले, काँग्रेस पक्षाच्या शाही परिवाराचा देशातील राजकारणावर प्रभाव आहे. त्यांनी छुप्या पद्धतीने परकीय शक्तींशी हातमिळवणी केली असून ज्यांना भारत आवडत नाही, अशा परकीय नेत्यांसोबत त्यांच्या बैठका झाल्या आहेत. ते पुढे म्हणाले की, तुकडे तुकडे गँगचा विचार काँग्रेसमध्ये इतक्या वरच्या पातळीवर पोहोचेल, असा विचार मी कधी केला नव्हता. काँग्रेसच्या शाही परिवाराने कर्नाटकच्या निवडणुकीत आपली मर्यादा ओलांडली आहे. देशाच्या भावना आणि परंपरांना त्यांनी नख लावले आहे. मी दुःख व्यक्त करत सबंध हिंदुस्तानवासीयांना सांगू इच्छितो की, काल शाही परिवाराने कर्नाटकच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याची भाषा वापरली. याचा अर्थ तुम्हाला कळला का? जेव्हा एखाद्या देशाला स्वातंत्र्य प्राप्त होते, तेव्हा तो देश सार्वभौम देश असल्याचे मानले जाते. काँग्रेस कर्नाटकाला जेव्हा सार्वभौम म्हणते, याचा अर्थ कर्नाटक भारतापेक्षा वेगळा आहे, असे काँग्रेसला सुचवायचे आहे का? असा सवाल पंतप्रधान मोदी यांनी सभेत उपस्थित केला. तुम्हाला हे मान्य आहे का? असे विधान केल्याबद्दल काँग्रेसला शिक्षा द्यायला हवी की नको? याचा अर्थ कर्नाटकाला भारतापासून वेगळे करण्याची भाषा काँग्रेसकडून केली जात आहे. मला कधी वाटले नव्हते की, तुकडे तुकडे गँगचा परिणाम काँग्रेसमध्ये एवढ्या वरच्या पातळीपर्यंत जाईल, असेही ते म्हणाले. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वाड्रा यांनी बंगळुरू येथील जाहीर सभेत पंतप्रधान मोदींच्या या आरोपाला प्रत्युत्तर दिले. त्या म्हणाल्या, पंतप्रधान विकास आणि महागाईचे मुद्दे विसरले आहेत आणि मला ते सांगत असलेले आंतरराष्ट्रीय षडयंत्र समजू शकलेले नाही. पंतप्रधानांना अजूनही समजलेले दिसत नाही की, लोकांना त्यांचे दैनंदिन प्रश्न आणि अडचणींवर चर्चा हवी आहे.

# बाजार समितीच्या निवडणुकीत लक्ष्मीदर्शन हेच प्रभावी शस्त्र ठरले ?

आधुनिक केसरी



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

**बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात पारंपारिक वर्चस्व अबाधित करणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका खेळीमेळीच्या वातावरणात पार पडताना अपवाद परिवर्तन झाले पण ज्यांची संस्था त्यांच्या ताब्यात असं चित्र पुढे आलं. वर्तमान राजकिय व्यवस्था आणि आदर्श लोकशाही याची वजाबाकी करताना खरंच लोकशाहीचं राजकारण राहिलं का?असा प्रश्न पुढे येतो. त्याचं कारण जेवढ्या बाजार समितीच्या निवडणुका झाल्या, त्या निवडणुकीत लक्ष्मीदर्शनाचा प्रभाव ज्यामुळे गटाचा विजय हेच चित्र समोर आलं. पुढाऱ्यांनी कमावलेला पैसा मतदार बाहेर काढू शकतो हे देखील प्रत्यक्ष डोळ्यांनी पहायला मिळालं. ज्यांच्या बाजार समित्या ताब्यात आल्या ते पुढारी सुखाने झोपले असं नव्हे. कारण एक बाजार समितीची निवडणुक एका गटाला जवळपास कोटीच्या उडुाणात गेली. चुरस लढती अटीतटीच्या ठरल्या पण पैसा हाच प्रभावी शास्त्र जो देगा उसका भला त्याहुन अधिक सांगायचं झालं तर अनेकांनी दोन्ही गटाकडून गुलाबजामुन खाल्ले पण ज्यांचा गुलाबजामुन अधिक गोड त्यांच्या पारड्यात आपलं पुण्य टाकलं.**

बाकी काही असलं तरी सहकारातल्या निवडणुका मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल लक्ष्मीदर्शनानेच गाजल्या. आता उगीच एकमेकांवर आरोप करणं कोण म्हणतं याने मदत केली नाही तर कुणी म्हणतं त्याने पैसा खर्च केला नाही. ही चर्चा बालीश बहुबायकात बडबडल्या सारखी म्हणता येईल. निसर्गाचा आणि राजकारणाचं सद्याचं चित्र सारखंच झालं म्हणावे लागेल. भर उन्हाळ्यात नदीला महापुर यावर कुणाचा विश्वास बसणार नाही. अवकाळी वादळ वारा घरावरचे पत्र कुठे घेवुन जाईल सांगता येत नाही. तसं चित्र राजकारणाचंसुद्धा आहे. कारण तेही अवकाळीच बनलं असुन कोणता पुढारी कोणत्या वेळेस कोणत्या गटाला मदत करेल हे सांगणं अवघड. दुसरी महत्वाची गोष्ट संस्था असो किंवा पुढाऱ्याचे राजकारण असो ही मंडळी वारेमाप आर्थिक लुट करते. हे आता लपुन राहिलं नाही. त्यामुळे मतदारांना नक्कीच वाटते की आपल्या जीवावर सुरू असलेली आर्थिक उलाढाल निवडणुकीच्या माध्यमातुन उपसा करायला सहज वाटते. गंमत बघा, निवडणुका कुठल्याही असो येणाऱ्या काळात सर्वांच्यासाठी अवघड विषय निश्चित होणार. कारण लोकशाहीच्या जगात आर्थिक व्यवहाराने घातलेला धुमाकुळ आदर्श लोकशाहीसाठी घातक म्हणावा लागेल. अगदी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासुन सहकार असो की कुठल्याही निवडणुका असो शिक्षण क्षेत्राच्या निवडणुका देखील मोठ्या प्रमाणावर मतदारांना लक्ष्मीदर्शनाचा योग येतो. मागच्या महिन्यात बीड जिल्ह्यात मार्केट कमिटीच्या निवडणुका खुप गाजल्या. कडा बाजार समितीची निवडणुक भाजपाच्या ताब्यात अगोदरच आली होती. बीड, केज, अंबाजोगाई, परळी, माजलगाव, वडवणी, गेवराई या निवडणुकासह इतर निवडणुकांची रणधुमाळी सर्वांनिच पाहिली. एक गोष्ट खरी आहे सहकारी संस्थेच्या निवडणुकीत प्रस्थापितांचं वर्चस्व नेहमीच अबाधित राहिलेलं असतं. अपवाद कुठे तरी परिवर्तन होते ज्याप्रमाणे बीड बाजार समितीच्या निवडणुकीत जयदत्त क्षीरसागराविरूद्ध सर्व विरोधकांनी एकत्रित येवुन चमत्कार घडवला. भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के हे देखील राष्ट्रवादीचे आ.संदिप




क्षीरसागरांच्या संगतीला होते. गंमत बघा, राज्याचं राजकारण आणि बाजार समितीचे राजकारण अर्थात राजेंद्र मस्केच्या हातभाराने महाविकास आघाडीच्या बाजार समिती ताब्यात आली पण भाजप जिल्हाध्यक्षाचा टेकू महत्वाचा ठरला. कदाचित स्थानिकचं राजकारण ज्यात पैसा हे देखील जमेची बाजु. केज बाजार समिती निवडणुक चुरशीची झाली. पण पारंपारिक रमेश आडसकरांनी बाजी मारली. वडवणीत लोकांना भविष्याचं गणित कळालं. तिथेही आ.प्रकाशदादा गटाने यश मिळवले. माजलगाव बाजार समिती निवडणुक खुपच गाजली. मोहन जगताप, नितीन नाईकनवरेंनी आ.सोळुंकेंना आवाहन उभा केले. दुसऱ्या बाजुने जेष्ठ राजकारणी माजी आ.राधाकृष्ण पाटील यांचं शहराच्या राजकारणात अजुनही वर्चस्व अबाधित असल्याचे चित्र पुढे आलं. कारण अटीतटीच्या निवडणुकीत दोन जागा त्यांच्या गटाला मिळणं यावरून त्यांचीही ताकद राजकीयदृष्ट्या महत्वाची वाटते. शहराच्या राजकारणात राधाकृष्ण पाटील हुकुमी एक्का हे सत्य कुणी नाकारू शकत नाही. भाजपाचा पराभव झाला पण दिलेली लढत आणि मिळवलेली मते पहाता अगदी निसटता पराभव म्हणावा लागेल. कदाचित निवडणुकपुर्व रंगात सारे भाजपवाले गटतट विसरून एकत्र आले असते आणि राधाकृष्ण पाटलांचा गट देखील सोबत असता तर कदाचित त्या बाजार समितीवर भाजप विचाराचं वर्चस्व निर्विवाद सिद्ध झालं असतं. मोहन जगताप यांनी तालुक्याच्या राजकारणात दाखवुन दिलेली ताकद कमी राहिली नाही हे तितकंच खरं. परळीत काय होणार ? याचं चित्र पुर्वरंगात सर्वांना माहित होतं. त्यामुळे ही बाजार समिती आ.धनंजय मुंडे अर्थात राष्ट्रवादीच्या ताब्यात राहिली. अंबाजोगाईत बाजार समितीत भाजप बाजी मारण्याची शक्यता वाटायची. पण इथेही राष्ट्रवादी पक्षाने बाजी मारली.एकुणच राग रंग आणि समोर आलेली चर्चा तथा पुढारी आणि कार्यकर्त्याला आलेला अनुभव पाहाता बाजार समितीची निवडणुक लक्ष्मीदर्शनाच्या भोवती फिरली हा सार मात्र बाहेर पडला. एवढी आर्थिक उलाढाल झाली की मतदारांनी अनेक ठिकाणी दोन्ही गटाचे पैसे घेतले ज्याचा एक रूपाया जास्त मिळाला त्याला मतदान देवुन टाकलं. मग तिथे निष्ठा, विचार, तत्व बाशनात गुंडाळले. म्हणूनच कुठल्याही निवडणुका आता सोप्या राहिल्या नाहीत. चांगले पुढारी निवडणुकीच्या फंद्यात पडायला तयार होणार नाहीत भविष्यात अशी परिस्थिती आहे. कारण नेतृत्वाने पैसा खर्च करावाच अशा धारणा आता निवडणुक लढवणाऱ्या उमेदवारांच्या होवुन बसल्या.त्यामुळे कोण काय म्हणालं ?, आरोप कुणी कुणावर केले ? यापेक्षा बाजार समितीच्या निवडणुकीत लक्ष्मीदर्शनाचा प्रभाव ठळकपणे समोर आला जो देगा उसका भला हाच मंत्र सर्वत्र चालला. पुर्वी सहकारात असं चित्र असायचं की मतदान दोन दिवस अगोदर एक तर सहलीला घेवुन जायचं नाही तर कुठंतरी ठेवायचं पण आता आर्थिकदृष्ट्या अत्यंत अवघड होवुन बसलं. कुठेतरी मतदाराला ठेवलं तरी ओटी भरल्याशिवाय तो मतदानाच्या गाडीत बसायला तयारच होत नाही हे अगदी जवळुन लोकांनी पाहिलं. दुसरी गोष्ट ज्यांनी बाजार समिती ताब्यात घेताना करोडो रूपये खर्च केले त्या संस्थेत आता भ्रष्टाचार तर रितसर मार्गाने अगदी सनदशीर म्हटल्याप्रमाणे बोकाळल्याशिवाय रहाणार नाही कारण गेलेला पैसा काढायचा कसा ? दुसरं महत्वाचं म्हणजे आपल्या राजकिय जागलीवर वर्षानुवर्षे आपणच दावा सांगु तर कदाचित सारे विरोधक एकत्र आले तर आपला राजकियदृष्ट्या पराभव होवु शकतो हे बीडमध्ये झालेल्या परिवर्तनातून दिसुन आले. दुसरं महत्वाचं म्हणजे वर्षानुवर्षे तेच चेहरे आणि तेच सहकारी हा विषय आता पुळचट झाला असुन पुढाऱ्यांना देखील निवडणुक प्रक्रियेत नविन चेहरे तथा युवकांना संधी देणे क्रमप्राप्तच आहे. बाजार समितीच्या निवडणुकीत अनेक ठिकाणी चेहरे बदल न केल्याचा फटका पराभुत गटाच्या नेतृत्वाला बसला. ज्याचं उदाहरण बीड बाजार समितीचं द्यायला हरकत नाही. असो. सहकारातल्या निवडणुकीची रणधुमाळी संपली. आता सभापती पदासाठी रस्सीखेच होणारच पण या निमित्ताने लक्ष्मीदर्शन हेच निवडणुकीतलं प्रभावी अस्त्र म्हणून समोर आले हे मात्र नक्की.

# पाकिस्तानशी यारी, देशांसोबत गद्दारी

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**संरक्षण संशोधन संस्थेत (DRDO) मध्ये उच्च पदावर असलेले प्रदीप कुरुलकर यांना पाकिस्तानशी केलेली मैत्री चांगलीच महागात पडली.भारताचा शत्रू आसलेल्या पाकिस्तानला भारतासोबत गद्दारी करत पाकिस्तानला गुप्त माहिती पुरविल्या उघड झाले आहे. त्यांना गुप्त माहिती पुरवल्या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. मुंबई एटीएसने केलेल्या तपासात अनेक धक्कादायक माहिती समोर आली आहे. व्हॉट्सअॅप आणि व्हॉईस मेसेजद्वारे ते पाकिस्तानशी संपर्कात होते. तसेच त्यांनी परदेश दौरेही केल्याचे स्पष्ट झाले आहे. २०२२ पासून ते पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या संपर्कात होते. मुंबई एटीएसनंतर आता संशोधन आणि विश्लेषण विभाग (रॉ)कडून त्यांची चौकशी केली गेली. डॉ. प्रदीप मोरेश्वर कुरुलकर (वय ५९, रा. दिघी) असे या शास्त्रज्ञाचे नाव असून, ते दिघी येथील अभियांत्रिकी संशोधन व विकास संस्थेचे (आर अँड डीई- ई) संचालक आहेत.**

ही संस्था संरक्षण दलांना अभियांत्रिकीबाबत लागणाऱ्या सुविधांबाबतचे संशोधन करते. ती संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेचा ( डीआरडीओ ) एक भाग आहे. कुरुलकर यांच्याविरोधात 'डीआरडीओ'च्या दक्षता आणि सुरक्षा विभागाचे संचालक कर्नल प्रदीप राणा यांनी तक्रार केली होती. त्यावरून 'एटीएस'ने कुरुलकर यांना अटक केली. त्यांना नऊ मेपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश शिवाजीनगर न्यायालयाने दिला आहे. कुरुलकर यांच्यावर मुंबई येथील 'एटीएस'च्या काळाचौकी पोलिस ठाण्यात शासकीय गुपिते अधिनियम १९२३च्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास 'एटीएस'च्या पुणे युनिटच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुजाता तानवडे करीत आहेत.

डॉ. कुरुलकर येत्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस निवृत्त होणार होते. 'एटीएस'ने आतापर्यंत त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत त्यांनी फारशी माहिती दिली नसली, तरी त्यांच्या समाजमाध्यमांवरील त्यांचे खाते; तसेच व्हॉट्सअॅप क्रमांक यांच्या आधारे तपास करण्यात येत असल्याचा दावा 'एटीएस'कडून करण्यात आला आहे.

कुरुलकर ३८ वर्षांहून अधिक काळाच्या सेवेत डीआरडीओ'च्या अनेक महत्त्वांच्या प्रकल्पांवर काम केले आहे. माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यासोबतही त्यांनी काम केले आहे. 'डीआरडीओ'च्या प्रमुख क्षेपणास्त्रांच्या प्रक्षेपक व ग्राउंड सिस्टीम्सच्या निर्मितीत त्यांची अत्यंत मोलाची भूमिका होती. 'मिशन शक्ती' या उपग्रहभेदी क्षेपणास्त्राच्या प्रक्षेपकाची निर्मिती त्यांच्याच नेतृत्वाखाली झाली होती. ज्या संस्थेत त्यांनी कामाची सुरुवात केली, त्याच संस्थेचे नेतृत्व करण्याची संधीही त्यांना मिळाली. 'आउटस्टँडिंग सायंटिस्ट' या श्रेणीमधील शास्त्रज्ञ असलेले कुरुलकर यांच्या बाबतीत असे काही घडेल, असे त्यांच्या परिचयाच्या कोणालाच वाटले नव्हते. गुरुवारी सायंकाळनंतर हे



वृत्त पुण्यासह सर्वत्र पसरल्यानंतर या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू झाली. वास्तविक अशा शास्त्रज्ञांना स्मार्टफोन वापरण्यास बंदी असल्याने कुरुलकर असा फोन खरोखरच वापरत होते का, असा प्रश्न त्यांच्या काही निकटवर्तीयांनी उपस्थित केला आहे. प्रामुख्याने हनीट्रॅपचे प्रकरण असल्याचे सांगितले जात आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञाला सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर महिलांचे फोटो वापरुन अडकल्याचे पुढे आलेय. त्यानंतर तो पाकिस्तानस्थित गुप्तचरांच्या संपर्कात आला. तो गेल्या वर्षी सप्टेंबर-ऑक्टोबर या कालावधीत व्हॉईस संदेश आणि व्हिडिओ कॉलद्वारे पाकिस्तानस्थित ऑपरेटर्सच्या संपर्कात होता आणि त्याने काही संवेदनशील माहिती पाकिस्तान गुप्तहेरांना पुरवल्याची संशय होता, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. पाकिस्तानी एजंट म्हणून त्यांने काम केल्याचा संशय व्यक्त होत आहे. त्यादृष्टीने तपास करण्यात येणार आहे. खरं तर हनी ट्रॅपची प्रकरणे सातत्याने चर्चेत येत असतात. काही महिन्यांपूर्वीच नोव्हेंबर २०२२ मध्ये दिल्ली पोलिसांनी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयात काम करणाऱ्या एका वाहनचालकाला अटक केली होती.हनी ट्रॅप मध्ये अडकल्यानंतर हा ड्रायव्हर पाकिस्तानमध्ये एखाद्या व्यक्तीला गुप्त माहिती पुरवत आहे, असं सुरक्षा संस्थांनी पोलिसांना सांगितल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती. हनी ट्रॅप करण्याची प्रक्रिया म्हणजे एखादं प्रेमळ किंवा लैंगिक नातं बनवून एखाद्या व्यक्तीकडून गुप्त माहिती काढून घेणं अशी असते. या माहितीचा वापर एखादी मोठी रक्कम मिळवण्यासाठी किंवा राजकीय कारणांसाठी केला जाऊ शकतो.गेल्या दशकभरात भारतासह इतर अनेक देशांमध्ये हनी ट्रॅपची अनेक प्रकरणं समोर आली. यामध्ये बेकायदेशीर पद्धतीने वसुली किंवा ब्लॅकमेल करण्याचा समावेश आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वसंत मुंडे यांना राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज आदर्श स्मृती पत्रकारिता पुरस्कार प्रदान

## वृत्तपत्राचे अर्थकारण आता बदलणे काळाची गरज : वसंत मुंडे

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदपूर :** पत्रकारीता हा सामाजिक वसा आहे. छोट्या बातमीतुनही मोठा परिणाम होतो. म्हणुनच वृत्तपत्रसृष्टीमुळे लोकशाही खऱ्या अर्थाने बळकट होत आहे. मात्र त्याच लोकशाहीचा हा चौथा स्तंभ आर्थिकदृष्ट्या कमकुवत होत आहे. ही उणीव भरुन काढण्यासाठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे जो प्रयत्न करत आहेत त्यामुळे भविष्यात पत्रकारांना देखील चांगले दिवस येतील असे मत अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले. तर जुनी परंपरा बदलून आता वृत्तपत्राचे अर्थकारण बदलणे काळाची गरज आहे. असे मत पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केले.

लातुर जिल्ह्यातील अहमदपूर येथे शुक्रवार दि. 5 मे रोजी सकाळी 11 वाजता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, तालुका शाखा अहमदपूरच्या वतीने राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज आदर्श स्मृती पत्रकारीता पुरस्कार पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना यथोचित सन्मानाने प्रदान करण्यात आला. तसेच कै. पत्रकार गजानन भुसारे स्मृती पुरस्कार अहमदपूरचे ज्येष्ठ पत्रकार दिनकरराव मंदेवाड यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य अहमदपूरकर महाराजांचे उत्तराधिकारी राजशेखर गुरू शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तर अध्यक्षस्थानी अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील हे होते. त्याचबरोबर प्रमुख अतिथी म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती शिवानंद हिंगणे, नुतन संचालक शिवाजीराव खांडेकर, जिल्हा परिषद सदस्य माधव जाधव, नगरसेवक अभय मिरकले, डॉ.ऋषीकेश पाटील, पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, लातुरचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे, अहमदपूर तालुका शाखेचे अध्यक्ष विश्वांभर स्वामी आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना आमदार बाबासाहेब पाटील म्हणाले, राजकारण आणि पत्रकारीता हे रेल्वे रुळाच्या दोन पट्ट्या असून त्या एकसमान चालल्या तर लोकशाही मजबूत होऊ शकते. या दोन्ही लोकशाहीच्या महत्वपूर्ण खांबाने व्यसनमुक्ती समाज उभा करण्यासाठी एक लोकचळवळ निर्माण करणे गरजेचे आहे. सामाजिक जाणीवेचे भान ठेवून पत्रकार संघाचे वसंतराव मुंडे यांनी आवाहन केल्याप्रमाणे आता वाचकांनी देखील वृत्तपत्रांची किंमत योग्य ती स्वीकारण्याची मानसिकता निर्माण केली पाहिजे. जर वृत्तपत्र टिकली तरच लोकशाही मजबूत राहू शकेल असे मत व्यक्त केले. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे म्हणाले, वृत्तपत्राचे अर्थकारण हे काळानुसार बदलणे गरजेचे आहे. पत्रकारीता अधिक सक्षम होण्यासाठी वृत्तपत्रसृष्टीच्या अर्थकारणावर भर देण्यासाठी आम्ही लोकजागृती चळवळ उभी केली आहे. त्याचे परिणाम आता सकारात्मक दृष्टीकोणातून पुढे येत आहेत असे मत व्यक्त केले. या प्रसंगी व्यासपीठावरील मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पत्रकार संघाच्या वतीने महावितरणच्या सत्तर कर्मचाऱ्यांची सर्व रोग निदान मोफत तपासणी प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. ऋषीकेश पाटील यांच्या रुग्णालयात करण्यात आली. महावितरणचे शहर अभियंता सतीश गुडे, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष लातुर झोनचे बालाजी कांबळे तसेच राजकुमार पुणे यांची उपस्थिती होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष उदय गुंडीले, सचिव शिवाजी गायकवाड, उपाध्यक्ष सुरेश डबीर, बालाजी तोरणे पाटील, कोषाध्यक्ष बालाजी पारेकर, संघटक मासूम शेख, महादेव महाजन, बसवराज पाटील मानखेडकर, चंद्रकांत शिंदे, धम्मानंद कांबळे, अजय भालेराव आदिंनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.बालाजी करमुंगीकर व मारुती बुद्रुक पाटील यांनी केले. तर आभार शिवाजी गायकवाड यांनी मानले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास आणि मोफत आरोग्य तपासणी शिबीरास अहमदपूर पंचक्रोशीतील मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.






## शाहू महाराज स्मृतीशताब्दी सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपीपरी :** गोंडपीपरी तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, भंगाराम तळोधी येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सोहळा व इयत्ता १ली ते ७ वी पर्यंतच्या वर्गाचा वार्षिक निकाल समारंभ उत्साहात पार पडला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून सुधाकर मडावी सर मुख्याध्यापक तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रणिता उईके मॅडम आणि प्रमुख अतिथी म्हणून दुशांत निमकर केंद्र प्रमुख, श्रावण गुंडेटटीवार, सुधीर सहारे, आनंद मेश्राम, अनिल चोखारे, विकास झाडे, आकाश झाडे सर, अरुण झगडकर, राजेश्वर अम्मावार, तानाजी अल्लीवार इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्याने प्रथमतः राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे प्रतिमेला माल्यार्पण करून औपचारिक उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण सुधीर सहारे यांनी करत विद्यार्थ्यांना उत्तीर्ण झाल्याबद्दल अभिनंदन करत पुढील सत्रासाठी शुभेच्छा दिल्यात. या कार्यक्रमात इयत्ता १ ली ते ७ वी वर्गाचा वार्षिक निकाल वर्गानुसार जाहीर करून गुणपत्रिका वितरित करण्यात आले. मंचावर उपस्थित सर्व शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांना मौलिक असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.सरिता चौधरी वर्ग-६ वा हिने केले तर आभारप्रदर्शन तनवी बुर्रीवार, वर्ग-६ वा या विद्यार्थीनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मीना-राजू मंच, शालेय मंत्रिमंडळ यांचे सहकार्य लाभले.

## इतरांना आनंद देण्यासाठी, महिलांनी आधी स्वतः आनंदी राहायला शिकलं पाहिजे : विद्या बालन

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** आपल्या आयुष्यात अनेक वेगवेगळ्या भूमिका बजावत असताना प्रत्येक महिला इतरांच्या आनंदासाठी कायम मेहनत घेत असते. पण हे सगळं करत असताना ती तिचा आनंद किंवा तिचं स्वतःचं अस्तित्वंच विसरुन जाते, अशी भूमिका अभिनेत्री विद्या बालन यांनी मांडली. फिक्की - फ्लो च्या पुणे चॅप्टरच्या नूतन अध्यक्षा सौ. रेखा सतीश मगर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ शुक्रवारी, ५ मे रोजी सायंकाळी संपन्न झाला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विद्या बालन उपस्थितांशी संवाद साधताना पुढे म्हणाल्या की, प्रत्येक महिला आयुष्यात अनेक भूमिका निभावत असते. ती एक पत्नी असते, बहीण, आई आणि इतरही खूप काही असते. या सगळ्या भूमिका बजावत असताना, ती कायम इतरांच्या आनंदासाठी प्रयत्नशील असते. दरम्यान तिच्या स्वतःच्या आनंदाकडे मात्र दुर्लक्ष होते. त्या पुढे म्हणाल्या, त्यामुळे सगळ्या महिलांना माझा एकच सांगणे आहे की, त्यांनी स्वतः आधी आनंदी राहायला शिकलं पाहिजे. जर त्या आनंदी, समाधानी असतील तर इतरांना आनंदी ठेवणं त्यांना सहज शक्य आहे. यातून त्यांचं एक स्वतःच अस्तित्व निर्माण होईल, जे अतिशय गरजेचं आहे. त्याचबरोबर महिला सक्षमीकरणासाठी व त्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने काम करणाऱ्या फिक्की फ्लोसारख्या संस्थांचे देखील त्यांनी खूप आभार मानले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पुणे चॅप्टरच्या नूतन अध्यक्षा सौ. रेखा सतीश मगर या होत्या. फिक्की - फ्लोच्या पुणे चॅप्टरचे नेतृत्व करण्याची संधी मिळणे, ही अभिमानाची गोष्ट असल्याचे सौ.मगर यांनी त्यांच्या मनोगताच्या सुरवातीला नमूद केले. त्या पुढे म्हणाल्या की, आगामी वर्षात आम्ही आमच्या कार्य विस्तारावर अधिक लक्ष केंद्रित करणार आहोत. त्याचबरोबर महिलांना उद्योगवाढीत मदत करण्याबरोबरच त्याच्यासाठी सुदृढ आणि लोकशाही पद्धतीचे वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने काम करणार आहोत. त्यातूनच त्याच्यांमध्ये कौशल्य विकास, नावीन्य, व्यावसायिक दृष्टीकोन निर्मिती होईल व त्यांचा उद्योगातील सहभाग वाढेल आणि आर्थिक प्रगती होईल. जेव्हा 'ती' ची प्रगती होईल, तेव्हा जगाची देखील प्रगती होईल.

महाराष्ट्र Business Katta












# रस्त्यांचा दर्जा सुधारला; पण माणसे नाही



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**सांगली जिल्ह्यात विटा शहराजवळ व जतजवळ झालेल्या अपघातात तब्बल नऊ जणांना प्राण गमवावे लागले. सोलापूर जिल्ह्यात टेंभुर्णीजवळ झालेल्या अपघातात चारजण दगावले. एक-दोन मृत्यू तर नित्याचेच झाले आहेत. प्रवास करताना पुरेशी झोप व रात्रीच्या वेळी, विशेषत: पहाटेचा प्रवास टाळण्याची गरज आहे. अलीकडच्या काळात रस्त्यांची सुधारणा झाली असल्याने वाहने सुसाट वेगाने धावू लागली आहेत. चांगल्या रस्त्यांकडे विकासाचा मापदंड म्हणून पाहिले जाते.पण त्यांचा वापर करणाऱ्या लोकांनी प्रवास करताना पाळावयाची आपली कर्तव्ये आणि वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष केले तर त्याचा परिणाम कधीच सुखद होऊ शकणार नाही.**

अलीकडच्या दिवसांत या विषयावरील अभ्यासातून असे सांगण्यात आले आहे की, अत्यंत किरकोळ निष्काळजीपणामुळे अपघात होत आहेत आणि ज्या प्रमाणात लोकांचे प्राण गमवावे लागत आहेत, ती चिंतेची बाब आहे. पण या आकड्यांवरून ना सरकारला फारशी चिंता वाटत आहे, ना जनता यातून बोध घेत आहे. आणखी एक विशेष बाब म्हणजे अशा अपघातांमध्ये केवळ मोठ्यांनाच जीव गमवावा लागतो आहे असे नाही, तर त्यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या लहान मुलांनाही नाहक जीव गमवावा लागतो आहे, हेही अत्यंत खेदजनक आहे. याबाबतीत नुकतीच दिल्ली शहरातील आकडेवारी पुढे आली आहे. एकट्या दिल्लीत गेल्या तीन वर्षांत एक ते सतरा वयोगटातील एकशे एकसष्ट मुलांना आपला जीव गमवावा लागला आहे, यावरून याचा अंदाज बांधता येतो. आता अशा अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांपैकी बहुतेकांना काही खबरदारी घेतली तर त्यांचा जीव वाचवता येईल, असा सर्वसाधारण निष्कर्ष आहे. मात्र या प्रकरणातील बहुस्तरीय निष्काळजीपणामुळे अपघातांचा वेग रोखला जात नाही, तसेच त्यात मृत्यूमुखी पडणाऱ्या लोकांनाही वाचवता येत नाही.

वाहतुकीचे नियम न पाळणे, अतिवेगाने वाहन चालवणे, हेल्मेट आणि इतर सुरक्षा उपकरणे परिधान करण्याकडे दुर्लक्ष करणे ही वाहन अपघातात गंभीर जखमी होण्याचे सर्वात मोठे कारण आहे, हे लपून राहिलेले नाही. तसेच रस्त्यावर, काही क्षणांतच योग्य निर्णय घेण्याच्या असमतोलामुळे, मोठे अपघात होतात आणि त्यानंतर हे घटक कोणाचीही जगण्याची उरलीसुरली आशा नष्ट करतात. यामुळे आता विनाकारण दुचाकीवरील मुलांनाही रस्त्यावरून वाहने चालवताना हेल्मेट सक्तीचे करण्यासारखे उपाय योजावे लागतील. आणि तशी मागणीही केली जात आहे. शासनदेखील यावर गंभीरपणे विचार करताना दिसत आहे. एकीकडे नियमानुसार अंमलबजावणी करण्याबाबत सरकारकडून विनंती केली जात आहे, तर तिथले लोक याकडे इतके दुर्लक्ष करतात की त्यामुळे नेमका कोणाचा तरी जीव जातो. याला ट्रॅफिकबाबत आवश्यक प्रशिक्षणाचा अभाव म्हणता येईल, पण त्याहीपेक्षा इतरांच्या जीवाबद्दलच नव्हे तर स्वतःच्या सुरक्षेबाबतही जागरूकता



नसल्याचा हा परिणाम आहे. अनेकवेळा एखादी व्यक्ती वाहन चालवताना आपल्या आजूबाजूला किंवा समोर कोणी नाही असे गृहीत धरते आणि एकतर अगदी किरकोळ कारणानेही अपघाताला सामोरे जाते किंवा मग विनाकारण किरकोळ अपघातानंतर जीवघेण्या पातळीपर्यंत मारहाण करण्याचे प्रकार घडतात. थोडीशी काळजी घेतली तर अपघात होणार नाहीत. वाहनांमध्ये विहित संख्येपेक्षा जास्त माणसे घेऊन अत्यंत असुरक्षित पद्धतीने वाहन चालवले जाते, असे दृश्य अनेकदा पाहायला मिळते. मद्यधुंद अवस्थेत लहान किंवा जड वाहन चालवताना, एखादी व्यक्ती इतरांची काळजी घेण्यास सक्षम नसते किंवा त्याला स्वतःच्या जीवाची चिंता नसते. रात्रीच्या वेळी तर मोठमोठी वाहने सर्रास सुसाट धावत असल्याचा धोका आता लपून राहिलेला नाही.अशा परिस्थितीत, रस्त्यावर चालणाऱ्या किंवा अन्य वाहनातील लोकांमधली लहान मुले सहज अपघाताला बळी पडतात. मोठयांच्या चुकांची शिक्षा लहान मुलांना भोगावी लागत आहे. फक्त रस्त्यावरील वाहतुकीबाबतचे नियम कडक करून चालणार नाहीत तर आपल्या जीवाची आणि इतरांच्या जीवाची काळजी करावी, असेदेखील वाहनचालकांना वाटले पाहिजे. आणि भावना पेरण्याचे काम ट्रॅफिक पोलीस, प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी केले पाहिजे.

# आत्महत्या चिंतेचा विषय..



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**दैनंदिन घडामोडीवर आपण जर बारकाईने लक्ष घातले तर आपल्या परिसरामध्ये कुठे ना कुठे एखादी तरी आत्महत्या झालेली असते. आत्महत्या का होते? लोक आपले जीवन का संपवतात ? जीवन संपवले म्हणजे प्रश्न सुटतात का? अडचणीवर मात करणे किंवा सर्व प्रश्न सोडवणे म्हणजे आत्महत्या हाच मार्ग आहे का? अनेक प्रश्न उपस्थित होतात. जीवन हे एकदाच मिळत असते, ते अनमोल आहे, याची जाणीव असूनही लोक स्वतःच्या हाताने स्वतःचे जीवन संपवून नेमके काय साध्य करतात? हे शोधणे किंवा यावर विचारविनिमय करणे अत्यंत गरजेचे आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आत्महत्या गोरगरीब, श्रीमंत, अडाणी, शिक्षित ,स्त्री पुरुष असा कोणताही भेद न करता प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती आत्महत्या करताना दिसतो.**

सुख समृद्धी व पैसा असलेले लोक सुद्धा आत्महत्या करतात. याचाच अर्थ पैसा सुख समृद्धी ऐशो आराम असूनही माणसाला जगण्याची इच्छा राहत नाही. थोडक्यात आत्महत्या करण्यामागे पैसा सुख-समृद्धी हे कारण नसते. आत्महत्या याचा विचार करताना आपण थोडे मागे जाऊन विचार केला तर आपल्या लक्षात येईल की अध्यात्मिक गुरु असलेले भय्यूजी महाराज करोडो रुपये संपत्तीचे मालक, लोकांना सुखी आनंदी राहण्याचे मार्गदर्शन करणारे, भय्यूज महाराज स्वतः च्या हाताने गोळी झाडून आत्महत्या करतात. बॉलीवूड मध्ये अतिशय मेहनत घेऊन आपले करिअर व स्थान निर्माण करणारा सुशांत सिंह राजपूत प्रसिद्धी, पैसा, वैभव असतानाही आत्महत्या करतो. त्यानंतर अनेक शासकीय नोकरीवर असलेले गट अ व ब मधील अनेक अधिकाऱ्यांनी आत्महत्या केल्याचे समोर आलेले आहे. आजही आजूबाजूला स्वतःला शिक्षित समजणारे तरुण-तरुणी आत्महत्या करतात. तरूण आत्महत्या का करतात ? त्यांच्या मनामध्ये आत्महत्या करण्याचे विचार का येतात हे बघून आत्महत्यांना प्रतिरोध करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण जीवन संपवून प्रश्न सुटत नाहीत. आणि दुसरी बाब म्हणजे जेव्हा घरातील व्यक्ती आत्महत्या करतात, तेव्हा ते पूर्ण कुटुंब उध्वस्त झाल्यासारखे होते. कुटुंबाचा आधार व मानसिक खच्चीकरण झालेले असते. कुटुंबासमोर अनेक समस्या निर्माण झालेल्या असतात. आणि त्याचे निवारण करणे सहज व सोपे नसते. म्हणून आत्महत्या थांबणे अत्यंत आवश्यक आहे. या आत्महत्या थांबवण्यासाठी एकमेव उपाय म्हणजे समुपदेशन. परंतु समुपदेशनाबाबत भारतीय समाजामध्ये अजूनही जागरूकता नाही. एखाद्या व्यक्तीचा अपघात झाला तर लाखो रुपये हॉस्पिटलमध्ये खर्च करतो, एखाद्या व्यक्तीवर एखादी केस झाली तर लाखो रुपये कोर्टकचेरी मध्ये खर्च करतो, एखाद्या विद्यार्थ्याच्या शिक्षणावर लाखो रुपये खर्च होतात, परंतु समुपदेशन यासाठी भारतीय लोक पाहिजे तसा खर्च करत नाहीत. एक साधी गोष्ट असते मोबाईल घेतल्यानंतर आपण लगेच त्याला स्क्रीन गार्ड लावतो, आणि मोबाईलला नियमितपणे अपडेट करत असतो. जो मोबाईल एकदा हरवला, फुटला, बिघडला त्याला आपण पुन्हा विकत घेऊ शकतो, अशा मोबाईलची आपण जीवापेक्षा जास्त काळजी घेतो. परंतु जे जीवन पुन्हा येणे कधीच शक्य नाही. व एक व्यक्ती गेल्यानंतर त्याची जागा भरून काढणे हे शक्य नाही. या बाबीवर मात्र आपण कधीच लक्ष देत नाही. सुख,संपत्ती,पैसा असलेले प्रत्येक वयोगटातील स्त्री पुरुष आत्महत्याचा मार्ग निवडतात. हे आपण डोळ्याने बघतोय. होऊ शकते उद्याचा आत्महत्या करणारा व्यक्ती आपल्या भागातील सुद्धा सदस्य असू शकतो. आपल्या घरातील सदस्य गेल्यानंतर घरावर काय दुःख पसरेल त्याची कल्पनाही करू शकत नाही. म्हणून प्रत्येकाने कुटुंबातील प्रत्येक सदस्याचे समुपदेशन करणे गरजेचे आहे. समुपदेशनातून शंभर टक्के आत्महत्या थांबतील असे मुळीच नाही. परंतु आत्महत्येवर नियंत्रण येऊ शकते हेही मात्र तेवढेच खरे. अपघात झाला किंवा व्यक्ती आजारी असली तर लाखो रुपये खर्च करून आपण त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करतो. परंतु त्या आजाराचे निदान होईलच किंवा प्रत्येक अपघातातून व्यक्ती वाचलेच याची शाश्वती नसते. हा पण सकारात्मक विचार, अपेक्षा ठेवून उपचार करत असतो. तीच गोष्ट समुपदेशक यांच्याबाबत आहे. व्यक्तीच्या मनामध्ये कोणते विचार चालू आहेत. तो डिप्रेशनमध्ये गेलाय का ? कारण डिप्रेशन मध्ये जाऊनच आत्महत्या होत असतात. जर आपण डोक्यातून डिप्रेशन बाजूला काढले, तर अनेक आत्महत्या थांबू शकतात. डिप्रेशन मध्ये गेलेली व्यक्ती मध्ये अनेक बदल होतात. कोणाला न बोलणे, किंवा ते बोलणे कमी असणे, थोडक्यात काय तर दैनंदिन जीवनापेक्षा थोडे वेगळे जीवन व कृत्य डिप्रेशन मध्ये गेलेल्या व्यक्तीचे असते. हे जर आपण थांबवले किंवा यावर जर आपण समुपदेश केले तर मात्र आपण होणारी आत्महत्या टाळू शकतो. सर्वात महत्त्वाचे आत्महत्या करणे मागे जास्तीत जास्त प्रमाणात कारण आहे ते म्हणजे स्वतःची बदनामी. अनेक लोक बदनामी होऊ नये म्हणून आत्महत्या करत असतात. माणूस म्हटलं तर माणसाच्या हातून चूक आहे होणारच,परंतु झालेल्या चुकीमुळे आपली बदनामी थांबवण्यासाठी अनेक लोक आत्महत्येचा मार्ग निवडतात. परंतु या मार्गामुळे बदनामी तर थांबत नाही, परंतु व्यक्ती गेल्यानंतरही त्या व्यक्तीची मोठ्या प्रमाणात बदनामी होऊन, त्या कुटुंबाची ही बदनामी होते. कुटुंबाला लाजिरवाणे जीवन जगावे लागते. म्हणून कुटुंबातील व्यक्तींना विश्वासात घेऊन समुपदेशनातून जर व्यक्तीच्या समस्या समजून घेतल्या, त्यांचे दुःख समजून घेतले, आणि त्याला मानसिक आधार दिला तर बदनामीची भीती माणसाच्या मनामधून हळूहळू कमी होते. आणि जेव्हा बदनामीची भीती माणसाच्या मनामधून कमी होते त्यावेळेस माणसाच्या डोक्यामध्ये आत्महत्येचे विचार येत नाहीत. म्हणून कुटुंबातील प्रत्येक सदस्याने एकमेकांसोबत सर्व गोष्टी हसत खेळत सांगणे आवश्यक असते. आणि काही ठिकाणी काही गोष्टी सांगणे शक्य होत नसेल तर, कुटुंबाने समुपदेशकाच्या माध्यमातून महिन्यातून,सहा महिन्यातून, वर्षातून काही दिवस कुटुंबातील सदस्यांची समुपदेशन करणे आवश्यक आहे. म्हणजे डोक्यातील चुकीचे विचार दूर होऊन व्यक्ती डिप्रेशन मध्ये न जाता आत्महत्येचा विचार न करता जीवन जगण्याचे आशेचे किरण निर्माण होईल. व आपल्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीवर एखादे संकट, एखादी समस्या असेल तर ती सर्वांनी मिळून सोडवता येईल. म्हणून कुटुंबाने एकमेकांसोबत वागताना विश्वासाने व मैत्रीपूर्ण वागावे. आणि जसं आपण डॉक्टर कडे जातो तसे समुपदेशकांचा सल्ला आवर्जून घ्यावा. तरच आत्महत्या थांबू शकते, अन्यथा आत्महत्या केलेल्या व्यक्तीच्या घरातील परिस्थिती बघितली तर कुटुंबाची जीवन उदास व दुर्बल झालेले असते. शिवाय आत्महत्या केलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला बदनामीला सामोरे जावे लागते. अनेक प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. एखाद्या व्यक्तीने एखादा प्रश्न केला तर अजून कुटुंबाला दुःख होते. या सर्व बाबींचा विचार करून आपण आत्महत्या करावी का हे प्रत्येक जागृत व सुशिक्षित व्यक्तीने विचार करून कुटुंबाचे कसे होईल याची जाणीव ठेवून, आपल्यामुळे कुटुंबावर दुःख होऊ नये याची काळजी घ्यावी. चिडचिड होत असेल, एखादा व्यक्ती गुमसुम राहत असेल, एखाद्या व्यक्ती नेहमी विचार करत असेल, एखाद्या व्यक्तीचे जेवन कोणताही आजार झाला नसताना कमी झाले असेल, एखादी व्यक्ती एकांतात राहत असेल तर अशा व्यक्तींना समुपदेशक यांच्या कडे घेऊन जाणे अत्यंत गरजेचे आहे. तरच आत्महत्या थांबतील. कोणत्या कुटुंबातील सदस्य केव्हा आत्महत्या करेल किंवा त्यांच्या डोक्यात विचार येईल हे काही सांगता येत नाही. आपले हसते खेळते आयुष्य कुटुंब कधीही दुःखात जाईल हे सांगता येत नाही. म्हणून प्रत्येकाने समुपदेशकांचा सल्ला घेणे आवश्यक असते.

# आपणच हुशार ही भावना मुलांना बिघडण्यासाठी कारणीभूत



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपल्या मुलांचं हित व्हावं त्यांचं आयुष्य व्यवस्थित घडाव आपण जे मिळवु शकलो नाहीत ते मुलांना मिळावं. एकंदरीत मुलांचं हित व्हावं अहित होऊ नये हिच सर्व आई वडील यांची प्रामाणिक इच्छा असते. आणि त्या साठी आपल्या मुलांनी आपल ऐकावं अथवा आपण सांगितलेला मार्ग अवलंबला पाहिजे. असं बहुतेक सर्व आई वडीलांना वाटत असतं. पण मुलांची मथुरा वेगळी कडे निघालेली असते. आपण स्वतः खुप हुशार ज्ञानी आहोत आई वडील यांना फार काही कळत नाही अशा आविर्भावात मुलं वावरत असतात. मग हि वैचारिक दरी दैनंदिन वाढत जाते. त्याचा परिणाम सध्या बहुतेक पालक चिंतेच्या छायेत आहेत. मुलं मनासारखं वागत नाहीत हिच त्यांच्या मनात सल आहे पण व्यक्त होता येत नाही.**

आधुनिक केसरी

दिवसेंदिवस युग बदलतं असल्याने विचारात अंतर पडत आहे. पालकांच मत विचारात घ्याव ऐकावं याची आवश्यकता सध्या मुलांना वाटत नाही. विचार जुळण हाच एकसंघतेचा मजबूत आधारस्तंभ असतो .पण पालक व मुलं यांच्या विचारांतील अंतर वाढलं असल्याने सध्या सगळीकडेच पालक वर्गात चिंतेच वातावरण आहे. याच कारण हि तसंच आहे . बहुतांश मुलं हि पालकांच ऐकत नाहीत हिच वस्तुस्थिती आहे. चांगल्या गोष्टी शिकण्यासाठी अवगुण मुक्त होण्यासाठी अज्ञाधारक पणा गरजेचा असते. अज्ञाधारकपणा हिच जीवनातील सगळ्यात मोठी शिदोरी असुन हि शिदोरी नेहमी सोबत असली पाहिजे. पण सध्या हिच महत्वाची शिदोरी कोणालाही नको आहे. आपल्याकडं ज्ञान किती आहे हे महत्वाचं नसुन आपल्या मध्ये अज्ञाधारक पणा किती आहे हेच जीवनात महत्त्वाच असत. जो कोणाच्या तरी अज्ञेत असतो. तो बिघडण्याची सुताराम शक्यता नसते. पण जो अज्ञेत नसतो तो घडण्याची शक्यता फार कमी असते. म्हणून आयुष्यभर कोणाच्या तरी अज्ञेत असलच पाहिजे. जो अज्ञेत राहत नाही तो अनियंत्रित असल्याने तो कधी बिघडेल याची शाश्वती नसते. अनियंत्रित पणे धावताना आपण स्वतःच प्रचंड नुकसान करून घेतो. वेग किती जास्त आहे याला महत्त्व नसुन नियंत्रण हे महत्वाचं असतं. सध्या प्रचंड मोठ्या प्रमाणात मुलं बिघडत चालली आहेत हे सध्याच् भयान वास्तव आहे. अभ्यास न करणं , मोबाईल पाहणं, गुंडागर्दी कडे आकर्षित होण, व्यसनाच्या विळख्यात आडकण, स्टटं करणं, प्रचंड राग जोपासण या सह अनेक अवगुणांचा प्रचंड प्रभाव असणं, या बाबी सध्या मुलांच्या मनात मोठ्या प्रमाणात बळावत असल्याने हि धोक्याची घंटा आहे. वेळे सोबत विचारसरणी बदलतं आहे. बदलणं गरजेचं आहे पण संस्कार आणि संस्कृती याला बाधा येता कामा नये. अन्यथा विचारसरणी बदलतं असताना आपण आपल्या पायावरच घाव घालतोय का याचा विचार झाला पाहिजे. हाच घाव आपल्या पायावर होणार नाही याची काळजी दक्षता घेतली गेली पाहिजे. पण आपण हि काळाजी न घेता विचारसरणी बदलतोय असं होतं असताना त्याचे विघातक परिणाम पण अपेक्षित असतात आणि तसे परिणाम हि येतात. जन्मदात्या आई वडील यांच्या पेक्षा आपण हुशार आहेत. या आविर्भावात मुलं वावरत असताना एवढी हवेत जातात कि आपले आई वडील यांना आपल्या एवढं सुद्धा कळत नाही. असा समज होऊन आई वडील यांच्या प्रत्येक सल्ल्याला कात्रजचा घाट दाखवत आहेत. आई वडील यांना फार काही कळत नाही उमजत नाही मग त्यांचं सल्ला कशाला ऐकायचा अशी मुलांची मनस्थिती मनोवृत्ती बळावत असल्याने हिच मनोवृत्ती मुलांचं भविष्य बिघडण्यासाठी कारणीभूत ठरत आहेत. दोन चार पुस्तकं वाचली दोन चार वर्ग शिक्षण झालं म्हणजे आपण खुप शहाणे होत नाही.

# आपले संविधान कधी आणि कसे तयार झाले ?



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र. : 7276526268

आधुनिक केसरी

**आपण आपल्या संविधान निर्मातीचा प्रवास बघत आहोत.... आता, घटना कशी बनवली जाईल, हे ठरवण्यासंदर्भात १३ डिसेंबर १९४६ रोजी 'पं. जवाहरलाल नेहरू' यांनी संविधान सभेत 'संविधानाच्या उद्देशिकेचा प्रस्ताव' मांडला. त्यात 'घटनात्मक संरचनेची मूलतत्त्वे व तत्वज्ञान' देण्यात आलेले होते. १३ डिसेंबर ते २२ जानेवारीपर्यंत यावर विस्तृत चर्चा होऊन, शेवटी तो 'उद्देशिका प्रस्ताव' मंजूर करण्यात आला. २२ जुलै १९४७ रोजी 'तिरंगा ध्वजाला' भारताचे 'राष्ट्रीय ध्वज' म्हणून स्विकृती देण्यात आली. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. देशाच्या फाळणीनंतर संविधान सभेची सदस्य संख्या २९९ झाली. या समितीच्या एकूण ११ बैठका झाल्या. त्या १६६ दिवस चालल्या. त्यापैकी ११४ दिवस घटनेच्या मसुद्यावर चर्चा करण्यासाठी वापरण्यात आले.**

समितीच्या २२ उपसमित्या जलद कामकाजाच्या दृष्टीने कार्यरत होत्या. त्यात सर्वात महत्त्वाची होती 'मसुदा समिती'. संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी 'मसुदा समिती' तयार करण्यात आली. या मसुदा समितीच्या पहिल्याच बैठकीत '२९ ऑगस्ट १९४७' ला मसुदा समितीचे 'अध्यक्ष' म्हणून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांची निवड करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आलेल्या मसुदा समितीत एकूण 'सात सदस्य' होते, ते पुढील प्रमाणे...

१ ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर -- अध्यक्ष
२ ) अलादी कृष्णस्वामी अय्यर
३ ) डॉ. कन्हैयालाल मुन्शी
४ ) गोपालस्वामी अय्यंगार
५ ) मोहम्मद सादुल्ला
६ ) टी.टी. कृष्णम्माचारी ( 'डी.पी. खैतान' यांच्या मृत्यूनंतर नियुक्ती )
७ ) एन्. माधवराव ( 'बी. एच्. मित्तर' यांनी राजीनामा दिल्यानंतर निवृत्ती )

भारत सरकारच्या राजपत्राद्वारे 'घटनेचा मसुदा' जनतेच्या माहितीसाठी व जनतेकडून सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला. संविधान सभेने घटनेच्या मसुद्यावर '४ नोव्हेंबर १९४७ पासून २६ नोव्हेंबर १९४९' पर्यंत एवढा प्रदीर्घ काळ चर्चा केली. या चर्चेदरम्यान नागरिकांकडून आलेल्या '७६३५ पैकी २४७३' सूचनाही सभेने विचारार्थ घेतल्या.





भाग - ३

संविधान सभेने '२ वर्ष, ११ महिने व १८ दिवस' या दीर्घ कालावधीत संविधान पूर्ण केले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी 'घटना स्वीकृत' करण्यात आली. २४ जानेवारी १९५० रोजी उपस्थित असलेल्या २८४ सदस्यांनी घटनेवर सह्या केल्या. २६ जानेवारी १९५० पासून घटनेची अंमलबजावणी सुरू झाली. अर्थातच, संविधान निर्मितीत अनेक मान्यवरांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहेत, ज्यांचा उल्लेख स्वतः बाबासाहेबांनी आपल्या शेवटच्या भाषणात केला आहे. या सर्व प्रक्रियेत मसुदा समितीचे अध्यक्ष ह्या नात्याने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांची भूमिका अतिशय महत्त्वाची राहिली. मसुदा समितीचे अन्य सदस्य आजारपण, परदेशात वास्तव्य, मृत्यू अशा अनेक कारणांनी या कामात सहभाग देऊ शकले नाही. त्यामुळे संविधान सभेत सदस्यांनी केलेल्या विविध सूचना कायदेशीर भाषेत आणि सर्वमान्य अशा पद्धतीने शब्दबद्ध करणे, तसेच चर्चेतील मुद्यांबाबत इतर देशांच्या संविधानामध्ये असलेल्या तरतुदी सदस्यांच्या माहितीसाठी प्रस्तुत करणे, या जबाबदाऱ्या एकटे बाबासाहेब पार पाडत होते. आणि म्हणूनच त्यांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' असे म्हटले जाते. अतिशय कठीण परिस्थितीत देखील आपल्या संविधान निर्मात्यांनी जगातील 'सर्वोत्कृष्ट संविधान' बनवून आपणास दिलेले आहे. यासाठी आपण 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' आणि 'संविधान सभेच्या सर्व सदस्यांचे' सदैव ऋणी राहिले पाहिजे. **क्रमशः...**

# 'निखाऱ्याचा गुलमोहर' प्रकाश जंगले यांची तळागाळाच्या माणसांसाठी इन्कलाबची रास्त मागणी करणारा कविता संग्रह !

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : २५

आधुनिक केसरी

**प्रा. डॉ. प्रकाश जंगले हे ठाणे येथील महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत. मुळात गंगाखेड तालुक्यातील 'रुमणा जवळा' या छोट्याशा खेड्यातले जिल्हा परीषद शाळेत शिकलेले. संत जनाबाई महाविद्यालयात पदवी, ज्ञानोपासक महाविद्यालयातुन पदव्युत्तर आणि यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागात प्रा.डॉ धर्मराज तांदुळजेकर सरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपले संशोधन पुर्ण केले आहे. "ठाणे जिल्ह्यातील भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या समुह विमा योजनेचा एक चिकित्सक अभ्यास" हा त्यांचा संशोधन विषय होता जो त्यांनी सखोल मांडला आणि पीएच डी पदवी प्राप्त केली.**



शिक्षणासोबतच जंगले महोदयांनी परीस्थितीचे चटके खात खात महोदयांनी मन आणि मस्तकाचा विकास घडवून आणला.तल्लख बुद्धीमत्ता आणि आव्हाणं पेलण्याचं पुरोगामी सामर्थ्य अंगी असल्यानं... 'जावू तिथं पाणी काढू' या उक्ती प्रमाणे आपलं कर्तुत्व सिद्ध केलं आणि आज ठाणे येथे अर्थशास्त्र विषयाचे तज्ञ प्राध्यापक म्हणून नावारुपास आले आहेत याचा आम्हा यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या परीवाराला सार्थ अभिमान आहे. बोलता बोलता आपले संशोधन विद्यार्थी डॉ जंगले यांच्या कवितेचं पुस्तक प्रकाशीत झाल्याचं कळालं आणि आमचा चर्चेचा सूर जुळून आला. डॉ जंगले अगदीच आनंदानं आणि रविंद्र बा. जोगदंड जे हल्ली औरंगाबादला सेल टॅक्स असिस्टंट कमीशनर यांचासंदर्भ देवून बोलू लागले आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. रवी माझा परळीच्या नवगन महाविद्यालयीन काळातील संवेदनशील आभ्यासू विद्यार्थी मित्र. मी आणि श्रीकांत सोनटक्के तेंव्हा परळीच्या नवगन महाविद्यायात इंग्रजी विभागात शिकवत होतोत. वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याला मठात तत्कालीन नॉनग्रयांटेड नवगन महाविद्यालयाच्या शैक्षणिक पायाभरणीच्या काळातील कला शाखेत ऐच्छिक इंग्रजी शिकलेल्या आमच्या लाडक्या विद्यार्थ्यांचा संदर्भ दिल्यानं मी जीवाचा कान करुनच ऐकत होतो. असिस्टंट कमिशनर रविंद्र आणि डॉ जंगले महोदय यांच्यी मैत्रीबद्दलही महोदय भरभरून बोलले आणि मला मनस्वी आनंद झाला होताच. रवीसोबतचे आभ्यासू विद्यार्थी प्रा डॉ बालाजी जगतकर आणि इतरही कितीतरी कर्तुत्ववान विद्यार्थी नजरेसमोर तरळून गेले. चहा आटोपल्या नंतर मी डॉ तांदुळजेकर महोदय आणि डॉ जंगले महोदयांना थेट आमच्या इंग्रजी विभागात तासिकेच्या मध्यांतरादरम्यान मी चहा पिवून येईपर्यंत वाचंत लिहित बसलल्या लेकरांकडं घेऊन आलो. मी अशा दुर्मिळ संधी सोडत नाही, थेट लेकरांशी हा कवी आणि जगण्याची आव्हानं जगलेला माणुस म्हणून लेकरांशी बोलता केला.

सवयीनं तासिका संपल्यावर आणि दुसरी कुठली तासिकी मसली म्हणजे लेकरं आमच्या इंग्रजी विभागात वाचंत लिहीत बसताततच.तासिका नंतर कांही ऐकायचं, ऐकवायचंही असलं तरीही हमखास येतातच.पडले वळण इंद्रिया सकळ म्हणतात तुकोबा तसं आपलं लेकरं इरिस्पेक्टीव्ह ऑफ येनी थींग, बसतात सोबत, छान चर्चा करतात, कळंत नसलेल्या गोष्टी समजून घेतात, एकमेकाला समजावून देतात.आम्ही चहा पिऊन आलो तेंव्हा लेकरं आभ्यासविषयक चर्चाच करत होते.आम्ही सोबत आणलेल्या पाहुण्यांचा परीचय करुन दिला आणि कवी आहेत म्हणून सांगितलं लेकरांना आणि छान कायमस्वरुपी आमच्या मनीषानं तिच्या शाळेतल्या लेकरांनी बनललेली आणि आदरपुर्वक पाठवलेला पेपरची फार सुंदर गुच्छ देऊन इंग्रजी आणि अर्थशास्त्र विषयांच्या वतीने जंगले सरांचा हार्दिक सत्कार केला, छान लेकरांशी जोडून दिलं. जंगले सर आपल्या डॉ तांदुळजेकर सरांचे पीएच. डी. चे विद्यार्थी आहेत असं म्हणालो आणि लेकरांच्या नजरेतील जंगले सरांबद्दलचा आदर वाढलेला पाहून मनस्वी आनंद वाटला. अत्यंत हालाखीच्या परीस्थितीत खेडेगावात बालपण गेलेल्या जंगले सरांनी बोलत बोलत ओघा ओघातच आपल्या जडणघडणीतले टप्पे सांगीतले लेकरांना आणि कष्टाला पर्याय नसल्याची ग्वाही दिली. किमान अर्धा पाऊन तास जंगले महोदय लेकरांशी छान संवाद साधंत राहिले आणि कौतुक मिश्रीत आनंदात डुंबून गेलो. कवी आणि प्राध्यापक होण्याच्या वाटेवरीन मान अपमानाबद्दल जंगले महोदय फार अस्थेनं बोलले. ठरवून सगळंच होत नाही मनासारखं तेंव्हा ही नैसर्गीक चाल, रीत मला केंव्हाही मौलिक वाटलेली आहे. 'लेखक / कवी आपल्या भेटीला' या सदरात नोंदवावी अशी ही सुंदर बैठक,असा हा सुंदर माहोल ज्यात जंगले महोदयांनी आमच्या विनंतीवरुन विद्यार्थ्यांना आपल्या कविता ऐकवल्या.

डॉ जंगले सरांचं मनःपुर्वक अभिनंदन आणि मनःपुर्वक स्वागत ! आम्हाला भेटायला आलेला माणुस आम्ही दैवत समजूनच वागवतो, तो आमचा स्वभावच आहे. 'साधू संत येती घरा, तोची दिवाळी दसरा' म्हणाले तुकोबा ते आम्ही तंतोतंत जगतो. त्यातच मोठा आनंद आहे याची खात्री पटली आहे आम्हाला.अनेकदा ठरवूनही मनासारखं घडंत नाही आणि हे सहज सुंदर असं जमून आलं तर मग आम्ही आस्वाद घेणारच.

कवी प्रकाश जंगले यांचा कवितासंग्रह : 'निखा-यांचा गुलमोहर' हा कवितासंग्रह २६ जानेवारी २०२० ला प्रकाशीत झाला आहे. गुलामीच्या जोखडात आडकला हात, पानं, फुलं आणि फुलपाखरांनी बहरलेली उजेडाची पार्श्वभूमी लाभलेली लेखणी धरु पाहतो आहे आणि तळाला आवळणा-या मुठींचा जत्था इन्कलाबची मागणी करताना दिसतो आहे या संग्रहात. मोठं मनमोहक सुंदर मुखपृष्ठ रेखाटलं आहे सतिष खोत या चित्रकारानं. मलपृष्ठावर प्रकाश महोदयांचं स्मित पसरलं आहे. मधु मंगेश कर्णिक आणि डॉ राजेंद्र गोणारकर या साहित्यातील दोन दिग्गजांची पाठराखण आहे. आयएसबीएन टायटलसह शारदा प्रकाशनानं हा दर्जेदार कविता संग्रह काधला आहे.

एकुण एकसस्ट कविता आहेत आणि आषयाच्या दृष्टीनेही विविधता आहे. इथं प्रेमाचीही तितकीच उत्कट कविता आहे जितकी सामाजीक आषयाची कविता आहे. महापुरुषांचं क्रांती प्रवण जगणं आणि सांगणं जसं कवी महत्वाचं समजतो, तसंच प्रियकर-प्रेयशीचंही उत्कट, नुतळ, निर्मळ,निरंतर त्यागी, समर्पीत असणं गरजेचं असण्या बद्दलच्याही कविता आहेत,त्यासाठी मनःपुर्वक अभिनंदन.सवयीनुसार आम्ही कांही फोटो काढले आणि आनंदानं बहरुन कांही व्हीडीओ क्लिपही केल्या.

एक फेब्रुवारी दोन हजार एक्केवीसला महोदय येवून गेले.आज डॉ तांदुळजेकर सरांनी कोरोणा लस घेतल्याची पोस्ट टाकली आणि आम्ही त्यांचं अभिनंदन करताना जंगले महोदयांच्या कवितासंग्रहाची आणि फोटोंची आठवन झाली आणि हा मजकूर पेजवर उतरला त्या सोबत कांही फोटो आणि सुसंवादाच्या क्लिप्सही आहेतच.

**१.जन्म**
**जन्म झाला दुष्काळात**
**माय मनातुनी आनंदली,**
**साखरपान वाटायला**
**बाप गेला गल्लोगल्ली.**

**जन्म माझा दुष्काळात**
**सासर माहेर सुखावलं,**
**पांग फेडील म्हणून**
**तिचं डोळं पानावलं.**

**जन्म माझा दुष्काळात**
**घरी नव्हता दुष्काळ,**
**तूप होतं टाळूसाठी**
**कडक पाण्याची अंघोळ.**

**जन्म माझा दुष्काळात**
**माय दम्याने पडली,**
**इलाजाच्या खर्चासाठी**
**गोष्ट निराळी घडली.**

**जन्म माझा दुष्काळात**
**बाप गेला दूर देशी,**
**आला सवत घेऊन**
**माय असता उपाशी.**

**जन्म माझा दुष्काळात**
**माय कोरडी पडली,**
**तडा गेला सपनाला**
**तिची झोपंच उडली.**

**जन्म माझा दुष्काळात**
**माय येडीपिशी झाली,**
**सवतीच्या बाळांतपणा**
**माय सासरला गेली.**

**जन्म माझा दुष्काळात**
**माय घराबाहेर पडली,**
**सुखी संसाराची तिने**
**आता आशाच सोडली.**

**जन्म माझा दुष्काळात**
**तिची संसार फाटला,**
**उरातला हुंदका**

**२. तुझ्या गालावर खळी**
**आल्या पावसाच्या सरी**
**चिंब भिजलं हे मन.**
**तुझ्या गालावर खळी**
**माझी असण्याची खुण.**

**सांग सांग सखे मला**
**कुठे भेटायला येऊ,**
**आवडीच्या मोग-याला**
**निरोप मी काय देऊ.**
**स्वप्नातली तू गं परी**
**माझ्यासाठी मोठं धन.**

**आज मागणार तुला**
**मागितलं नाही कधी,**
**हात हातात घेऊनी**
**वचन दे मला आधी.**
**नव्या नव्या बागेमधी**
**लावू केवड्याचं बन.**

**तुझा होकार साजणे**
**स्वप्नपुर्तीचा आनंद,**
**दोन जीव एक मिठी**
**स्वर्ग सुखामधी धुंद.**
**सर्व जिंकले मी जग**
**नको मला मानपान.**



# दशविध परीक्षा भाव... आधार आयुर्वेदिक गर्भसंस्काराचा

आयुर्वेद शास्त्रात रुग्णाची अगदी सखोल तपासणी केली जाते. आपण यापूर्वी पाहिले जर अनुवंशिक आजार असतील तर ते पुढच्या पिढीमध्ये जातात परंतु जर आधीच्या पिढी मधील दोष पुढच्या पिढीमध्ये येऊ नये असे वाटत असेल तर आयुर्वेद आणि पंचकर्मचा आधार घेणे गरजेचे आहे. गर्भधारणा राहताना आधुनिक शास्त्रामध्ये गर्भ टिकवण्याचा प्रयत्न केला जातो. नऊ महिने वेगवेगळ्या उपचारांनी आणि गर्भधारणा राहण्याआधी पासून स्त्री आणि पुरुष बीज एकत्र करण्यासाठी प्रयत्न केले जातात. परंतु आयुर्वेद शास्त्रामध्ये मुळात स्त्री आणि पुरुष बीज यांची शुद्धी केल्या जाते. दोष किंवा विकृति स्त्री आणि पुरुष बीजाला चिकटलेले असतात किंवा जीन्सद्वारे एका पिढीमधून दुसऱ्या पिढीमध्ये येणार असतात, त्यांच्यावरती उपचार केले जातात यालाच बीजसंस्कारांमधील बीज शुद्धी असे म्हणतात, पंचकर्म हे स्त्री आणि पुरुष या दोघांमध्येही करणे फायद्याचे ठरते, जेणेकरून उत्तम प्रतीचा गर्भ राहण्यास मदत होते, हे पंचकर्म स्त्री आणि पुरुष यांच्या प्रकृतीनुसार, त्रासानुसार आणि मनाच्या अवस्था नुसार करण्यात येते. आयुर्वेदामध्ये यासाठी दशविध परीक्षा भाव वर्णन केले आहेत, या परीक्षा भावाद्वारे पेशंटवर विशिष्ट उपचार केले जातात जेनेटिक सिक्वेन्सवर चिकटलेले पिढी जात दोष याने दूर करता येतात, हे दशविध परीक्षा भाव पुढील प्रमाणे आहेत.. 1. प्रकृति, 2. विकृति, 3. सारता, 4. संहनन, 5. प्रमाणता, 6. सात्म्यता, 7. सत्वता, 8. आहार शक्ति, 9. व्यायाम शक्ति, 10. वय इत्यादी 10 परीक्षा सूत्राद्वारे व्यक्तीची तपासणी केली जाते.




आणि पुढे त्या व्यक्तीच्या पंचकर्मचा विचार केला जातो.

वरील दहा परीक्षा भावांद्वारे व्यक्तीच्या शरीराचा सखोल अभ्यास केला जातो, यावेळी स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही शरीराची तपासणी करणे गरजेचे असते. जिथे जिथे गरज आहे तिथे तिथे आधुनिक तपासण्यांचा देखील आधार घेतला जातो. साधारणतः ज्या जोडप्याला बाळ हवं आहे त्या दांपत्यास आयुर्वेदिक गर्भसंस्काराचा मूळ पाया समजून सांगितला जातो. शरीर आणि मन या दोघांचे गर्भधारणा राहण्यासाठी निरोगी आणि प्रसन्न असणे अपेक्षित असते. दोघांनाही कुठल्याही प्रकारचा शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक ताण तणाव असता कामा नये. तर आणि तरच उत्कृष्ट अशी संतती प्राप्त होऊ शकेल. पूर्वीच्या काळी स्त्रीची प्रजनन क्षमता उत्तम असायची, त्यामुळे ती साधारणतः आठ ते दहा बाळांतपण सहन करू शकायची, परंतु बदलते वातावरण, बदलती जीवनशैली, अन्नधान्यांचे होत चाललेले हायब्रीडायझेशन, पर्यावरणातील बदल, वेगवेगळ्या प्रकारचे प्रदूषण या सर्व गोष्टींचा परिणाम स्त्रीच्या प्रजनन क्षमतेवर होत चाललेला आहे. आणि यासाठीच स्त्री आणि पुरुष या दोघांचेही सखोल आरोग्य तपासणी करणे म्हणजे नैसर्गिक गर्भधारणेकडचे पहिले पाऊल म्हणण्यास हरकत नाही. आपल्याकडे गर्भधारणा राहत नाही म्हणून आपण उपचार करण्यासाठी दवाखान्यात जातो, परंतु उत्कृष्ट संतती प्राप्त करण्यासाठी प्रथमपासूनच आग्रह धरला तर अनेक अडचणी अलगद सोडवल्या जातात. आयुर्वेदिक गर्भसंस्काराची संरचना वर्णन केलेली आहे ती आजार होऊच नये म्हणून. जर लहानपणापासूनच आयुर्वेदिक जीवन शैलीची निवड केली तर सुखी जीवनाची गुरुकिल्ली असलेले निरोगी शरीर आयुर्वेदीय जीवनशैलीकडे लवकर वळते. दुर्धर असे आजार देखील होत नाहीत, शरीर वेळीच सावध होते. आयुर्वेदिक गर्भसंस्कार हे चिकित्सा पद्धती तर आहेच परंतु निरोगी जीवन जगण्यासाठीचा मिळालेला मार्ग आहे.




**डॉ. मंगल सुरेश ताठे, एम.डी. आयुर्वेद मो. 9168101060 संचालक - शारदा क्लिनिक संचलित शाश्वत आयुर्वेद व गर्भसंस्कार चिकित्सालय, पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर फाउंडर - स्त्री वैद्या संचलित आयुपंख संघटना**


# रजोनिवृत्ती व आयुर्वेद

४२ वर्षाच्या काकु पाच दिवसांपूर्वी हॉस्पिटलमध्ये आल्या.

त्या मला म्हणाल्या की" डॉक्टर हल्ली ना, सारखं उदास आणि निराशच वाटतं ! पूर्वीसारखा कोणत्याच गोष्टीत उत्साह जाणवत नाही. सतत थकल्यासारखं वाटत. घरचेही वैतागले त्यामुळे काय करावं कळतच नाहीये! माझ्या समोरची ही पेशंट नुकतीच चाळीशी पार केलेली होती. या वयात होणारे मानसिक बदल तिला लगेच कळत होते. सर्वसाधारणपणे त्या वयातील स्त्रियांची मुलं मोठी झालेली असतात. आपल्या विश्वात पूर्ण रमलेली असतात. काही वर्षांपूर्वी आई वाचून पण हलत नसणारी मुलं आता मात्र कोशाबाहेर पडलेली असतात. मित्र-मैत्रिणीच्या कोंडाळ्यात हरवून गेलेल्या या मुलांना आता आईची इतकी आठवण येत नाही. तसंच नवऱ्याचं. तो त्याच्या करिअरमध्ये पूर्ण मग्न झालेला असतो. सहाजिकच चाळीशीच्या उंबरठ्यावरच्या या स्त्रियांना मानसिक एकटेपणा घेऊन टाकतो. विशेष म्हणजेच नोकरी अथवा व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांमध्येही हेच बदल दिसतात. मानसिक उदासीन्य स्त्रियांच्या स्वभावा विशिष्ट त्यामुळे त्यांच्या कामातला अथवा करिअर मधला उत्साह संपवू शकते.

त्याचवेळी हा मोस मधील बदल हे उदासीनता वाढवायला मदत करतात. तसेच स्त्रियांमध्ये वाढत्या वयानुसार मेटाबोलिक रेट कमी होत जातो, यामुळे चाळीशीनंतर थोडं तरी वजन वाढायला लागतं. जरासं स्थूल शरीर, मानसिक एकटेपणा आणि हार्मोन्स मधील बदल या सगळ्यांचा परिणाम होऊन या स्त्रिया जास्त चिडचिड करायला लागतात. मासिक पाळीच्या चक्रात होणारे बदलही यादरम्यान बरेच होऊ शकतात. पाळी फार लवकर अथवा जास्त उशिरा येणे, जास्त रक्तस्त्राव होणे, ओटीपोटात जास्त दुखणे या गोष्टी या वयात दिसून येतात. बऱ्याच वेळा स्त्रिया या अतिरिक्त स्त्रावाकडे दुर्लक्ष करतात. घरच्यांच्या ही गोष्ट लक्षात येत नाही परिणामी, शरीरातील रक्ताचे प्रमाण खूप कमी होते. मग तिला खूप अशक्तपणा यायला सुरुवात होते. अशावेळी योग्य वेळीच उपचार होणे फार महत्त्वाचं असतं. काही स्त्रियांना चाळीशी नंतर थायरॉईड हार्मोन कमी झाल्यामुळे खूप प्रकारचे त्रास होऊ शकतात. अचानक खूप वजन वाढणे, अंगावर सूज येणे, जास्त थंडी वाजणे, मानसिक निराश्य ही थायरॉईड हार्मोन्स कमी असण्याची लक्षणे आहेत.

या बाबतीत पतीची भूमिका महत्वाची असते. हळूहळू चेहऱ्यावर व शरीरावर उमटू लागलेल्या वार्धक्यच्या हलक्या खुणा, जरासं स्थूल झालेलं शरीर यामुळे स्त्रीचा आत्मविश्वास कमी झालेला असतो. आता पूर्वीचा आकर्षणपणा आपल्यात नाही, ही भावनाच स्त्रीचं शरीर संबंधातील आकर्षण कमी करत असते. स्वतःच्या शरीराबद्दल ती सेल्फ कोसिअस होत असते. कंबर दुखी बद्दल थोडसं! हा त्रास बहुतेक स्त्रियांना चाळीशीत जास्त जाणवतो. खरं म्हणजे स्त्रियांनी गरोदरपणात व प्रसूतीनंतर बाळाचे स्तनपान चालू असेपर्यंत कॅल्शियमच्या गोळ्या घेणं फार गरजेचं असतं. बऱ्याच स्त्रिया ह्या गोळ्या घेण्याचा कंटाळा करतात. त्याचा परिणाम म्हणजेच ही कॅल्शियमची त्रुट त्यांच्या शरीरात आयुष्यभर राहते आणि मग कंबरदुखीला सुरुवात होते. कॅल्शियम कमी असण्याचा अजून एक तोटा म्हणजेच वेगवेगळे स्नायू हाड अकारण दुखत राहतात.

साधारणपणे पुरुष असो या स्त्री असो 35 नंतर एजिंग प्रोसेस म्हणजे शरीर म्हातारा होण्याची प्रक्रिया सुरू झालेली असते काहीही प्रयत्न न करता तब्येत चांगली राहण्याची शक्यता अशावेळी कमीच त्यामुळे चाळीशीच्या आसपास सर्वांनी चालण्याचा व्यायाम रोज कमीत कमी 45 मिनिटे चालू करायला हवा. रोज योगा प्राणायाम करायला हवे.

स्त्रियांचे मासिक पाळीचे त्रास कंबर दुखी आणि उदासीनता सुद्धा यामुळे कमी होऊ शकते कारण चालण्याने रक्तभिसरणामुळे हार्म संतुलित व्हायला मदत होते, प्राणायम मुळे फ्रेश वाटायला लागतं. पाळीच्या अधि स्तनात दुखणं, अथवा पोटात हलकं दुखणं, पोट फुगल्यासारखं वाटण, यासारखे त्रास चाळीशी जास्त जाणवतात त्यासाठी काही औषध व व्यायाम खूप परिणामकारक आहेत. सध्या आपल्या देशात स्तनाचा कॅन्सरचे प्रमाण खूप वाढलेलं असल्यामुळे 35 नंतर दर महिन्याला स्त्रीने स्वतःची स्तनाची तपासणी करणे गरजेचे आहे. कुठलीही गाठ अथवा त्वचेतील बदल असतील तर डॉक्टरांना दाखवून जरुरीच आहे. वर्षातून एकदा स्तनासाठी मेमोग्राफी व गर्भाशयासाठी pap smear, रक्तातील साखर, ईसीजी थायरॉईड, कोलेस्ट्रॉलचे प्रमाण, यासारख्या तपासण्या करणे गरजेचे आहे. आपल्या देशात दिसणारी दुसरी समस्या म्हणजेच पाळीच्या छोट्या-मोठ्या त्रासासाठी गर्भपिशवी काढण्याचे ऑपरेशन केलं जातं. हल्ली गर्भपिशवी न काढता आयुर्वेदिक औषध उपचारनी बरेच त्रास थांबवता येऊ शकतात त्याबद्दल महिलांनी जागृत असायला हवं. प्रसूतीच्या वेळी स्त्रीला गर्भपिशवीचे तोंड उघडण्या आधीच जर कळा दिल्या तर त्याचा परिणाम म्हणून पुढे विशेषता ४० नंतर योनी मार्गात शिथिलता येते त्यामुळे खोकला येणे, हसण्या, ठसका लागणे, याबरोबर पेशंटला थोडी लघवी होते तसेच लघवी नंतर नियंत्रण कमी होणे, हे खूपच प्रमाणात असतं. पण आपल्याकडील स्त्रिया ही समस्या डॉक्टरांना सांगायला संकोचतात आणि आयुष्यभर या दुखण्याचे ओझं वागवतात. मग अशा स्त्रिया शक्यतो घरात राहणं पसंत करतात. निराशेची शिकार होऊ शकतात. याबाबतीतही स्त्रियांनी मनावर घेऊन डॉक्टरकडे जायला हवं.




या समस्यावर हल्ली खूप चांगले आयुर्वेदिक औषधी उपलब्ध आहेत. शेवटी महत्त्वाचं म्हणजे वसीमतेला हरवण्यासाठी स्त्रीने स्वतःचे सेल्फ एसटी वाढवणे गरजेचे आहे. स्वतःचं व्यक्तिमत्व आकर्षक ठेवणं काही नवे छंद जोपासन नव्या मैत्रिणी तसेच काही नवा छोटा उद्योग अथवा नोकरी सुद्धा करणे हे सगळे यावरचे उपाय आहेत.

रजोनिवृत्ती साठी आयुर्वेदामध्ये औषधी उपचार व काही पंचकर्म सांगितलेले आहेत.




**डॉ. सुचिता अ. सावळे**
**बी.ए. एम. एस. डी.वाय. एन. (पुणे)**
**संपर्क : ८४८५८०३४९०**


# काय तुमचे लहान मूल दररोज अंथरुणामध्ये लघवी करते ?



आपले बाळ अंथरुणात लघवी करत असेल तर आई-वडिलांचा एकमेकांवर आरोप प्रत्यारोप होत असतो; परंतु हा प्रकार रोखण्यासाठी प्रयत्न मात्र काही केले जात नाही असे दिसते , असा प्रकार दिसून आल्यास लहान बाळांवर चिडचिड करणे, त्यांच्यावर ओरडणे , मार देणे, किंवा न्यूनगंड तयार होईल असे आई वडिलांनी वागवणे असे दिसून येते.

नवजात अवस्थेमध्ये मूत्र त्याग करण्याची प्रक्रिया ही पूर्णतः अनैच्छिक असते. परंतु बालक जसा जसा मोठा होत असतो, त्याची मानसिक परिपक्वता व शारीरिक स्नायुवर नियंत्रण येते व आपल्या इच्छेनुसार बालक मूत्र त्याग करत असतो. साधारणपणे पाच वर्षापर्यंत अंथरुणात मूत्रत्याग करण्याचे बालक थांबतो. परंतु जर पाच वर्षानंतर सुध्दा हे बालक अंथरुणात मूत्रत्याग करत असेल तर ती एक प्रकारची विकृती आहे आणि याच विकृतीला शय्यामूत्रता असे म्हणतात.

प्रामुख्याने लहान बाळ अंथरुणामध्ये लघवी करण्याची प्रमुख दोन कारणे असतात.

अ ) मानसिक कारण

ब ) शारीरिक कारण

अ.- मानसिक कारण

१ ) आई-वडिलांचे बालकांसमोर होणारे भांडणे , चिंता, असुरक्षिततेची भावना, मनामध्ये लज्जा, मनोस्नायुची विकृती आणि आई-वडिलांकडून बालकावर अति प्रमाणात धाक ठेवणे , रागावणे इत्यादी कारणांमुळे बालकांचे मूत्र पेशी वरील नियंत्रण कमी होते व मूत्र त्याग होतो.

२ ) बालकाचे पालन-पोषण कसे करावे याबद्दल संबंधीत माहितीचा पालकांना अभाव असणे.

३ ) लहान बाळांनी मल-मुत्र त्याग करण्यासंदर्भात दिलेले संकेत आईला न समजणे यामुळे नाईलाजाने बाळ अंथरुणात लघवी करू लागते .

**ब.- शारीरिक कारण**

१ ) लहान मुलांमध्ये शय्यामूत्रता होणे याचे प्रमुख कारण मूत्रवह स्त्रोतस किंवा जननेंद्रिय पूर्णतः विकसित न होणे हे असते.

२ ) अशावेळी लहान मुल उशिरा बोलू लागणे, उशिरा चालू लागणे या प्रकारचा इतिहास मिळतो.

३ ) लहान बालकांमध्ये जंताचे प्रमाण अधिक असल्यास , मलबद्दता, पोट व्यवस्थित साफ होत नसल्यास किंवा मूत्राशय शिथील असल्यास शय्यामुत्रता आजार उद्भवतो.

चिकित्सा

शय्यामुत्रता व्याधीची चिकित्सा करताना मानसिक चिकित्सा आणि औषधी चिकित्सा यांचा विचार करावा

अ. मानसिक चिकित्सा

१ ) मानसिक चिकित्सा म्हणजे मानसिक ताण तणाव कमी करणे, बालकाच्या मनातील भीती, क्रोध, चिंता याबद्दल आई वडिलांनी चर्चा करणे.

२ ) आपल्या बाळाला मलमूत्र त्याग करण्यासंबंधी प्रशिक्षण देणे.

३ ) सायंकाळनंतर बालकास जास्त प्रमाणामध्ये द्रव आहार देऊ नये.

४ ) बालकांमध्ये असा प्रकार घडत असल्यास त्याच्यावर रागावू नये किंवा त्याचा तिरस्कार करू नये त्याला आपल्या मध्ये काहीतरी मोठा आजार आहे असे वाटू देऊ नये, त्याच्याशी प्रेमाने वागावे.

५ ) पालकांनी बाळासमोर भांडण, तणावपूर्वक चर्चा, मोठ मोठ्याने ओरडणे टाळावे.

ब. औषधी चिकित्सा

१ ) जांबुल बीज , आवळा , अश्वगंधा आदी वनस्पती औषधीचे बालकाचे प्रकृती परीक्षण करून वैद्याच्या सल्ल्याने प्रयोग करावा.

२ ) कृमी नाशक योग वापरावेत.

३ ) गोक्षुर, शेवगा, दशमूळ आदी वनस्पती औषधीचे उपयोग मुत्रवह संस्थान चांगले करण्यासाठी उपयोग करावा .

४ ) मलबद्दता मुळे शय्यामूत्रता होत असेल तर बालकाच्या प्रकृती, बल, सात्म्य याचा विचार करून मृदुविरेचक औषधी हिरडा, हरितकी, एरंड, मनुका, यांचा उपयोग वैद्यांच्या साहाय्याने करावा.


**डॉ. ज्योती सचिन बन (गिरी)**
**बी.ए.एम.एस., एम.एस,**
**स्त्रीरोग व प्रसूती रोग तज्ज्ञ**
**मोबाईल - 9422901923**
**श्री विश्व माऊली आयुर्वेद चिकित्सालय व पंचकर्म, ज्योती नगर , छ. संभाजीनगर**




# तंदुरुस्त आणि निरोगी जीवनशैली

आधुनिक केसरी

तंदुरुस्त आणि निरोगी जीवनशैली स्वीकारणे म्हणजे केवळ आपल्या जीवनात अधिक बदल करणे किंवा नवीन सवयी लावणे असा अर्थ मुळीच नाही, तर याचा खरा अर्थ आपल्या नियमित दिनचर्येकडे लक्ष देणे होय. आयुर्वेदानुसार रोजच्या चांगल्या सवयींचे पालन करून निरोगी जीवन जगता येते. आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ नितिका कोहली म्हणाल्या, “आयुर्वेद ही एक जीवनशैली आहे, आपल्या सवयी सुधारण्याचा हा रोजच्या जीवनातील एक यशस्वी प्रयत्न आहे. या प्राचीन ज्ञानाच्या मार्गदर्शनामुळे आपण आहार आणि जीवनशैली सुधारू शकतो जेणेकरून केवळ निरोगी आयुष्यच जगता येणार नाही दीर्घ आयुष्य देखील जगता येईल.

त्या म्हणाल्या, 'आयुर्वेद तुम्हाला शरीर, मन आणि आत्मा यांच्यात संतुलन शोधण्यासाठी प्रोत्साहित करतो. कारण ही तीन क्षेत्रे एकमेकांना जोडलेली आहेत.' त्यांनी आयुर्वेदाशी संबंधित काही महत्त्वाच्या सवयी इन्स्टाग्रामवर पोस्टद्वारे शेअर केल्या, ज्या प्रत्येकजण निरोगी जीवन जगण्यासाठी स्वीकारू शकतो. आयुर्वेदानुसार सकाळी सूर्योदयाच्या किमान एक तास आधी लवकर उठले पाहिजे. ही एक चांगली सवय आहे आणि निरोगी जीवन जगण्यास मदत करते. आपले वाडवडील नेहमीच ब्रह्म मुहूर्तावर उठण्याचा मोलाचा सल्ला देतात. ब्रह्म मुहूर्त हा एक शुभ काळ आहे, जो सूर्योदयाच्या 1 तास 36 मिनिटे आधी सुरू होतो आणि त्याच्या 48 मिनिटे आधी संपतो. तिळाचे तेल, मोहरीचे तेल किंवा तुपाचे यापैकी कोणतेही दोन थेंब नाकात घाला. हे केस अकाली पांढरे होण्यास प्रतिबंध करते, टक्कल पडण्यापासून बचाव करते आणि चांगली व शांत झोप लागण्यास सुद्धा भरपूर मदत करते.

# ‘हे बंधो...' राष्ट्रीयत्वाची संज्ञा स्पष्ट करणारी कविता

आधुनिक केसरी

**प्रा.डॉ.संजय शिंदे हे माझे संशोधक विद्यार्थी होते. तेव्हापासून त्यांचा वैचारिक व्यासंग, त्यांचे संघर्षशील आयुष्य मी जवळून पाहत आलो आहे. अत्यंत कमी वयामध्ये त्यांनी खूप मोठं - मोठी आव्हाने संयतवृत्तीने पचवले आहेत. संयम हा विकसनशील माणसाचा गुणधर्म असतो. हे संस्कार त्यांच्यावर झाले आहेत. सुसंस्कारीत व्यक्तीने केलेले लेखन-भाषण हे निश्चितपणे दिशादर्शक ठरते. 'हे बंधो' हा डॉ.संजय शिंदे यांचा कवितासंग्रह या दृष्टीने मला अत्यंत महत्त्वपूर्ण वाटतो. संयतवृत्ती, मित्भाषी स्वभाव, चिंतनशील कृती या प्रवृत्तीमुळे 'हे बंधो' या कवितासंग्रहाला एक वेगळीच झळाळी प्राप्त झाली आहे.**

‘हे बंधो' हा कवीने समतेसाठी आणि मानवतेसाठी दिलेली जिव्हाळ्याची आर्त हाक आहे. सृजनशील साद आहे. ही साद करूणेची आहे. एकतेची आहे. सत्तांतराची आहे. प्रज्ञेची आहे. समतेची आहे. नवनिर्माणाची आहे. हे संग्रहाच्या पानापानावर प्रकर्षाने जाणवते. भारतीयांना उजेडाच्या दिशेने घेऊन जाणाऱ्या चळवळी - लढे ज्या महापुरुषांनी लढले. आज त्यांचाच विसर पडावा अशा मनूवृत्ती देशभर बळावत चालले आहेत. त्याविरुद्ध धाडसाने लिहिणे-बोलणे अत्यावश्यक होते. त्याची बीजे ‘हे बंधो' या संग्रहातून स्पष्टपणे दिसत आहेत. लेखन कौशल्याचा गौरव करत असताना माणूषतावादी लेखनातील विचार सौंदर्य, संयत विद्रोही भावना याकडे मात्र दुर्लक्ष झाले. मानवी जीवनाचे सौंदर्यशास्त्र मांडणारे साहित्य विचार प्रवाह मात्र इ.स. २०१० नंतर क्षीण होत गेले. याकडे कुठल्याही साहित्य समीक्षकाने विचारवंताने गांभीर्यपूर्वक पाहिले नाही. हे चिंताजनक आहे. हे समजून घ्यावे लागेल. कवी संजय शिंदे यांनी ‘हे बंधो' च्या निमित्ताने वेगवेगळ्या विषयांना स्पर्श करून, भारताची संविधानिक स्थिती अत्यंत गांभीर्यपूर्वकतेने चित्रित केली आहे. त्यातून कवीची वैचारिक मनोभूमी, त्यांची उद्दिष्टं आणि धाडस, त्यांची क्षमता आणि दक्षता ही स्पष्ट होते. अलिकडच्या काळातील भारतीय माणूस प्रज्ञा हरवून बसलेला आहे. प्रज्ञासूर्याच्या वारसाने प्रज्ञेपासून दूर जाणे ही दोखादायक स्थिती आहे. याची गांभीर्यपूर्ण दखल कवीने घेतलेली आहे ते लिहितात-

**‘ हे बंधो...**
**प्रज्ञाच्या बळावर**
**शीलवंत आणि करूणेचा**
**महासागर हो...**
**उगवता सूर्य तुला वंदन करेल.'**

आजचा भारतीय माणूस उगवत्या सूर्याकडे पाठ फिरवून आपले आयुष्य अस्ताकडे घेऊन जात आहे. लोकशाहीच्या पुनःस्थापनेमुळे माणसाच्या विकासासाठी आणि मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संसदेत पावर हाऊसची (सभागृहाची) स्थापना केली. प्रत्येक राज्यात दोन - दोन सभागृह निर्माण केली. ही सभागृह म्हणजे मानवी मूल्यांचे विकास केंद्र आहेत. परंतु या सभागृहात पोहचण्यासाठी वंचित भारतीयांना संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे एकतेचे आवाहन करताना कवी लिहितो -

**‘हे बंधो...**
**गट-तट सोडून या**
**भिमाचा गड उध्वस्त होतोय**
**बस्स झाले आता**
**राजगृह तुमची वाट पाहतोय...’**

‘राजगृह’ हे राष्ट्रीय एकतेचे प्रतिक आहे. राष्ट्रीय स्मारक आहे. मात्र आपल्या नाकर्तेपणामुळे या राष्ट्रीय स्मारकाला निवासस्थानाचे रूप प्राप्त झाले आहे. राजगृह ही राष्ट्रनिर्मात्याच्या प्रगाढ मेंदूतून आविष्कृत झालेली एक जागतिक कलाकृती आहे. या कलाकृतीचा आणि राष्ट्रीय स्मारकाचा सन्मान करणे आम्ही विसरलो आहोत. राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब बाबासाहेब आज नाहीत. परंतु जागतिक ज्ञानाचे प्रतिक असलेले राजगृह अस्तित्वात आहे. राष्ट्र उभारणीत याच राजगृहाचे मोलाचे योगदान आहे. याच राजगृहात भारताला एकसंघ ठेवणारे, भारतीयांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य देणारे, संविधान निर्माण झाले. ज्या लोकप्रतिनिधींना दोन्ही सभागृहात बसण्याचा अधिकार राजगृहांनी दिला; त्याच राजगृहाविषयी सभागृहातील लोक गांभिर्याने पाहत नाहीत. ज्या राजगृहातून दर दिवशी प्रज्ञासूर्य उगवायचा आणि सर्व भारतीय प्रकाशमान व्हायचे, त्या तेजस्वी प्रज्ञासूर्याचे उगमस्थान आहे राजगृह. भारतीय लोकांना ज्यामुळे माणूस म्हणून स्वतंत्रपणे जीवन जगता येऊ लागले स्वतंत्र विचार करण्याची क्षमता प्राप्त झाली. जीवन जगण्याचे राजमार्ग प्राप्त झाले. व्यक्ती आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले. त्या प्रजासत्ताक भारताचे जन्मस्थळ आहे राजगृह. भारतीय संसदेची उगमस्थान आहे राजगृह. हे राजगृह समग्र भारतीयांच्या एकतेचे प्रतिक आहे. त्यामुळे कवींनी सर्वांनाच राजगृहाकडे येण्याचे निमंत्रण दिले आहे हे लक्षात येते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय लोकांना राजांच्या गुलामीतून मुक्त केले. राजेशाही संपुष्टात आणली. राजांच्या वर्चस्वाखाली भरडणारे आयुष्य नागरीव्यवस्थेत परावर्तित करून नागरिकांना देशाचा मालक बनवले. मी पणा नष्ट करून ‘आम्ही भारताचे लोक’ पर्यंत आणून सोडले. ‘आम्ही भारताचे लोक’ ही राष्ट्रीय संज्ञा प्रत्येक भारतीय नागरिकांचे सौंदर्यशास्त्र आहे. मात्र भारतीय नागरिकांना याची व्यवस्थितपणे जाणीव झालेली नाही हे आजचे वास्तव आहे. भारतीय संविधान हा भारतीयांचे अस्तित्व टिकून ठेवणारा राष्ट्रग्रंथ आहे. भारतीयांच्या नागरिकत्वाचा मूलमंत्र आहे. भारतीय नागरिक जोपर्यंत प्रबुद्ध बनत नाहीत. तोपर्यंत बाबासाहेबांच्या स्वप्नातला भारत अस्तित्वातच येऊ शकत नाही. असे कवीला प्रकर्षाने जाणवते हेच या कवितेतून स्पष्ट होते.

**‘हे बंधो...**
**मला पाहायचंय तुला**
**बाबासाहेबांच्या स्वप्नातल्या भारतात**
**प्रबुद्ध भारताचा**
**नागरिक म्हणून...'**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्राचीन भारताला प्रजासत्ताक भारतात परावर्तित करून, भारतीय नागरिकांना देशाचा मालक बनवले व त्यांचे मत आणि मूल्य निर्धारित केले. ही जाणीवही कवी संजय शिंदे यांनी करून दिली आहे. एवढेच नव्हे; तर ‘या मूल्यांचा लिलाव करशील तर, तू मातीमोल ठरशील’ ही धोक्याची सूचना ही दिली आहे. ‘एक व्यक्ती एक मत, एक मत एक मूल्य’ हे भारतीयांचे जीवनसूत्र आहे. भारतीयांचे राष्ट्रीय मूल्य हजारो वर्षाच्या संघर्षानंतर भारतीयांना पुन्हा मिळाले आहे. हे गमावून बसणे यापुढे कोणत्याच भारतीयांना परवडणारे नाही. त्यामुळे वर्तमान स्थितीत स्वतःची सद्सद्विवेक बुद्धी जागृत ठेवूनच भारतीयांचे भविष्य निर्धारित केले पाहिजे. अन्यथा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, व सांस्कृतिक नपुसंकत्व येईल या दिशेनेही कवी लिहितो-

**‘हे बंधो...**
**आरक्षणापुरताच उगवशील**
**तर तू नपुसंक होशिल**
**मग तू ठरव आता काय होशील ?'**

जागतिक दर्जाचे बौद्धतत्वज्ञान हेच भारतीय संस्कृतीचे शाश्वत सत्य आहे. आजचा लोकशाही भारत बौद्ध तत्वज्ञानावरच उभा आहे. तो प्रबुद्ध आंबेडकर भारत बनलेला आहे. यावर अत्यंत मार्मीक भाष्य कवी करत आहे.

**‘हे बंधो..**
**आपण प्रयत्न करू**
**आपले असंख्य दोष**
**नष्ट करण्याचे...**
**शाश्वत सत्य बुद्धाचे**
**अंगिकारण्याचे...’**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व वंचित भारतीयांना उद्योग निर्मितीच्या क्षेत्रात उतरण्याचे आवाहन केले होते. परंतु त्याचे पालन झाले नाही. आरक्षणाचा आधार घेऊन नोकरी करणे सर्व वंचित भारतीयांनी पसंत केले. ते आरक्षणाचे आधार न बनता भार होऊन बसले. आरक्षणाच्या संधीला अधिकार मानू लागले.

यावर कवीने अत्यंत मार्मीक भाष्य केले आहे. यातून कवीची विचार क्षमता, विचार दृष्टी लक्षात येते. आंबेडकरवादी राष्ट्रीय विचारधारेला, वाङ्मयीन चळवळीला एक नवी दिशा देण्याची क्षमता ‘हे बंधो...’ या कवितासंग्रहातून पानापानावर उजागर होताना दिसते. **‘हे बंधो...**
**विझणार नाही ज्योत कधीच**
**ते डोळे तुला व्हायचं आहे**
**तुला सूर्यपुत्र होऊन**
**उजेड घरोघरी वाटायचं आहे.’**

सूर्यपुत्र होण्याची क्षमता आज घडीला निर्माण होणे गरजेचे आहे. ‘आंबेडकर भारत’ वाचवण्याची ती गरज आहे. याचे स्वभान ठेवण्याची दृष्टी कवीजवळ आहे. हे महत्त्वाचे वाटते.

**‘हे बंधो...**
**उजेड तुझ्या हातात आहे**
**अंधाराला रस्ता पुन्हा**
**विचारू नको'**

यावरून भारतीयांना जीवनमूल्यांची नीटपणे ओळख झालेली नाही याची जाणीव होते. कारण प्रत्येक भारतीय अजूनही अंधाराच्या वाटेनेच भ्रमण करतो आहे. स्वकर्तृत्व पाजळण्यात व उजळण्यातच तो दंग झाला आहे. सार्वत्रिक शीलांचे तत्वांचे, पालन करण्याचे ज्ञान आणि कर्तृत्व त्यांच्या अंगवळणी पडलेले नाही. हे प्रकर्षाने जाणवते. ध्येयनिष्ठ आणि विचारनिष्ठ माणसाचा दुष्काळ पडलेला दिसून येतो. हातातील उजेडावरचा विश्वास गमावल्याचे चित्र दिसत आहे. अशावेळी कवी मात्र भारतीयांना सतर्कतेचा इशारा देताना दिसतो. हेच या कवितेचे यश आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शतकानु-शतकांचा अंधार दूर केला. भारतीयांचे एकसंघ राष्ट्रीयत्व पुनःस्थापित करून ते प्रज्वलित केले. आता त्याला प्रकाशमान ठेवण्याची जबाबदारी भारतीयांनी स्वीकारली पाहिजे असे कवीला वाटते. शिक्षित भारतीयांनी ‘आंबेडकर भारताचा’ श्वास बनले पाहिजे. कारण, बेईमान लोक अजूनही काळोखाचे समर्थन करत आहेत. काळोख क्षणिक असतो तर, प्रकाशमान सूर्य शाश्वत असतो. सूर्यप्रकाशानेच सजीव सृष्टी उजळून निघते. सृजनशील राहते. उर्जाशील होते. हाच सृष्टीचा नियम आहे. त्यामुळेच शतकानु-शतके बौद्ध तत्वज्ञानाला विरोध होऊन ही ते तत्वज्ञान जगाचे मार्गदाता ठरलेले आहे. यानुषंगाने कवी अंतर्मुख होऊन तळमळ व्यक्त करताना लिहितो.

**‘हे बंधो...**
**काळोख दाटला खूप जरी**
**नेत्रांचा दिवा विझू देऊ नकोस**
**सारेच संपले आता**
**म्हणून अंधाराचा मित्र**
**होऊ नकोस...'**

खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आज आमलात आणण्याची नितांत गरज आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. म्हणून कवी लिहितो की,

**‘तू राजमार्ग हो**
**बाबासाहेबांचा अनुयायी**
**तू सूर्यपुत्र हो**
**प्रज्ञावंत, शीलवंत, करूणेचा**
**तू पथमार्ग हो'**

संघर्ष करून, हिंसा करून, स्वावलंबन मिळवता येत नाही. अस्तित्व निर्माण करता येत नाही. तर, बुद्धाच्या मार्गाने स्वतःचा, देशाचा आणि जगाचा विकास करता येतो. हे शाश्वत सत्य कवी आग्रहाने मांडतो. **‘हे बंधो..**
**तू समतेची ज्योत हो**
**माणूसपण जपणारी संस्कृती हो**
**प्रज्ञेचा दयासागर आणि**
**बुद्धत्वाचा आरसा हो.'**

आजच्या वर्तमान परिस्थितीवर भाष्य करणारी ही कृतिशील कविता सत्तांतरांच्या बिगुल फुंकते आणि देशभर सर्व पक्षांचा एकतेचा आवाज ऐकायला येतो. हा केवळ योगायोग नाही तर, प्रत्येकाच्या मनातील हा आविष्कार आहे हे सिद्ध होते.

कवी संजय शिंदे यांची एकूणच कविता आजच्या स्थितीचे केवळ भाषात्मक वर्णन करत नाही, तर २०२० नंतरच्या वाङ्मयीन चळवळीला नविन स्वभान देते. स्वक्लेश, आपापसातील अंतर्विरोध या दुर्गुणांना नष्ट करण्याचे आवाहन करते. राष्ट्रीय जीवनमूल्य अनुसरल्याशिवाय भारतीयांना स्वतःचा विकास करणे शक्यच होणार नाही. यावरही कवी अंतःर्मुख होऊन भाष्य करतो. हेच या कवितेचे यशही आहे असे मला वाटते. इसवी सन २००० ते २०२० पर्यंत ची मराठी कविता दिशाहीन झालेली दिसते. विचारनिष्ठ व मूल्यनिष्ठ कवी अलिकडे गांभीर्याने लिहित नाहीत. ते बौद्धिक दृष्ट्या कमकुवत व भीती आणि संभ्रमाने गलित गात्र झालेले दिसून येत आहेत. मात्र अशाही परिस्थितीत डॉ.संजय शिंदे सारख्या कवींनी निर्भीडतेने प्रबुद्ध आंबेडकर भारताची वाटचाल कायम केले आहे. जीवघेणा संघर्ष वाटेला येऊनही त्यावर मात करीत समग्र भारतीयांच्या विकासाची कास धरणे एवढी सोपी बाब नाही. परंतु कवी संजय शिंदे यांनी स्वसंघर्षात वेळ न घालवता राष्ट्रोन्नतीचा विचार प्रकट करण्यातच आपले जीवन सौख्य मानले आहे. ते निर्धारित केले आहे. एकूणच काय तर डॉ.संजय शिंदे यांची कविता आजच्या अराजकतेवर संयमी आघात करते व प्रत्येकाला स्वअस्तित्वाची जाणीव करून देते या कवितेला स्वतःचे एक वैचारिक अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. ‘हे बंधो...’ हा कवितासंग्रह नव्या पिढीचे समृद्ध दालन ठरावे. हीच मनस्वी शुभेच्छा.




प्रा. डॉ. सिद्धोधन, बिलोली

# कृत्रिम बुद्धिमत्ता मानवासाठी धोकादायक ठरु शकते



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात गुंतवणूक करणा-या जगभरातील शेकडो कंपन्या त्याचा फायदा घेत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मानवालाच हॅक केले जात असल्याचा दावा इस्रायलचे प्रख्यात इतिहासतज्ज्ञ आणि लेखक प्राध्यापक युवाल नोवा हरारी यांनी नुकताच केला आहे. सोशल मीडियावर आपण ज्या मित्रांची निवड करतोय कदाचित हा विचार केवळ आपलाच नसेल, ते कृत्रिम बुद्धिमत्ताने ठरवले असेल. आपले नाते कसे असावे, त्यातही हस्तक्षेप केला जातोय. समान राजकीय, धार्मिक विचारसरणीच्या लोकांना ‘व्होट बँक’बनवण्याचे लक्ष्य कृत्रिम बुद्धिमत्तेला दिले जाऊ शकते.**

आधुनिक केसरी

त्या गटात लोकांना सामावून घेत नंतर प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तित्वाचा सखोल अभ्यास करून त्याचे विचार बदलले जाऊ शकतात. विश्वास ठेवा, जगात सध्या असे सुरू झाले आहे, असा दावा प्रा.हरारी यांनी केला आहे. आजवर कृत्रिम बुद्धिमत्ता अनेकविध उद्योगांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी सज्ज झाली आहे. गेली अनेक वर्षं बुद्धिबळासारख्या खेळात कृत्रिम बुद्धिमत्ताने आव्हान दिलं होतंच; पण आताही आरोग्यसेवेपासून ते वित्त, वाहतूक ते उत्पादनापर्यंत सगळी कार्यं स्वयंचलित करण्यासाठी, कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि नावीन्यपूर्ण कामं साध्य करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उपयोगात आणली जात आहे. सुरुवातीला ह्या तंत्रज्ञानाचे टीकाकार म्हणायचे, कितीही झालं तरी मानवी मनाचा परमोच्च आविष्कार म्हणजे त्याने निर्माण केलेल्या कला, संगीत, चित्रकारिता... ह्या सगळ्या उजव्या मेंदूच्या कलात्मक गोष्टी. यात कृत्रिम बुद्धिमत्ता काही करू शकणार नाही. पण आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून काल्पनिक चित्रं, चेहरे, संगीतसुद्धा तयार होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता आता सिनेमाची पटकथाही लिहू लागले आहेत ! चित्रकलेत तर मानवालाही मागे टाकू शकेल, नवे कायदे बनवू शकते. आदी अगदी सर्वकाही करतेच आहे. कर्करोगासारख्या दुर्धर रोगांचं त्वरित निदान व्हावं आणि त्यावर औषधंही तयार व्हावीत यासाठी हे तंत्रज्ञान वापरलं जात आहे. गुगलसारखी कंपनी डायबेटिसमुळे येणारं अंधत्व टाळण्यासाठी आणि त्याचं लवकर निदान व्हावं म्हणून प्रयत्न करते आहे. कल्पनाशक्तीच्या जोरावरच मानव समाजाची प्रगती होत आली आहे. आता हे कामसुद्धा कृत्रिम बुद्धिमत्ता करत असेल तर मग मानवाला काय काम राहील ? वास्तविक कृत्रिम बुद्धिमत्ता हे आतापर्यंत केवळ एक साधन होते. ते आपल्याला विश्लेषणात मदत करीत असे अथवा सूचना देत होते. परंतु आता कृत्रिम बुद्धिमत्तेने कल्पना करून आपल्याला मार्गदर्शन करण्यासही सुरुवात केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता स्वतःच नवे विचार, नव संस्कृतीला आकार देऊ शकतात. अत्यंत धोकादायक अणुबॉम्ब स्वतः एखादा नवा अणुबॉम्ब तयार करू शकत नाही, परंतु कृत्रिम बुद्धिमत्ता स्वतः विचार करुन तिच्यापेक्षा कैकपटीने जास्त घातक कृत्रिम बुद्धिमत्ता तयार करु शकते. तंत्र, उद्योगांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याची तीव्र स्पर्धा ही धोकादायक असून त्यामुळे अनियंत्रित झालेली कृत्रिम बुद्धिमत्ता मानवाच्या डोक्यावर बसेल अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. मानवी बुद्धीमत्तेशी स्पर्धा करणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराचा अतिरेक हा मानवासाठी भस्मासुर ठरेल. त्यामुळे इंटरनेटवर खोट्या, चुकीच्या, अनावश्यक आणि घातक माहितीचा महापूर लोटेल. तीव्र स्पर्धेतून निर्माण करण्यात आलेली कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित साधने कालांतराने हाताबाहेर जातील. त्यांच्यावर निर्मात्यांचेही कसलेच नियंत्रण राहणार नाही. अशा परिस्थितीत त्यांना वठणीवर आणण्यासाठी काय करावे लागेल, हे अनाकलनीय असेल अशी भीती सध्या व्यक्त करण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सध्या गुन्हेगारी प्रवृत्ती विशेषतः दहशतवादी संघटनाही करीत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित केल्याने मानवजातीचा अंत होण्याची भीती जगप्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांनी यापूर्वी व्यक्त केली होती. आर्टिफिशियल इंटेलिजन्स या संकल्पनेचा प्राथमिक विकास आपण याआधीच केला आहे. मात्र या संकल्पनेचा संपूर्ण विकास मानवजातीसाठी प्राणघातक ठरेल. हे झपाट्याने विकसित झालेले तंत्रज्ञान मानवजातीच्याही पुढे जाऊ शकते. मानवास नैसर्गिक उत्क्रांतीच्या मर्यादा आहेत.

# एकट्याने लढाई लढता येत नाही



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**कोणतीही लढाई एकट्याने लढता येत नाही. लढाई लढण्यासाठी संघटन व एकी महत्त्वाची असते, तरच त्या लढाईवर आपण विजय मिळवू शकतो. संघटित होऊन एकी करून अनेक विजय मिळवल्याचे उदाहरणे इतिहासा मध्ये आहेत. संघटन आणि एकी असल्यानंतर संख्येला महत्त्व राहत नाही. तर संघटन आणि एकी यामध्ये तत्त्व, विचारधारा, आत्मीयता यावरच आपण लढाई जिंकू शकतो. सामाजिक लढाई लढायची असेल तर, संघटना आणि एकी शिवाय पर्याय नाही. आणि एकटा माणूस काहीच करू शकत नाही हे वास्तव आहे. तथागत गौतम बुद्ध हे जगातील एकमेव सर्वात सर्वात मोठी सामाजिक क्रांती घडवून आणणारे महापुरुष आहेत. गौतम बुद्ध यांच्यासारखा विद्वान व्यक्ती होणे अशक्य आहे.**

अशा विद्वान व्यक्तीला, सर्वगुणसंपन्न असलेल्या व्यक्तीला, सामाजिक चळवळ समाजामध्ये रुजविण्यासाठी व परिवर्तन करण्यासाठी सुद्धा संघटनेची गरज लागली, म्हणून त्यांनी संघाची स्थापना केली. सर्व क्षेत्रामधील अमाप ज्ञान अमाप संपत्ती असून सुद्धा परिवर्तनासाठी संघ निर्माण करायची गरज पडली, याचाच अर्थ परिवर्तन व चळवळीतून यश हे केवळ ज्ञान व पैसा यावरच अवलंबून नसून ते संघटन व एकी यावर अवलंबून असते,.हे समजून घेणे गरजेचे आहे. सम्राट अशोकाने धम्म जगाच्या पाठीवर पोहोचवण्याचे काम केले ते कामही त्यांनी संघाच्या मदतीनेच केले. जगातील अनेक ठिकाणी स्वतःचे राज्य असलेल्या राजाला सुद्धा संघाची मदत घ्यावी लागली. याचा अर्थ सम्राट अशोक अनेक देशावर राज्य असूनही संघटनेमार्फत एकीकरणामार्फत त्यांना बुद्धाचे विचार जगापर्यंत पोहोचावे लागले. म्हणूनच सम्राट अशोक धर्माच्या प्रचार प्रसार करण्यामध्ये आणि ते टिकवण्यामध्ये यशस्वी झाले. अशोक सम्राट नंतर जगातील सर्वात मोठी सामाजिक क्रांती करून, रक्ताचाही एकही थेंब न सांडू देणारे, बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका संघटित व्हा, आणि मग संघर्ष करा अशा संदेश दिला. थोडक्यात रक्ताचा एकही थेंब न सांडता जगातील सर्वात मोठे परिवर्तन केले, त्या व्यक्तीच्या मतानुसारही आपण एकटे काही करू शकत नाही. त्यासाठी संघटना व एकी आवश्यक आहे. हे ऐतिहासिक दाखले असतानाही आणि आज अनेक लोक सुशिक्षित, समजदार, जागृत आहेत असे स्वतःला समजत असतानाही, ज्यावेळेस चळवळीचा विषय येतो, त्यावेळेस चळवळ मी एकटाच चालू शकतो, चळवळीचे नॉलेज माझ्याच कडे आहे, मी तर चळवळीला पुढे नेऊ शकतो, या अविर्भावात जाऊन चळवळीचे व आंबेडकरवादी लोकांचे वाटोळे केले. एकट्याने सामाजिक लढाई लढता येत नाही, त्यासाठी संघटन व सामाजिक एकी येथे महत्त्वाचे असते. संघटन व सामाजिक एकी नसेल तर तो लढा स्वार्थासाठी असतो असेच म्हणावे लागेल. मीच चळवळ चालू शकतो, मीच लोकांना न्याय देऊ शकतो, मीच आंदोलन करू शकतो, म्हणून माझ्याच मागे या मलाच नेता म्हणून मान्यता द्या, या अविर्भावात राहणारे व त्यालाच नेता म्हणून स्वतःचेच संघटन निर्माण करणारे लोक हे चळवळीचे नाही, तर स्वतःचे काम करत



असतात. स्वार्थाची पोळी भाजून घेण्यासाठी हे स्वतःलाच नेता समजून, स्वतःचाच गट स्वतःच्या फायद्यासाठी निर्माण करत असतात. आंबेडकरवादी लोकांमध्ये असे शेकडो हजारो गट निर्माण झाल्याने सत्य, विज्ञान, समता, स्वातंत्र्य, बंधुता व मानवता यावर आधारित असलेली विचारधारा अजूनही देशांमध्ये रुजू शकली नाही. हे अपयश स्वतःला नेते समजणारे लोक, प्रामाणिकपणे स्वतःकडे घेऊन स्वतःची जबाबदारी पार पाडतील का ? असा प्रश्न केला तर मुळीच कोणी समोर कोणी येणार नाही. परंतु एखाद्या सामाजिक समस्याला न्याय मिळाला असेल, किंवा सामाजिक प्रश्न सुटला असेल तर, त्याचे श्रेय घेण्यासाठी मात्र सर्वच लोक समोर येतात. ही शोकांतिका आहे. आंबेडकरवादी चळवळ समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, मानवता व विज्ञानवादी असताना तिचा प्रचार प्रसार पाहिजे तसा झाला नाही. याचे सर्वात महत्त्वाचे कारण प्रचार प्रसार करण्यासाठी संघटन व एकी लोकांनी कधी केलीच नाही. जे काही गट तट दिसून येतात ते स्वतःचे पद, प्रतिष्ठा आणि पैसा मिळवण्यासाठीच निर्माण झालेले आहेत, असे दिसून येते. दुसरीकडे जी व्यवस्था अज्ञान, अंधश्रद्धा, पाखंड, विषमता, यावर आधारित आहे ते विचार मात्र घराघरापर्यंत गेली, लोक त्यावरच गर्व करायला लागलेत. याचे कारण त्यांची व्यवस्था जरी ही अज्ञान, अंधश्रद्धा, पाखंड, विषमता यावरती आधारित असलेली असेल, तरीही त्यांच्यामध्ये सामाजिक संघटन व एकी आहे. ते लोक सुपारी मिळतील म्हणून विचारधारा सांगत नाही, तर आपली विचारधारा लोकांपर्यंत कोणत्या माध्यमातून पोहोचेल यावरती, लोकांच्या मनामध्ये कशी रुजेल यावर असते भर देत असतात. उलट पक्षी आंबेडकरवादी चळवळीतील लोक मात्र सुपारी भेटली तरच आपले विचार लोकांना सांगतात. सुपारी बाज लोक कधीच सर्वांना एकत्र घेऊन चालत नाहीत. एक सुपारी घेणारा माणूस दुसरा सुपारी घेणाऱ्या माणसाच्या विरोधात असतो. आणि सुपारी घेऊन मिळवलेल्या कार्यक्रमात एकीकरणावर बोलतो, हे त्याचे बौद्धिक अपंगत्व होय. प्रतिगामी चळवळीचा विचार केला तर अज्ञान, अंधश्रद्धा, पाखंड, विषमता असूनही ते प्रत्येक माणसाच्या मनामध्ये आपले विचार यशस्वीपणे रुजवत आहेत. त्यांची योग्य ती पेरणी करत आहेत, त्याला खतपाणी घालत आहेत, आणि अज्ञान अंधश्रद्धा, विषमता, आणि पाखंड यांना पूरक अशी व्यवस्था निर्माण करत आहेत, ते केवळ आणि केवळ संघटने मुळेच. व संघटनेच्या एकीकरणामुळे प्रतिगामी विचारसरणीचे लोक अज्ञान, काल्पनिक गोष्टी, पेरत आहेत, लोक त्याच गोष्टी सत्य म्हणून त्याविषयी भावनिक होत आहेत. पुरोगामी लोक काल्पनिक गोष्टीला, अंधश्रद्धेला, विषमता व पाखंडवाद याला सुपारी भेटली तेव्हा विरोध करतात. परंतु अंधश्रद्धा, अज्ञान, विषमता, पाखंडवाद सर्व नष्ट होण्यासाठी अविरतपणे, पैशाची अपेक्षा न करता, समाजाला संघटित करून, काम केले जात नाही. म्हणून सत्य, तर्क, विज्ञान बाजूला सारून काल्पनिक बाबीला महत्त्व प्राप्त होत आहे. भारत हा बुद्धाचा देश आहे, हे बोलूनच जमत नाही, तर बुद्धाचे विचार, बुद्धाचे कार्य अविरतपणे लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करावे लागते. लोकांच्या मनामध्ये बुद्धांचे विचार पेरावे लागतात. त्यावेळेस लोकांना बुद्धाच्या विचारांची जाणीव होईल, व ते भारत हे बुद्ध राष्ट्र आहे हे मान्य करतील. परंतु हे काम करताना एकच व्यक्ती स्टेजवर जाऊन संपूर्ण देशात बुद्ध सांगू शकत नाहीत, बाबासाहेब सांगू शकत नाहीत, तर एकच वेळी अनेक ठिकाणी वेगवेगळ्या माध्यमातून बुद्ध व बाबासाहेब सांगायचे असतील तर, अनेक लोक, अनेक माध्यमे आपल्याकडे असायला पाहिजेत. तरच विचारांची पेरणी आपण करू शकू. अनेक लोक आणि अनेक माध्यमे आपण तेव्हाच निर्माण करू शकतो, जेव्हा पद, प्रतिष्ठा, पैसा व स्वतःचे दुकान याचा विचार न करता, एकीकरण करून केवळ विचारधारेवर चळवळीशी एकनिष्ठ राहूनकाम केले तर. काम करताना विचार सांगताना आम्ही जर बोलायचे पैसे घेऊ आणि इतर कोणी बोलणारा निर्माण होऊ नये किंवा तो प्रकाशित होतात येणार नाही असे कृत्य जर केले तर चळवळ समोर जाणार नाही. आणि विज्ञानवादी, समता, बंधुता, न्याय व मानवतेवर आधारित बुद्धांचे विचार, बाबासाहेबांची चळवळ एकीकरणाच्या माध्यमातून ही देशभर पसरत नाही, म्हणूनच अंधश्रद्धा, विषमता, पाखंडवादी लोकांनी आपले विचार लोकांच्या मनामध्ये रुजवून, त्यांचीच बाजू सत्य कशी आहे लोकांना पटवून दिले आहे. म्हणून लोक सत्याला सोडून अज्ञान, अंधश्रद्धा,विषमता व पाखंडालाच सत्य समजत आहेत. अज्ञान, अंधश्रद्धा, विषमता व पाखंड विरोधात लढाई लढून बुद्धाचे विचार व भारतीय संविधान अबादीत ठेवायचे असेल, तर सर्वांनी एकत्र येऊन, एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. कोणी जर म्हणत असेल मी एकटाच एक काम करू शकतो, तर तोच चळवळीचा व बुद्धाच्या विचाराचा सर्वात मोठा विरोधक आहे, हे लक्षात घ्यायला पाहिजे. म्हणून सामाजिक लढाई ही एकट्याने नाही तर एकिने लढाईची असते, ही बाब समाजामध्ये रुजवणे अत्यंत आवश्यक आहे.

# महान योद्धा महाराणा प्रतापसिंह



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी, मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी 25 वर्षे तहानभूक विसरून लढा दिला. मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात तोड नाही. प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावीत झाला होता. त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानले जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रताप यांना मोलाचे स्थान आहे. कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्या काळी मुगल घाबरत असे. त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापांचा अभिमान आहे.**

महाराणा प्रताप यांचा जन्म 9 मे 1540 साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह. मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान, धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचा राजा झाला.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षानी दिनांक 3 मार्च 1572 ला उदयसिंहाचे निधन झाले.यानंतर मेवाडचे सुत्र महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतीकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहचू नये,म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरीक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात



असतांना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रताप यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी रजपूतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा संग ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईन. असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंग व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाले.राणाजींच्या वक्तव्य नेहमीच मानसिंहला खटकत होते. ही संपूर्ण घटना अकबराला मानसिंहाने सांगितली.पहिलेच मानसिंग तिलमिला झाला आणि अकबराला मेवाड पाहिजे होते या करीता अकबर सर्वत्र जहर घोळत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युध्द करायल निघाला. ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंगाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचशे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते. महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापांच्या भितीने मानसिंग आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले. राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रताप जखमी झालेले पाहुन मानसिंह अत्यंत दुःखी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली.प्रतापाचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले. मानसिंहाला महाराणा प्रताप समजून मोगलांनी आक्रमन केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीला प्राप्त झाला.तेवढ्यात शत्रू सैनिकाने राणाजींच्या घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय नीकामी झाला. अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला.आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहाले.तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तिसिंग व त्यांचा बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन याच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली. मात्र तो महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही.हल्दिघाटीतील युद्ध हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते.शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह 1584 मध्ये मेवाडवर आक्रमण करण्यास पाठविले.परंतु 2 वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रताप यांना पकडू शकला नाही.अशा प्रकारे प्रबळ महत्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापाला नमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण तो निष्फळ ठरला. 21 जून 1576 रोजी चेतकने( घोड्याने )महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.



# देवभूमी : उत्तराखंड

आधुनिक केसरी

जिकडे बघावं तिकडे डोंगर-दऱ्या, घुम घुम घुमविणारे गोल गोल रस्ते, खोऱ्यांमधून; गावापर्यंत पोहोचणाऱ्या निसर्ग संपन्न वाटा, आणि पाईनच्या उंचचउंच झाडांमधून झिरपणारा ऊन-सावल्यांचा मोहक खेळ! वाटतं, प्रकाशाचे कवडसे जणू लपंडाव खेळायला आलेले आहेत. दुतर्फा पाईनच्या झाडांमधून जाणारी वाट तर इतकी काही निवांत, शांत होती की, दूर दूरपर्यंत आपण आपलाच आवाज ऐकत असतो. जंगलातून वाहणाऱ्या झऱ्याचा नितळ खळाळ, पानांची सळसळ, पहाड़ी तांबटची डोंगर दऱ्यात घुमणारी आर्त 'पिहू पिहू' सगळंच कसं काळजातच शिरतं! झाडांच्या शेंड्यांवर थबकणारी संध्याकाळ आणि उंचावर उडणाऱ्या गरुड पक्षांच्या आपसातल्या त्या झटापटी... मातीच्या मृदगंधासारखे तिथल्या गोड गोड माणसांचे ते मिठे मिठे बोल! हो, देवभूमीबद्दल ( उत्तराखंड ) बोलतोय मी! अल्मोरा, कौसानी, रानीखेत, नैनिताल, जिम कार्बेट, हरिद्वार आणि ऋषीकेश या सगळ्याच ठिकाणांना गेल्या महिन्यात आम्ही जरा भेट देवून आलो. खरं सांगू, परतीसाठी पाय निघत नव्हते! देवभुमीतल्या; अल्मोरा, कौसानी आणि रानीखेतला तर निसर्गाची लयलूट आहे नुसती! या सगळ्याच ठिकाणांची सुंदरता तर काय वर्णावी ?... माझे शब्द थिटे आहेत त्यासाठी! तरी निसर्गाच्या मुग्धतेची ती लयलूट कशी उधळलीये ते जरा बघू या, "आओ जरा लिखते है" या माझ्या कवितेतून! आणि सांगायला मला आनंद होतोय की, ही कविता भारतातील अग्रगण्य हिंदी वृत्तपत्र "अमर उजाला"च्या काव्य डेस्क वर कालच प्रकाशित करण्यात आली आहे.

**आओ जरा लिखते है
पत्तो पत्तो में खनकती
ये सबां की चुलबुल लहरें
डाली डाली पर चमचमाते
ये धुप के सुनेहरे सेहेरे
पगडंडी से बतियाता
घने छाँव का ये डेरा
भवरों की 'गुनगुन'पर
ये जवाँ कलियों का पेहरा
ये बादलों से गपशप
सुबह शाम गुलिस्ताँ में
ये 'त्रिहो' की 'पिहू पिहू'
दूर दूर तक पहाड़ों में
बहते झरनों को झिनझिन
ये पाईन की फ़िज़ा भिनी भिनी
हिमालय की दमकती चोटी
ये हंसी वादियाँ लुभावनी
सप्त सुरों सी सुरिली
ये कुदरत की 'दास्ताँ-ए-ग़जल'
जवाँ उमंगे ये बहारों की
के पग पग; जाते हम मचल
ये छम छम मचलती
गंगा मैय्या का पानी
आओ, जरा लिखते हैं
देवभूमी की कहानी...**




# पद्माकरकाका मुळे यांच्या 77 व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय येथे पद्माकरकाका मुळे यांच्या 77 व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. रक्तदान शिबिराचा शुभारंभ प्रा. रुपाली निकम आणि प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांच्या रक्तदानाने झाले. यावेळी कृषि महाविद्यालय संचालक डॉ. दत्तात्रय शेळके, अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, दंत महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. लता काळे तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, मानव संसाधन अधिकारी अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी संजय अंबादास पाटील, सत्य साई ब्लड बँकेचे डॉ. महेंद्र चौहान, विभागप्रमुख आणि कर्मचारी आदी उपस्थित होते.

# संकष्टी चतुर्थीला भाविकांनी घेतले राजुरेश्वराचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** संकष्टीचतुर्थीनिमित्त मराठवाड्यातील प्रसिद्ध गणपती संस्थान, जालना जिल्ह्याचे ग्रामदैवत श्री, राजुरेश्वराचे भाविकांनी मनोभावे प्रार्थना करून दर्शन घेतले. श्रीचरणी अर्पण करण्यासाठी भाविकांकडून नारळ,फुले, अर्पण केली जात होती. भक्तांकडून मोठ्या प्रमाणात फुलांच्या हारांची मागणी होत होती. भक्तांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून गणपती संस्थांच्या माध्यमातून पायदानी व मंडपची सोय केली होती. गणपती संस्थान आणि स्वयं सेवकांकडून भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

मंदिर परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुरुष व महिला सेवेकरींनी मंदिर परिसरात सेवाकार्यातून स्वच्छता व दर्शनासाठीआलेल्या भाविकांना सहकार्य करत असल्याचे दिसून आले.आपली मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून भाविक श्रीचरणी नतमस्तक होऊन दर्शन घेत होते.



# बुद्ध पौर्णिमेनिमित्त लोकशाहीचा जागर

आधुनिक केसरी न्यूज



**सातारा :** बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून खंडाळा तालुक्यातील भोळी आणि शिरवळ येथे पुस्तक भेट देण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. हा उपक्रम तरडगाव ता.फलटण येथील सुशिल गायकवाड यांच्या कडून राबविण्यात आला. भोळी आणि शिरवळ येथील वाचनालयास लोकशाहीचा जागर नावाची पुस्तके देण्यात आला. भोळी येथे माता रमाई आंबेडकर हे नव्याने वाचनालय सुरू करण्यात आलेले आहे. भीमसागर तरुण मंडळाकडून अनेक पुस्तके या वाचनालयात उपलब्ध करण्यात आलेली आहेत. वाचनालयास पुस्तके मिळावेत म्हणून लोकांना आवाहन ही करण्यात आलेले आहे. या आवाहनास प्रतिसाद सुशिल गायकवाड यांनी वाचनालयास पुस्तके देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार त्यांनी पुणे ( कोंढवा ) येथील संविधान अभ्यासक असलम इसाक बागवान यांचे असलेले व प्रा.मोनेश सुपेकर यांनी शब्दांकन केलेले पुस्तक वाचनालयास देऊ केले. यावेळी लोकशाहीचा जागर नावाची पुस्तके देत असताना लोणंदचे उत्कृष्ट खेळाडू सुशांत शेळके उपस्थित होते.हे पुस्तक घेताना गावचे सरपंच प्रशांत खुटे, शरद खुटे,सुनील खुटे, धनंजय खुंटे, प्रवीण खुटे,जान्हवी खुटे,ऋतुजा खुटे, प्रगती खुटे, नेहा खुटे,नूतन खुटे,सायली सोनवणे तसेच वाचनालयासाठी झटणारे समाज बांधव उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आवश्यक असलेले स्पर्धा परीक्षेची पुस्तके व इतरही अवांतर पुस्तके देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सुशिल गायकवाड यांनी म्हटलेले आहे. हे पुस्तक भोळी गावचे सामाजिक कार्यकर्ते अनंत चव्हाण यांना सुद्धा देण्यात आले. शिवाय शिरवळ येथील ग्लोरी इंग्लिश मिडीअम स्कूलला भेट देत असताना हे पुस्तक दत्तात्रय बर्गे आणि विद्या भारती यांनी स्वीकारले. शिरवळचे राजे सिद्धार्थ बुद्ध विहारास भेट दिल्यानंतर येथील वाचनालयास सुद्धा पुस्तक भेट देण्यात आले. बौद्धाचार्य संजय जाधव आणि मनस्वी जाधव यांनी हे पुस्तक स्वीकारले.विचारांची क्रांति घडविणारे हे बुद्धविहार कायम प्रेरणा देणारे वाटते.येथील वाचनालय अनेकांना प्रेरित करणारे असून या वाचनालयास पुस्तक देताना विशेष समाधान वाटत असल्याचे सुशिल गायकवाड यांनी म्हटले आहे.या पुस्तकाबद्दल संजय जाधव यांनी विशेष आभार मानले. तसेच या विहारातून जी विचारांची देवाण घेवाण असते.जे विविध कार्यक्रम पार पडत असतात. याबद्दलची माहिती संजय जाधव यांनी दिली.

# बुलढाणा येथे इंडियन डेंटल असोसिएशनच्या वतीने कोविडचर्चा सत्राचे आयोजन

## कोविडची गुंतागुंत ठरते जीवघेणी; डॉ. दीपक लद्धड

आधुनिक केसरी न्यूज



**बुलढाणा :** येथील इंडियन डेंटल असोसिएशन यांच्या वतीने चर्चा सत्राचे आयोजन कोविडची गुंतागुंत ठरते जीवघेणी या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते.कोविड नंतरची गुंतागुंत ठरते जीवघेणी इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा शाखेतर्फे निरंतर दंत वैद्यकीय शिक्षण कार्यक्रमांतर्गत दि.६/५/२३ रोजी चिखली रोड बुलढाणा येथील हॉटेल नर्मदा इन येथे पोस्ट कोविड कॉमप्लिकेशन्स वर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाची सुरुवात इंडियन डेंटल बुलढाणा असोसिएशनचे अध्यक्ष डॉ शरद जुमडे यांनी दीप प्रज्वलन करून डॉ.दिपक लध्दड यांचा सत्कार करुन पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा शाखेचे अध्यक्ष डॉक्टर शरद जुमडे,कार्यक्रमाला बुलढाण्यातील नामवंत हृदयरोग तज्ञ डॉक्टर दीपक लध्दड यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.कोरोनावर मात म्हणजे लढा संपला नव्हे त्यापेक्षाही भयंकर आहेत पोस्ट कोविड कॉम्प्लिकेशन्स या संसर्ग नंतर इतर आरोग्य विषयक समस्या पाहायला मिळत आहे. यात प्रामुख्याने थकवा झोपेशी संबंधित समस्या श्वास घेण्यास अडथळा येणे चिंता आणि नैराश्य यासारखे मानसिक आजार हृदयविकार व रक्ताच्या गुठळ्या तयार होणे, ज्यांना कोविडची लागण झाली आहे त्यापैकी बहुतेकांना कफची तक्रार आहे, खोकला, श्वासोच्छावासाच्या त्रासाची समस्या आहे.ज्यांना आधीच श्वसनाचा त्रास ते लोक यामुळे अधिक चिंतेत आहेत.बीपीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.अशा रुग्णांसाठी मल्टी डिसिप्लनरी पोस्ट कोविड क्लिनिक ची आवश्यकता आहे अशे मार्गदर्शन डॉ दिपक लध्दड यांनी केले.ते पुढे बोलत होते की कोरोना मुक्त रुग्णांवर दंत उपचार करताना रुग्णांची रुदय क्षमता व रक्तवाहिन्यामधे झालेले बदल यांना लक्षात घेऊन दंत उपचाराचे नियोजन करावे अशा मोलाचा सल्ला डॉक्टर दिपक लध्दड यांनी दंत चिकित्सकांना याप्रसंगी मोलाचा सल्ला दिला.यावेळी या कार्यक्रमाला डॉ सचिन किनगे सेक्रेटरी आय डी,डॉ निलेश जुमडे, डॉ आरती पाटील, डॉ अभिजित जाधव, डॉ जैस्वाल, डॉ गवळी, डॉ दडॉ, डॉ राजपूत, डॉ नरवाडे, मान्यवर,व इतर दंत चिकित्सकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती.अशी माहिती डॉ शरद जुमडे यांनी बोलताना दिली.

# CSMSS येथे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** आज छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था येथे संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले असून १०१ सेकंद स्तब्ध राहून त्यांना अभिवादन करण्यात आलं. शिक्षण, आरोग्य, महिला सबलीकरण, जातीअंताचा लढा यांसह कृषी-सिंचन, औद्योगिक क्षेत्रांतील विकासात्मक दृष्टी त्यातून समाजाला प्रगतीच्या दिशेने नेणारे राजर्षी शाहूंचे विचार आजही दिशादर्शक असल्याचं छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था सचिव श्री. पद्माकरराव मुळे यांनी म्हटलं आहे. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी अंधश्रद्धा, अस्पृश्यता, अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरांना विरोध करून बंदी घातली. आंतरजातीय विवाहासाठी कायदा केला. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारातच समाजाला एकजूट ठेवून पुढे घेऊन जाण्याची ताकद आहे, अशा शब्दात संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचं स्मरण करून त्यांना अभिवादन केलं. यावेळी कृषी महाविद्यालय संचालक डॉ. दत्तात्रय शेळके, अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, दंत महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. लता काळे, मानव संसाधन अधिकारी अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी संजय अंबादास पाटील, लेखाधिकारी सदाशिव गावंडे, संजय कोलते, कार्यालय अधिक्षक विशवनाथ गव्हाणे आणि विभागप्रमुख आदी उपस्थित होते.



# कुऱ्हाडीने घाव घालून उपसरपंचाची हत्या

## राजूर हादरले : भरदुपारी खून करून मारेकरी फरार

आधुनिक केसरी न्यूज



**जालना :** श्रीक्षेत्र राजूर येथील प्रतिष्ठित नागरिक तथा माजी उपसरपंच गोरक्षनाथ आत्माराम कुमकर (५५)यांची रविवारी दुपारी तीनच्या सुमारास अज्ञात मारेकऱ्यांनी कुऱ्हाडीने डोक्यात आणि मानेवर घाव घालून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. आठवडी बाजारातील गर्दीचा फायदा घेत मारेकरी तेथून पसार झाले आहेत. गुन्हेगारी क्षेत्रातील ही बातमी परिसरात वाऱ्याच्या वेगाने पसरली असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील काही दिवसांपासून जालना शहरासह ग्रामीण भागात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर वाढत असून गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यास पोलिसांना अपयश येत आहे, अशा घटनांमुळे परिसरातील सामाजिक स्वास्थ बिघडत असून संबंधित गुन्हेगारांचा शोध घेऊन कठोर कारवाईच मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. पोलीस आणि घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार गोरक्षनाथ आत्माराम कुमकर हे राजूर-दाभाडी रोडवरील आनंदनगर येथील आपल्या नव्या इमारतीच्या बांधकामावर देखरेख करत होते. रविवारी राजूरचा आठवडी बाजार असल्या कारणाने बाजारहाट करण्यासाठी गोरक्षनाथ कुमकर यांनी स्वतः कामगारांना पगार दिला.पैसे घेऊन कामगार बाजारात निघून गेल्यानंतर बांधकामावर पाणी मारण्याच्या उद्देशाने कुमकर तिथेच थांबले होते.कुमकर हे एकटे असल्याची खात्री करून या संधीचा फायदा घेत अज्ञात मारेकऱ्यांनी ओळख पटू नये म्हणून तोंडावर रुमाल बांधून आनंद नगरममध्ये कुमकर यांच्या बांधकाम सुरू असलेल्या इमारतीमध्ये घुसून डोक्यात आणि मानेवर कुऱ्हाडीचे वार करत हल्ला चढवला.यामध्ये कुमकर हे जागीच ठार झाले. त्यांचा मृत्यूदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. या घटनेची माहिती मिळताच जालना स्थानिक गुन्हे शाखेचे सुभास भुजंग,उपविभागीय पोलीस अधिकारी इंदलसिग बहुरे,सहायक पोलिस निरीक्षक वैशाली पवार यांनी तात्काळ घटना स्थळी भेट दिली व परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये याची दक्षता घेतली. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते. यावेळी गुन्हेगारांचा माग काढण्यासाठी स्वान पथकही पाचारण करण्यात आले होते. राजूर हे आठवडी बाजाराचे मोठे केंद्र आहे. परिसरातील खेड्यातील नागरिक खरेदीसाठी येत असतात. त्यामुळे येथील मार्केटमध्ये नेहमीच वर्दळ असते.या गर्दीचा फायदा घेत मारेकऱ्यांनी कुमकर यांच्या खुनाचा कट रचला असावा अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. बाजारच्या दिवशी भर दुपारी ही घटना घडल्याने व्यापारी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.बातमी पसरताच नागरिकांनी घटनास्थळी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.या घटनेबाबत सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून मारेकऱ्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी नातेवाईक व ग्रामस्थांकडून केली जात आहे.

गोरक्षनाथ कुमकर हे राजूरमधील प्रतिष्ठित नागरिक म्हणून ओळखले जात होते. तसेच त्यांनी माजी उपसरपंच आणि सोसायटी चेअरमन या पदावरही काम केले होते.परिसरात त्यांची मोठी ओळख होती.परंतु आर्थिक व्यवहार किंवा प्रॉपर्टीच्या वादातून त्यांच्यावर हल्ला झाल्याची शंका वर्तविण्यात येत आहे.कुमकर यांचे शवविच्छेदन केल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह स्वीकारण्यास नकार दिला होता. मारेकऱ्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी केली जात होती. यावेळी राजुर ग्रामीण रुग्णालयात शेकडोच्या संख्येने जनसमुदाय जमला होता. त्यामुळे काही काळ येथे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.पोलिसांनी आरोपींना पकडून कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह स्वीकारण्यास होकार दिला.रात्री उशिरा राजूर येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात गोरक्षनाथ कुमकर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यानंतर नातेवाईकांसह मुलगा आशुतोष कुमकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हसनाबद पोलीस ठाण्यात मारेकऱ्यांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक वैशाली पवार आणि त्यांची टीम करत आहेत.

# जागतिक रेडक्रॉस दिनानिमित्त देहदान करणाऱ्या व्यक्तीचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने जागतिक रेडक्रॉस दिनानिमित्त देहदान करणाऱ्या नागरिकांचा सत्कार आयोजित करण्यात आलेला आहे. औरंगाबाद येथील आयएमए हॉलमध्ये रविवार दिनांक 7 में रोजी आयोजित या कार्यक्रमात सत्यसाई रक्त संकलन केंद्रामार्फत मदत केल्या जाणाऱ्या थँलेसेमिया असलेल्या रुग्णांचा सहभाग असणार आहे व या कार्यक्रमात अनंत बोरकर हे रेडक्रॉसच्या कार्याची माहिती देणार आहेत. तसेच ह्याच दिवशी आएम हॉल येथे संध्याकाळी 6 वाजता हृदयविकाराचा झटका हृदयक्रिया बंद कसे टाळावे ? ह्याबद्दल एक जनजागृती शिबिर प्रशिक्षण शिबीर आयोजित केले आहे. प्रमुख वक्ते डॉ. अजित भागवत कमलनयन बजाज रुग्णालय, छत्रपती संभाजी नगर प्रथमोपचार व कृत्रिम श्वासोस्वास वर्कशॉप मार्गदर्शन प्रज्वल मिठावाला मा. सचिव, इंडियन रेड क्रॉस सोसायटी. या कार्यक्रमाना जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन रेडक्रॉस सोसायटीचे किशोर गठडी, अजय देशपांडे, प्रज्वल मिठावाला, अनंत बोरकर व राजेंद्र राठोड यांनी केले आहे. दिनांक 8 मे जागतिक रेडक्रॉस दिना निमित्त रिमांड होम येथे तेथील विद्यार्थ्यांना फळे व विविध वस्तूंचे वाटप प्रमुख पाहुणे मानसिंगजी पवार यांच्या हस्ते होणार आहे. तसेच दिनांक 8 मे रोजी सिंगापूर येथील रेडक्रॉस च्या कार्यालयात औरंगाबादचे अध्यक्ष किशोर गठडी संयुक्तरित्या होणाऱ्या कार्यक्रमास हजर राहणार आहेत.



# प्रीती शर्मा मेमन यांनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**वेरूळ :** आम आदमी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य तथा मुंबई अध्यक्ष श्रीमती प्रीती शर्मा मेनन यांनी मराठवाडा भागातील अवकाळी ग्रस्त पावसामुळे झालेल्या नुकसानीची आज शनिवार रोजी वेरूळ तालुका खुलताबाद भागात पाहणी केली. यावेळी वेरूळ शिवारातील दिलीप आबा वेताळ यांच्या शेतात येऊन पाहणी केली असता येथील शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाल्याचे त्यांनी बघितले व शासनाने सरसकट पन्नास हजार रुपये एकरी नुकसान भरपाई त्वरित जाहिर करावे, अशी मागणी देखील श्रीमती मेनन यांनी केली आहे. यावेळी श्रीमती मेनन बोलताना पुढे म्हणाल्या की शेतकऱ्याचे एवढे नुकसान झाले आहे पंचनामा करण्यासाठी काहीच राहिलेले नाही आता पंचनामे कसले करताय शेतकऱ्यांना त्वरित दिल्ली पंजाबच्या धर्तीवर नुकसान भरपाई द्यावी अशी मागणीही करण्यात आली. यावेळी आम आदमी पक्षाचे छत्रपती संभाजी नगर जिल्हाध्यक्ष सुभाष निकम,युवक आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सतीश लोखंडे, फुलंब्री तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर बोरसे, अमोल पाटणी यांच्यासह शेतकरी दिलीप वेताळ,गणेश वेताळ, आप्पासाहेब वेताळ, रमेश पाटील, जाधव यांच्यासह शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सकल राजपूत मेळाव्यास उपस्थित राहण्याचा संकल्प

## १४ मे रोजी मेळाव्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथे रविवार( ता.१४ ) रोजी सायंकाळी चार वाजता आयोजित वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह सकल राजपूत मेळाव्यासाठी तालुक्यातील रोटेगाव येथील एम.आय.टी. कॉलेजमधे उपसरपंच धीरजसिंह राजपूत यांनी शुक्रवार ( ता. ५ )रोजी आयोजित केलेल्या बैठकीत रोटेगाव, आघुर, रेल्वे स्टेशन व वैजापूर येथील सकल राजपूत / परदेशी समाजाचे नागरीक मोठ्या सन्खेने एकत्र येऊन त्यांनी संभाजीनगरच्या सकल मेळाव्यास उपस्थित राहण्याचा संकल्प सोडला. या बैठकीत छत्रपती संभाजीनगर येथून कंवरसिंग बैनाडे, राजन सुर्यवंशी, पदमसिंह राजपूत, महाजन चुन्गडे, भागवत बिघोत, सुदाम राजपूत यांची उपस्थिती होती. वैजापूरचे खुशालसिंह राजपूत व्यासपीठावर उपस्थीत होते. प्रारंभी माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी प्रास्ताविकात सकल राजपूत मेळावा आयोजित करण्यामागचा हेतू विशद केला, धीरजसिंह राजपूत,शिवपाल राजपूत, मयुर राजपूत, रणजीत राजपूत,सत्यजित राजपूत यांनी उपस्थिताना पेन व छोटी डायरी भेट दिली. बैनाडे, बिघोत, सुर्यवंशी खुशालसिंह राजपूत यांनी मार्गदर्शन केले,या प्रसंगी गंगारामसिंह राजपूत, पारस बहुरे,सोनू राजपूत, स्वप्निल राजपुत, सुभाष गोमलाडू, चरणसिंह काकरवाल, मंजूशा ढाकरे, बापू साळुंके,तसेच राजपूत युवक क्षत्रिय संघटनेचे युवा कार्यकर्ते मोठ्या सन्खेने उपस्थित होते. महाराणा प्रतापसिंह यांच्या नावाचा जय घोष ही मोठ्या प्रमाणात युवा वर्गाने केला. राजपूत युवक क्षत्रीय संघटनेचे अध्यक्ष धीरज राजपूत यांनी शेवटी आभार मानले. सर्व उपस्थिताना सकल राजपूत मेळाव्यला उपस्थित रहण्याची शपथ व संकल्प श्री राजपूत यानी दिली.

# सुनील कडासने बुलढाणा जिल्ह्याचे नवे पोलीस अधीक्षक


आधुनिक केसरी न्यूज



**बुलढाणा :** मागील पंधरवाड्यापासून रिक्त असलेल्या पोलीस अधीक्षकपदी नागपूर लोहमार्ग पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांची नियुक्ती झाली आहे. तत्कालीन पोलीस अधीक्षक सारंग आव्हाड यांची पुणे येथे उपमहानिरीक्षकपदी पदोन्नतीने बदली झाली होती. मागील २० ऑक्टोबर रोजी येथे रुजू झालेले आव्हाड यांच्या बदलीचे आदेश मागील २५ एप्रिल रोजी निर्गमित झाले. मात्र त्यांच्या जागी कुणाचीही नियुक्ती न झाल्याने हे महत्त्वाचे पद पंधरा दिवसांपासून रिक्त होते. अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांनी पदाचा प्रभार सांभाळला.



# हे पुस्तक मुलांना वाचून दाखवा...



विनोद जैतमहाल
संपर्क क्र. 9823028332

आधुनिक केसरी

**माणसाचं मन अत्यंत संकुचित असू शकतं किंवा ते अतिशय विशाल होऊन जगाला कवेत घेऊ शकतं. 'सागर रेड्डी - नाम तो सुना होगा' हे पुस्तक नुकतेच वाचले. हे पुस्तक वाचणारी कोणीही व्यक्ती स्वार्थाच्या चिखलात पूर्वीसारखी लोळत राहू शकत नाही. लेखिका सुनीता तांबे यांनी सागरची ही कथा अत्यंत नितळपणे सांगितली आहे. वाचकाचे मन सागराइतके अथांग करण्याची किमया हे पुस्तक करते.**

भारतातील अनाथाश्रम मुला-मुलींना वयाच्या अठरा वर्षांपर्यंत सांभाळतात आणि त्यानंतर या अनाथ मुलांना चक्क वाऱ्यावर हाकलून देतात.

ही कोणती व्यवस्था आपण निर्माण केली आहे ? सागर रेड्डी या तरुणालाही असेच अठराव्या वर्षी हाकलून देण्यात आले. त्यानंतर त्याचे काय झाले ? आणि देशभरात सागरने काय काम उभे केले ? याची जबरदस्त प्रेरक हकीकत या पुस्तकात आहे. हे पुस्तक प्रत्येक जिवंत आईबापाने आपल्या मुलांना द्यावे. मुलांना मराठी वाचता येत नसेल तर स्वतः वाचून दाखवावे. आपल्या आजूबाजूला असंख्य लोक कुत्र्यापेक्षाही वाईट जगत असताना फक्त आपल्याच ताटात सगळे तूपलोणीसाखर ओढण्याचा आटोकाट प्रयत्न करणारे लोक शेवटी दुःखातच पडतात. पण हे आपल्याला मरेपर्यंत लक्षात येत नाही.

सागरने स्वतःचा बूक केलेला फ्लॅट विकून निराधार युवकांसाठी दोन फ्लॅट भाड्याने घेतले त्याच क्षणी त्याला आनंदाचा झरा गवसला. आपल्या कुवतीनुसार इतरांचे दुःख दूर करणे हाच खरा सुखाचा मार्ग आहे. पण हे अपवादाने, अपघाताने एखाद्या सागरला कळते. तसे संस्कार सर्वांवर लहानपणापासूनच का होऊ नयेत ? येथे आपण कमी पडलो आहोत.

आजही असंख्य नीच लोक घरातल्या घरात एकमेकांना अतोनात छळतात. निराधार लहान मुले आणि स्त्रियांना मरणाचे राबवून घेतात. अतिशय क्रूर अत्याचार करतात. ही प्रगती कशी म्हणावी ?

माणसाच्या मनाचा कोतेपणा घालवून संवेदना जागवणारे हे पुस्तक सुनिता तांबे यांनी मोठ्या कष्टाने लिहिले आहे. जगातील सर्व भाषांमध्ये या पुस्तकाची भाषांतरे व्हावीत. हे पुस्तक वाचून जगभरातील तरुण रक्ताचे लोक स्वार्थापलीकडे जाऊन निराधारांचे आधार होतील आणि माणसांचा छळ थांबवतील हीच आशा आहे. म्हाताऱ्या रक्ताचे छळवादी अधम जगातून वेगाने कमी होत जावोत हीच सदिच्छा.

**पुस्तक मागवण्यासाठी लेखिकेचा व्हाट्सप क्रमांक 9930905008**
**पुस्तकाचे नाव- 'सागर रेड्डी - नाम तो सुना होगा'**
**लेखिका- सुनिता तांबे**
**अक्षयभारती प्रकाशन, मुंबई**
**मूल्य - 200 रुपये.**




# अज्ञातांनी तोडली फळाला आलेल्या २५० मोसंबीची झाडे



आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यातील नवगाव येथील शिवारातील एका शेतकऱ्याच्या शेतातील जवळपास २५० ते ३०० मोसंबीच्या झाडांची अज्ञातांनी कत्तल करून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान केल्याची घटना नवगाव येथे रविवारी घडली याबाबत पैठण पोलिस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी : सांगितले की , गोदावरीच्या काठी सलीम दगडू पठाण ( रा. नवगाव ) या शेतकऱ्यांची शेत जमीन आहे. या शेत जमिनीत त्यांनी मोसंबीची ४०० झाडे लावली आहे. सकाळी अकरा वाजता शेतकरी मोसंबीच्या शेतात गेला असता त्यांना मोसंबीच्या झाडांची कत्तल केली असल्याचे निदर्शनास आले. याबाबत सदर शेतकऱ्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञातआरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिक तपास करीत आहेत. याबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष माऊली मुळे यांनी या शेतकऱ्यांना धिर देत पोलिसांनी लवकर तपास करून गुन्हा नोंदवून या शेतकऱ्यांला नुकसान भरपाई ची सरकार कडे मागणी करणार आहे.



# वेरुळ घाटात आयशर व इनोवाची समोरासमोर धडक

## सहा जण गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वेरुळ घाटात खुलताबादहुन वेरुळ कडे जाणाऱ्या आयशरचा ब्रेक फेल झाल्याने भरधाव आयशरने वेरुळ हुन खुलताबादकडे येणारी इनोवा कारला धडक दिल्याने झालेल्या आपघातात एक महिला गंभीर जखमी झाली असून 6 जण किरकोळ जख्मी झाले आहे.हा अपघात रविवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास घडला. याबाबत अधिक माहिती अशी की, श्री घृष्णेश्वर मंदिराचे दर्शन व वेरुळ लेणी बघून परत औरंगाबादकडे निघालेल्या इनोवा कार ( क्र MH 20 DI 6000 चालवत वेरुळ घाटातून औरंगाबादेकडे होत असताना खुलताबादहुन वेरुळ कडे जाणाऱ्या आयशर क्र MH 20 E 7191 चा ब्रेक फेल झाला व चालक लक्ष्मण हजारे चा नियंत्रण सुटल्याने इनोवा ला धडक देऊन इनोवा पलटी झाली असून इनोवा मधील महिला सुलभा चव्हाण वय 48 गंभीर जख्मी झाली असून सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. विक्रांत चव्हाण वय 28 वर्ष, प्रथमेश गलंडे वय 12 वर्ष, हर्षदा चव्हाण वय 25 वर्ष, प्रमोद गलंडे 46 वर्ष,ज्योती गलंडे, प्राजकता गलंडे 15 वर्ष अश्या जख्मी झालेल्यांची नाव आहेत. दरम्यान काही वेळ वाहतुक ठप्प झाली होती.घटनेची माहिती मिळताच पोलिस उप निरीक्षक संजय बहुरे, शेख कलीम आदि पोलिस कर्मचाऱ्यांनी तत्काल धाव घेत वाहतुक सुरळीत केली व जख्मींणा 108 रुग्णवाहिकेने प्राथमिक आरोग्य केंद्र वेरुळ येथे पाठवून प्राथमिक उपचार केला व पुढील उपचारासाठी औरंगाबाद येथील हेडगेवार रुग्णालयात पाठविले आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# सोयगाव तालुक्यातील अवैध धंदे बंद करा

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील तालुक्यात गावोगावी खुलेआम भर वस्तीत सुरू असलेले कल्याण - मुबई वरळी मटका बेटिंग, झण्णा मन्ना पत्ताचे तिररट खेळ, अवैध देशी-विदेशी व हातभट्टीच्या दारूच्या अवैध दारू विक्रेत्यांनी धुमाकूळ घातला आहे. हे अवैद्य धंदे पोलीस ।प्रशासनाने तात्काळ बंद करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एका निवेदनाद्वारे विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर विभाग, तसेच पोलीस अधीक्षक ग्रामीण छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यातील सोयगाव पोलीस स्टेशन अंतर्गत सोयगाव बिटमधील सोयगाव, आमखेडा, जरंडी, निंबायती, बहुलखेडा, माळेगाव, घोसला, बनोटी बिटमधील तिडका, वरठाण, बनोटी, गोंदेगाव, किंन्ही, उप्पलखेडा, हनुमंताखेडा, वडगाव, मोहलाई तसेच वरखेडी आदी गावागावात खुलेआम भर वस्तीत सुरू असलेले कल्याण - मुबई वरळी मटका बेटिंग, झण्णा मन्ना पत्ताचे तिररट खेळ, अवैध देशी-विदेशी व हातभट्टीच्या दारूच्या अवैध दारू विक्रेत्यांनी धुमाकूळ घातला आहे.

तालुक्यातील गावागावात बेरोजगार तरुण व्यसनाधीन झाले असून अनेकांची घरे उद्धवस्त होत आहे. विशेषतः महिलांचे संसार उघडे पडले आहे. हे अवैद्य धंदे पोलीस प्रशासनाने तात्काळ बंद करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एका निवेदनाद्वारे विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर विभाग, तसेच पोलीस अधीक्षक ग्रामीण छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर मनसे तालुका अध्यक्ष रामा एलिस, तालुका सचिव निखिल शिंदे, महिला तालुका अध्यक्ष लिलाबाई पवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

बनोटी येथील ग्राम पंचायतीचा ठराव देऊन अवैद्य धंदे बंद करण्याची मागणी केली असतांना बनोटी पोलीस कारवाई करत नसल्याने ग्रामस्थांत तीव्र रोष निर्माण झाला आहे. बनोटी गावात भर वस्तीत जिल्हा परिषद शाळा, वाडी- पळाशी रस्ता, टेकडी, बनोटी चौफुली, इंदिरानगर परिसरात अवैध देशी दारू व हातभट्टीच्या गावरान दारूची दिवसा ढवळ्या सर्रास खुले आम विक्री होत आहे. नागरिकांकडून या अवैध दारू व गावरान दारू विक्रेत्यांना समजावण्यासाठी गेले असता, अवैध दारू विक्रेते दादागिरीची भाषा वापरून दमदाटी करतात.

पोलिसांना अवैध धंद्यावर छापे मारण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहे बनोटी परिसरात अवैध दारू विक्रीसह अवैद्य धंद्याच्या बाबतीत वॉश आउट मोहीम हाती घेण्यात आली आहे यासाठी स्वतंत्र पोलीस पथक स्थापन करण्यात आले आहे. या कामात हलगर्जीपणा करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.
**सपोनि अनमोल केदार, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन सोयगाव**

# मोलखेडा रस्त्यावर दिशा फलक लावा : अमोल शेळके

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथील देवळगांव गुजरी ते सावळदबारा मुख्य रस्त्यावर घाणेगाव तांडा येथून मोलखेडा कडे जाणाऱ्या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभाग फर्दापूर यांनी दिशा फलक लावलेच नाही आणि लावलेल्या आहे तर त्या दिशा फलक वर मोलखेडा गावाचा उल्लेख केलाच नाही. याठिकाणी दिशाफलक लावण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थ व अमोल शेळके सामाजिक कार्यकर्ते यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग फर्दापूर यानां केली आहे. मोलखेडा, हिवरी हे गाव असून आसपासच्या अनेक गावातील लोकांचा संपर्क येथे रोज असतो. या गावामधूनच बुलढाणा जात असून या रस्ता वरून मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा सुरू असते. घाणेगांव तांडा या ठिकाणी एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे जाण्यासाठी रस्ता ओलांडवा लागतो. मात्र सावळदबार तसेच देवळगाव गुजरी सुसाट वेगाने येणाऱ्या वाहनामुळे रस्ता ओलांडणाऱ्या वाहनांना अपघाताचा धोका निर्माण होत आहे. बहुतांश अपघात या ठिकाणी घडले आहे. रात्री बे रात्री गावाजवळ वाहने येत असतानाही रस्त्यावर दिशाफलक नसल्याने लग्नाना येणारे पाहुणे मंडळी दिशा फलक नसल्याने सरळ सावळदबारा कडे निघून जातात पुन्हा विचारपूस केल्यावर त्यांनां मोलखेडा यायला आठ कि.मी.प्रवास करावा लागतोय आहे. पुढे गतीरोधक व दिशा फलक बसविण्यात यावे, अशी मागणी सार्वजनीक बांधकाम विभागाकडे नागरिकांनी अमोल शेळके सामाजिक कार्यकर्ते यांनी केली आहे.

# जेऊरच्या विहारात भिंतीवर साकारले बुद्ध-आंबेडकर तैलचित्र

## विहारात बुद्ध मूर्ती स्थापना सोहळा उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** बुद्ध पौर्णिमेच्या दिनी जेऊर ता.पुरंदर येथे तक्षशिला विहाराचे लोकार्पण करण्यात आलेले असून विहारात भगवान गौतम बुद्धांची मूर्ती व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. यावेळी पुज्यनिय भन्ते थेरो दीपंकर यांच्या हस्ते भगवान गौतम बुद्ध आणि दत्तात्रय भोसले यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची स्थापना केली. कोळकी ( ता.फलटण ) येथील श्रामणेर संघ आमंत्रित करण्यात आला होता. विहारातील भिंतीवर साकारण्यात आलेले तथागत गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनचरित्रावर आधारीत तैलचित्र विशेष आकर्षणाचा बिंदू ठरला असून यातून अनेक पैलू अभ्यासण्यासाठी मदत होत आहे. विहारास दोन्ही मुर्त्या दान देण्याचे महत्त्वपूर्ण योगदान युवा उद्योजक दत्तात्रय पोपट भोसले यांचे असून या दातृत्वाबद्दल दत्तात्रय भोसले यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. संपूर्ण विधी सुत्तपटन करण्याचे काम भारतीय बौध्द महासभेचे पुणे जिल्हा प्रसार सचिव दादासाहेब गायकवाड, जी.पी. गायकवाड, बापू सोनवणे, संतुली सोनवणे, प्रकाश सोनवणे, मल्हारी सोनवणे, गणेश भोसले आदींनी केले.



सोहळ्यास पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बबू साहेब माहुरकर, सरपंच शोभा तांबे, सुनील धिवार, पंकज धिवार, ॲड.विजय भालेराव, ॲड.शिवदास तांबे, बंडू सोरटे, दत्ता आबा चव्हाण, उत्तमराव धुमाळ, राहुल तांबे, जनार्धन तांबे, मनोहर धुमाळ, प्रतीक धुमाळ, सोमनाथ तांबे, शामराव धुमाळ, अमोल साबळे, विनोद धेंडे आदीं सह इतर मान्यवरांची प्रमूख उपस्थिती होती. मान्यवरांचे सत्कार भारतीय संविधानाची उद्देशिका देऊन करण्यात आले. उद्देशिका उपलब्ध करून देण्यासाठी भाऊसाहेब भोसले यांनी विशेष सहकार्य केले. प्रा. तानाजी तांबे यांच्या कडून विहारास पुस्तके भेट देण्यात आली. संयोजक म्हणून सिद्धार्थ युवा प्रतिष्ठानचे बापुराव भोसले, अनिल भोसले, अर्जुन गायकवाड, सयाजी गायकवाड, गुलाब गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, भाऊसाहेब भोसले, दादासो गायकवाड, बापू गायकवाड, संकेत गायकवाड, रणजित गायकवाड, वैभव गायकवाड, हणमंत गायकवाड व इतर पदाधिकाऱ्यांनी कामकाज पाहिले. या विहारात धम्म संस्कार वर्ग सुद्धा सुरू करण्यात आलेले आहेत. त्यामुळे लहान चिमुकल्यापासून ते मोठ्यां पर्यंत बौद्ध धम्म, त्रिसरन, पंचशील बुद्ध पूजा व इतर गाथां बद्दल चांगलेच पठण होत आहे. सूत्रसंचालन श्रीकांत गायकवाड व प्रास्तविक मयूर गायकवाड यांनी केले. भारत गायकवाड यांनी आभार मानले. शेवटी सांस्कृतिक कार्यक्रम ही संपन्न करण्यात आला.



# दिव्यांग शाखा अभियंताचा कार्यभार काढा

## प्रहार अपंग संघटनेचे पं.स. समोर आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत पैठण पंचायत समिती कार्यालयात कार्यरत असलेले दिव्यांग शाखा अभियंता एमए काजी यांना देण्यात आलेला क्षेत्रिय कार्यभार काढून घेण्यात यावा यासाठी प्रहार अपंग संघटनेतर्फे अमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

बांधकाम विभागात कार्यरत असलेल्या कोणत्याही दिव्यांग शाखा अभियंता क्षत्रिय कार्यभार न देता कार्यालयीन बैठक कामकाज देण्यात यावे असे शासन परिपत्रक असताना पैठण पंचायत समिती बांधकाम कार्यालयात कार्यरत असलेले शाखा अभियंते यांनी काळजी यांना मात्र बिडकीन गट गणात क्षेत्रीय कार्यभार देण्यात आला आहे.

सदरील देण्यात आलेला क्षत्रिय कार्यभार नियम भाई असून दिव्यांगात्वावर अन्यायकारक आहे. सन 2016 च्या दिव्यांग हक्क अधिनियम कायद्यानुसार दिव्यांगांना क्षेत्रीय साइटवर काम देण्यात येऊ नये त्यांना कार्यालयीन बैठे कामकाज देण्यात यावे असे शासन परिपत्रक व तरतूद असताना मात्र नियमाचे उल्लंघन करून एमए काजी यांना मात्र बिडकीन विभागात काम देण्यात आले.

पैठण पंचायत समितीच्या विरोधात प्रहार अपंग संघटनेने औरंगाबाद जिल्हा परिषदेसमोर उपोषण केले असता जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी गट विकास अधिकाऱ्यांच्या नावाने आदेश काढून दिव्यांग शाखा अभियान त्यांचा कार्यभार काढून घ्यावा असे लेखी पत्र दिले होते. या पत्राची ही दखल न घेतल्याने जिल्हाध्यक्ष शिवाजी गाडे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दिनांक 8 मे पासून प्रहार अपंग संघटनेने पैठण पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते.

या आंदोलनाची दखल घेत बांधकाम विभागाचे उपअभियंता संभाजी असोले व सहाय्यक गटविकास अधिकारी राजेश कांबळे यांनी दिव्यांग शाखा अभियंता चा कार्यभार काढून तात्काळ काढून घेत आंदोलन करताना लेखी पत्र दिले.

यावेळी तालुकाध्यक्ष बाबासाहेब पठाडे शहराध्यक्ष धोंडीराम सकुंडे, धम्मरत्न अंधोरीकर, अब्बास शेख, राधा खरात, गणेश भवरे, जाकीर कुरेशी आधी आंदोलनात सहभागी झाले आहेत.

# सुरज कांबळे पुण्यातील राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे उपाध्यक्ष..!

आधुनिक केसरी न्यूज

**माळशिरस :** राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेशांतर्गत पुणे येथील महाविद्यालयांच्या अध्यक्ष उपाध्यक्ष पदाच्या काल निवडी जाहीर करण्यात आल्या. देशाचे नेते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या विचारानुसार येणाऱ्या काळात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या माध्यमातून सर्व सामान्य विद्यार्थ्यांच्या विकासात भरीव कार्य करणे, गोर-गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निवारण करणे, संघटना मजबूत करणे अशा प्रकारची विवीध उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवूनच सदरच्या निवडी जाहीर केल्या असल्याचे प्रदेश सरचिटणीस तन्मय देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. याच अनुषंगाने डॉ डी.वाय पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आकुर्डी, पुणे या महाविद्यालयाच्या अध्यक्षपदी आदित्य गोरक्षनाथ देशमुख तर उपाध्यक्षपदी माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सुरज अशोक कांबळे यांच्या बिनविरोध निवडी जाहीर करण्यात आल्या असल्याचे तन्मय देशमुख यांनी सांगितले. अनेक दिवसांपासून मी निस्वार्थीपणे विद्यार्थ्यांसाठी काम करत आहे. त्याच कामाची पोहच पावती म्हणून माझ्यावर विश्वास टाकून तन्मय देशमुख यांनी उपाध्यक्षपदाची धूरा माझ्या खांद्यावर दिली आहे. त्यामुळे मी व माझा मित्र आदित्य देशमुख वरीष्ठांच्या विश्वाला तडा न जावू देता व पदाचा गैरवापर न करता 24 तास विद्यार्थ्यांच्या सेवेसाठी जबाबदारीने तत्पर राहू अशी अधुनिक केसरीच्या माध्यमातून नवनियुक्त उपाध्यक्ष सुरज कांबळे यांनी ग्वाही दिली.



# लोकसभा, विधानसभा जागा वाटप लवकरच

## नाना पटोले : विठ्ठला, राज्यातील बळीराजाचे अवकाळीपासून रक्षण कर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या तीन पक्षांची महाविकास आघाडी आजही भक्कम आहे. मागील तीन वर्षात मविआने भाजपाला धूळ चारत मोठे यश मिळवलेले आहे. मविआमध्ये जागा वाटपाविषयी कसलेही मतभेद नाहीत. कर्नाटक विधानसभेच्या निवडणुका संपल्यानंतर महाविकास आघाडीतील घटक पक्ष एकत्र बसून आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपावर चर्चा करतील, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी स्पष्ट केले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सोलापूर, सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून पंढरपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले की, जागा वाटपासंदर्भात महाविकास आघाडीच्या बैठकीत लोकसभा व विधानसभानिहाय चर्चा केली जाईल. सोलापूर लोकसभेची जागा ही काँग्रेसचीच आहे. या मतदारसंघातून मागील अनेक वर्षांपासून काँग्रेसचा उमेदवार निवडणूक लढवत आहे आणि ही जागा काँग्रेसकडेच राहील असे स्पष्ट करत सोलापूर जिल्ह्यात काँग्रेस पक्ष ताकदीने उभा रहात आहे, जिल्ह्यात कोणताही गट-तट नाही, सर्वजण एकसंधपणे काम करत आहेत. तरुणही मोठ्या संख्येने काँग्रेस पक्षात सहभागी होत असून जनतेच्या आशिर्वादाने जिल्ह्यात काँग्रेस पक्ष पुन्हा चांगली कामगिरी करेल.

विठ्ठला, राज्यातील बळीराजाचे अवकाळी पावसापासून रक्षण कर.



सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोमवारी महाराष्ट्राचे दैवत विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले. चतुर्थीच्या दिवशी विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन म्हणजे दुग्ध-शर्करा योग आहे. विठ्ठल-रुक्मिणी हे गरीब, सर्वसामान्य लोक, शेतकरी, कष्टकरी, श्रमजीवी जनतेचे दैवत आहे तसेच वारकरी संप्रदायाचे माहेर आहे. बळीराजा आज अस्मानी संकटाने घेरला असून असंवेदनशील खोके सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत आहे. आता विठ्ठलानेच बळीराजाचे अस्मानी, अवकाळी पावसापासून रक्षण करावे, अशी प्रार्थना केल्याचे पटोले म्हणाले. यावेळी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, सुधीर महाराज घोडके यांनी नाना पटोले यांचा तुळशीहार, उपरने आणि विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार केला.